# विष्णु सुर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास

(Vishnu Surya Wagh Yanchyaa Marathi Lalit Sahityaachaa Abhyaas)

एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका

MAR-651 Discipline Specific Dissertation


मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

अभ्यासक

**ओंकार दिनेश गोवेकार**

हजेरी क्र. 22P0190009

ABC ID 437677273462

पी. आर 201809259

मार्गदर्शक

**प्रा. चिन्मय मधु घैसास**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ.

शैक्षणिक वर्ष २०२३ – २४

# Vishnu Surya Wagh Yanchyaa
# Marathi Lalit Sahityaachaa Abhyaas

Submitted in partial fulfilment of master's degree

M.A. in Marathi

MAR-651 Discipline Specific Dissertation

Marathi discipline

Shenoi Goyenbab School Of Language & Literature

Goa University

By


Omkar Dinesh Govekar

Seat No. 22P0190009

ABC ID 437677273462

PR.No. 201809259


Under the supervision of


Ass. Prof. Chinmay Madhu Ghaisas

(Assistant Professor)

Shenoi Goyenbab School Of Language & Literature

Marathi discipline


Goa University.

Academic year 2023-2024

# DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, 'विष्णु सुर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास' is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Languages & Literature, Goa University under the supervision of Prof. Chinmay. Madhu. Ghaisas and the same has been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else at the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Govekar Omkar Dinesh

Seat no: 22P0190009

Date:

Place: Goa University

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report 'विष्णु सुर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास' is a bonafide work carried out by Mr Omkar Dinesh Govekar under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the discipline Marathi at the Shenoi Goembab School of Languages & Literature, Goa University.

Chinmay Madhu Gaisas

Date:

Signature of Dean of the school/ HOD of dept. School stamp

Date:

Place: Goa University

# मनोगत

विद्यापीठात प्रथम वर्षाला असताना माझा परिचय विष्णू वाघांच्या साहित्याशी झाला प्रथम .वर्षासाठी आम्हाला विशिष्ट ' या विषया अंतर्गत आमच्या प्राध्यापक चिन्मय .असा विषय अध्ययनासाठी होता 'खानोलकर .त्रं .लेखकाचा अभ्यास चि यांच्यावर 'विष्णू सूर्या वाघ' या अनुषंगाने मी .घैसास सर यांनी आम्हाला एका लेखकावर उपक्रम करण्यासाठी सांगितले उपक्रम करण्याचे निश्चित केले आणि हा प्रवास सुरू झालाहा अभ्यास करत असताना मला त्यांच्या साहित्यात रस वाटू . इन्स्टिट्यूट मिनेजिस ' याच विषयावर .तो उपक्रम मी अगदी मनापासून केलं आणि त्याचा फायदा मला पुढे झाला ,लागला यांनी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले ह 'ब्रागांजा ोते.त्यात मला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाली .

या सगळ्याचा माझ्यावर असा काही परिणाम झाला की याच विषयाला घेऊन मी माझ्या भाग दोनची प्रबंधिका करण्याचा निर्णय घेतलाचिन्मय घैस .अर्थात याचे श्रेय आम्हाला प्रथम वर्षापासूनच चिकित्सात्मक अभ्यासाचा रस लावणारे प्रा .ास सर यांना जातेअसं म्हणतात की योग्य .हा विषय निवडला आणि त्यांच्याच हाताखाली काम करण्याचा मी निर्णय घेतला . .तसेच काहीसे माझ्याबरोबर झाले .व्यक्तीचे मार्गदर्शन प्राप्त झाले तर कठीणातले कठीण प्रसंग ही सोपे वाटे लागतात खरंतर विशिष्ट लेखकाचा अभ्यास करणे म्हणज े खूप व्यापक आणि अनेक केंद्रीय अभ्यासआधार ग्रंथांचे २० तब्बल . .पण प्रत्यक्षात जेव्हा अभ्यास करायला गेलो तेव्हा माझ्यासमोर एक वेगळेच संकट उभे राहिले .वाचन त्यावर संदर्भ ग्रंथ गोव्यात सर्वदूर प्रसिद्ध असलेल्या विश्व सुर्यवार यांच्या विषयी साधार माहिती देणार े एकही पुस्तक उपलब्ध नव्हतीखरे तर . हळूहळू एका गोष्टीचे ,माझा प्रबंध कसा पूर्ण होईल हा प्रश्न मला सतावत होता पण .हे समजतात मी हादरून गेलो होतो आता .सार्थक वाटायला लागले की मी अशा गोष्टीवर संशोधन करतोय ज्या विषयावर संशोधन करण्याची गरज आहे माझ्यावर दडपण होते सगळा भार मला पैलवणार की नाही हा विचार आधीपासून माझ्या मनात येतच होतापण . खरे तर ज्यांच्या ज्यांच्याकडे माहिती .मार्गदर्शकाकडून योग्य मार्गदर्शन झाल्यामुळे ही प्रक्रिया हसत खेळत पार पडली विषय छान आहे पण" संकलनासाठी जायचं त्यांच्याकडून एक सूचना नक्की यायचेहा विषय संपुष्टात नेण्यासाठी मेहनत खूप घ्यावी लागेल .माझ्या मित्रमंडळींच्या कृपेने आणि मार्गदर्शकाच्या आशीर्वादाने या मेहनतीचे तसे ओझे वाटले नाही "

हळूहळू माझा हा अभ्यास साकार होत गेलाहा अभ्यास पूर्णत्वास आण्यासाठी मला माझ्या शिक्षकांकडून वेळोवेळी . मार्गदर्शन प्राप्त झाले ,हेमंत अय्या सर .डॉ ,विनय मदगावंकर सर .डॉ ,विनायक बापट सर .प्रा ,सुनिता उम्रजकर मॅडम .डॉ . पूर्वा वस्त मॅडम या सगळ्यांचे मार्गदर्शनाने आणि माझ्या वर्ग मित्रांच्या सहाय्याने या प्रबंध .जयेश गावकर सर आणि प्रा .प्रा

हा .आला मी पूर्ण करू शकतोप्रबंध करत असताना आमचे मार्गदर्शक प्राचिन्मय मधु घैसास यांनी उपयुक्त संदर्भ ग्रंथांना . तसे पाहिले तर हा संपूर्ण प्रबंध करत असताना त्यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन हे .उपलब्ध करून देण्यास माझी मदत केली त्याचबरोबर कुलदीप आणि सायली यांच्या सहक .खूप मोलाचे होतोर्याची मला इथे नोंद करावीशी वाटतेप्रबंध करत . अनेक विषय समजावून ,असताना रात्री अपरात्री कधीही मदतीसाठी फोन केल्यास ते अत्यंत सहनशीलतेने मदत करायचे ज्यांच्या .सर्वात महत्त्वाचे घटक म्हणजे आमच्या अध्ययनशाखेचे कर्मचारी वर्ग भानुदास काका आणि मर्लिन .सांगायचे सहकार्याशिवाय हा प्रबंध पूर्ण करणे शक्यच नव्हते असे हे दोघे या अध्यान शाखेचे खंदे .

आणि सर्वात शेवटी पण अत्यंत महत्त्वाचे घटकज्यांच्या पाठबळामुळे आणि वेळोवेळी लाभलेल्या उत्तेजनामुळे हा प्रबंध , .करण्यासाठी मला प्रेरणा मिळाली ते माझे आई बाबा

हा प्रबंध यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला मदत केली त्या सर्वांचे मी अत्यंत मनापासून ऋणी आहे.

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरण | पा.क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ०१ |
| २ | प्रकरण १<br>विशिष्ट लेखकाचा अभ्यास स्वरुप आणि संकल्पना | ०६ |
| ३ | प्रकरण २<br>विष्णु सुर्या वाघ व्यक्ती आणि वाङ्मय | २३ |
| ४ | प्रकरण ३<br>प्रकाशित ललित साहित्यक्रुतींचा अभ्यास | ४१ |
| ५ | प्रकरण ४<br>विष्णु सुर्या वाघ यांच्या साहित्यातुन व्यक्तहोणारा समाज | ७५ |
| ६ | समारोप | ८९ |
| ७ | निष्कर्ष | ९१ |
| ८ | परिशिष्टे | ९४ |
| ९ | संदर्भ सुची | १०२ |

# प्रस्तावना

लेखकाचा अभ्यास हे संशोधनाचे व समीक्षेचे एक महत्त्वाचे अभ्यास क्षेत्र आहे. एका लेखकाचे संपूर्ण लेखन डोळ्यासमोर ठेवून लेखक म्हणून त्याच्या समग्रह साहित्याचा वेध घेणे म्हणजे लेखकाचा अभ्यास होय. लेखकनिष्ठ अभ्यासाच्या माध्यमातून कोणा एका लेखकाचा आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा चिकित्सात्मक अभ्यास करता येतो. या अभ्यासाच्या माध्यमातून त्या लेखकाचे वाङ्मयात असलेले महत्त्व आणि त्याच्या साहित्याचे वैशिष्ट्य स्पष्ट करण्यास मदत होते.

विष्णू सूर्या वाघ या लेखकाचा अभ्यास करत असताना आपल्याला ते लेखक म्हणून कसे पुढे आले? त्याचबरोबर त्यांच्या साहित्यातून कोणती वैशिष्ट्ये ठळकपणे दिसतात? त्यांच्या साहित्यात सामाजिक जाणीवा कशा व कोणत्या प्रकारे प्रतीत होतात? हे पहावे लागेल, तसेच समकालीन साहित्य आणि विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्याची प्रेरणा यांचाही अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यांच्या लेखन पद्धतीचा विचार करताना शेवटी त्यांचे गोमंतकीय मराठी साहित्यात एकूणच योगदान काय आहे हे समजून घ्यावे लागते.

गोमंतकीय मराठी वाड्यात विष्णू सूर्या वाघ यांचा उल्लेख  नाटककार आणि कवी म्हणून  अधिक प्रभावीपणे जाणवतो. त्यांनी  सुरुवातीची काही वर्षे पत्रकारितेत काढली. त्याच्या झिंझिर झिणझिर सांज या पहिल्या मराठी कविता संग्रहाच्या माध्यमातून त्यांनी मराठी लेखन विश्वात पदार्पण केले. ते एक उत्तम कवी, नाटक्कार, पत्रकार तर होतेच पण त्याच बरोबर ते गोव्यातील सांतआनद्रे मतदार संघाचे आमदारही होते. त्यांच्या राजकीय क्षेत्राशी असलेल्या संबंधांचा त्यांच्या साहित्यावर प्रभाव होतो का हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते त्याचबरोबर लेखक म्हणून त्यांनी मराठी साहित्याला काय दिले याचाही अभ्यास या संशोधन प्रबंधात करण्यात येईल.

## संशोधन विषयक समस्या

गोमंतकीय मराठी वाङ्मयात विष्णू सूर्या वाघ यांच्या  साहित्याला आवश्यक महत्त्व प्राप्त झालेले नाही. त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या साहित्यावर परिणाम झाल्यामुळे त्यांच्या साहित्याकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहिले जाते. विष्णू सूर्य वाघ आणि त्यांच्या साहित्यावर आजतागायत आवश्यक संशोधन झालेले नाही.

## संशोधन कार्याची उपयुक्तता

विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्याचे सिंहावलोकन करून मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात त्यांची स्थान निश्चिती करणे आवश्यक ठरते. आज त्यांचे साहित्य दुर्लक्षित साहित्य राहिल्यामुळे त्याच्यावर फार कमी प्रमाणात अभ्यास झालेला आहे.. विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या काही निवडक साहित्यावर जरी अभ्यास झाला असला तरी त्याच्या समग्रह साहित्यावर अभ्यास आजतागायत झालेला नाही. “विष्णू सूर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याच्या अभ्यास” या विषयाचा अभ्यास झाल्याने विष्णू सूर्या वाघ यांचे मराठी साहित्यात लेखक म्हणून असलेले योगदान स्पष्ट होईल.

## उद्दिष्टे

- विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्याचा चिकित्सात्मक अभ्यास करणे.
- तत्कालीन मराठी वाङ्‌मयाच्या प्रवाहात विष्णू सूर्य वाघ यांची स्थान निश्चिती करणे.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्यातील सौंदर्य स्थळे शोधणे.
- उपलब्ध संदर्भांच्या सहाय्याने विष्णू सूर्या वाघ यांचे साहित्य आणि त्यांचे वैयक्तिक आयुष्य यांचे साधर्म्य शोधणे.
- लेखकाने रचलेल्या साहित्य निर्मितींचा क्रम लक्षात घेऊन त्यात होणारे परिवर्तन लक्षात घेणे.
- विषय, आषय, भाषा आणि अभिव्यक्तीच्या स्तरांवर लेखकाच्या साहित्यात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

## संशोधनविषयक साहित्याचा आढावा

‘विष्णू सूर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास' या विषयावर आज तागायत समग्र अभ्यास झालेला नाही. विष्णू सूर्या वाघ यांच्यावर वर्तमानपत्रातून आणि स्मरणिकेच्या माध्यमातून लेख प्रकाशित झाले आहेत पण ते लेख संशोधनाच्या पातळीवर लिहिलेले नाही.:२४ जुलै, २०१४ रोजी गोमंतक वर्तमानपत्रात त्यांच्या  साहित्यावर काही लेख प्रकाशित झाले होते पण ते संशोधनात्मक नसून समीक्षात्मक लेख होते. त्यांच्या नाटकांवर संशोधनात्मक पातळीवर एकच पुस्तकात उल्लेख सापडतो. तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार या संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय मोवा विद्यापीठ ताळगाव- गोवा यांनी प्रकाशित केलेल्या, मडगावकर विनय यांनी संमपदित केलेल्या पुस्तकात त्यांच्या नाटकांवर लेख सापडतो. हा लेख आमोणकर देविदास यांनी लिहिलेला असून यात त्यांनी विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या नाटकांचे विश्लेषण केलेले आहे.

भांडीये गौराज यांनी गोवा विद्यापीठाला सादर केलेल्या शोध प्रबांधिकेत विष्णू सूर्यावर यांच्या कोकणी नाटकांवर अभ्यास झाला आहे. यात त्यांनी विष्णू सूर्या वाघ यांच्या कोकणी नाटकांचा आढावा घेतलेला आहे त्यांचा चिकित्सात्मक अभ्यास करून त्यांच्या नाटकातील सौंदर्य स्थळे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## गृहितके

- गोमंतकीय मराठी साहित्यात विष्णू सूर्या वाघ यांचे स्थान महत्त्वाचे आहे.
- विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या कविता आणि नाट्य लेखनामुळे गोमंतकातील मराठी वाङ्मय समृद्ध झाले.
- तत्कालीन कालखंडाची अनेक पैलूंनी मांडणी करून नाटकाच्या आणि कवितेच्या माध्यमातून त्यांनी समाज जागृती केली.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या लेखणीतून प्रामुख्याने बहुजन समाजाचे दुःख व्यक्त होते.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या कवितेवर गोमंतकीय लोकसाहित्याचा प्रभाव आहे.

## संशोधन पद्धती

- वर्णनात्मक अभ्यास पद्धती

  विष्णू सूर्या वाघ यांच्या निवडक साहित्याचा अभ्यास या संशोधनात केले जाणार आहे. त्यांच्या निवडक साहित्याचे वाचन व आकलन करून त्यावरील समालोचन, चिकित्सा व विवेचन वस्तुनिष्ठ स्वरूपात वर्णनात्मक पद्धतीने केले जाणार आहे.

- सर्वेक्षण संशोधन पद्धती

  'विष्णू सूर्या वाघ यांच्या ललित साहित्याच्या अभ्यास' या विषयाच्या आवश्यकतेनुसार विष्णू सूर्या वाघ यांच्या संपर्कात असलेल्या साहित्यिकांच्या आणि व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखतीच्या माध्यमातून त्यांनी लिहिलेल्या साहित्य आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातला सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला जाईल.

## विषयाची व्याप्ती व मर्यादा

“विष्णू सूर्या वाघ यांच्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास” या विषया अंतर्गत त्यांनी लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या ललित साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रकाशित झालेल्या ललित साहित्याचा अभ्यास करत असताना त्यांच्या साहित्याची भाषा व त्या साहित्य प्रकाराचे एक साहित्य प्रकार म्हणून असलेली योग्यता आणि सामर्थ्य पडताळून पाहिली जाईल. विष्णू सूर्य वाघ यांच्या प्रकाशित झालेल्या साहित्याचा अभ्यास करून, त्यांचा क्रम लक्षात घेऊन त्यात होणारे बदल व त्या बदलांची कारणे यांचा शोध या संशोधन प्रबंधात घेतला जाईल.

विष्णू सूर्या वाघ यांचे बरेच साहित्य अप्रकाशित  आहे हे सत्य असले तरीही या शोध प्रबंधात त्यांच्या प्रकाशीत लालित साहित्याचाच अभ्यास केला जाईल. विष्णू सूर्या वाघ यांच्यावर उपलब्ध दुय्यम ग्रंथ फार कमी असल्यामुळे  त्यांच्याबरोबर काम केलेल्या साहित्यिकांचा आणि त्यांच्या हयातीत त्यांच्यासोबत असणाऱ्या व्यक्तिमत्वांची मुलाखत घेण्यात येईल. या शोध प्रबंधात त्यांनी भाषांतरित केलेल्या, अनुवादित केलेल्या व वर्तमानपत्रात प्रकाशित केलेल्या लेखांचा व साहित्याचा आढावा घेतला जाणार नाही.

# अनुक्रमणिका

प्रस्तावना....13

१.१ लेखकाभ्यासाचे प्रकार....14

१.१.१ ललित लेखनासाठी केला जाणारा अभ्यास.....14

१.१.२ संशोधनासाठी केला जाणारा अभ्यास.....15

१.२ लेखक अभ्यासातील केंद्रस्थाने....15

१.२.१ लेखकाचा वैयक्तिक जीवनाभ्यास ....17

१.२.१.१ जडण घडण....17

१.२.१.२ कौटुंबिक जीवन ....17

१.२.१.३ जीवनातील लक्षणीय प्रसंग ....18

१.२.२ लेखकाच्या वाङ्मयीन प्रवासाचा अभ्यास....18

१.२.२.१ वाङ्मयीन कालखंड....19

१.२.२.२ वाङ्मय प्रकार ....19

१.२.३ चिकित्सात्मक अभ्यास ....20

१.३ लेखक अभ्यासात येणाऱ्या अडचणी ....22

१.३.१ पूर्वाग्रह ....23

१.३.१.१ प्रयोजननिष्ठ हेत्वाभास....23

१.३.१.२ परिणामनिष्ठ हेत्वाभास....23

१.३.२ लेखकाची निवड ....24

१.३.३ उपलब्ध माहितीची सत्यता....25

१.३.४ विषय विविधता....25

समारोप....25

निष्कर्ष....26

संदर्भ सुची ....27

प्रस्तावना

'लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणे' हे साहित्य संशोधनाचे एक महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. या अभ्यास क्षेत्राला अतिशय दीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. (काव्यप्रकाश लीहून वाचकांना साहित्य शास्त्राशी ओळख करून देणाऱ्या ममटांच्याही आधीपासून ही परंपरा असल्याचे अभ्यासक मानतात) या अभ्यासपरंपरेत प्लॅटो, अरिस्टॉटल, दंडी, रुद्रत, आनंदवर्धन, मम्मट, महिमभट आणि या सारख्या अनेक अभ्यासकांनी योगदान दिलेले आहे. या अभ्यासाचा प्रारंभ 'साहित्याची प्रयोजने' समजून घेण्याच्या उद्दिष्टाने झाल्याचे आढळते. "मोरोपंतांचा पांगरकरांनी केलेला अभ्यास, बा. म. हंसानी वामनपंडीतांवर लिहिलेला लेख, 'चिपळूणकर - काळ आणि कर्तृत्व', 'गडकरी – व्यक्ती आणि वाड़मय' हे या परंपरेतील विशेष मानले जातात."[1]

प्रतिभेचा कमी-अधिक प्रमाणात वापर करून आणि स्वतः च्या  अनुभवांची सांगड घालून; लेखकांनी केलेल्या 'लेखनाचा' आणि 'लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा' अब्यस करण्यासाठी आधुनिक काळात  'लेखकाच्या समग्र साहित्य अभ्यासाची' परंपरा निर्माण करण्यात आली.  या अभ्यासाला 'विशिष्ट ग्रंथकराचा अभ्यास', 'विशिष्ट लेखकाचा अभ्यास' वा 'लेखकाभ्यास' अशी अनेक नावे आहेत. प्रतिभेला मध्यवर्ती ठेऊन उदयास आलेल्या या संशोधन क्षेत्राने आज स्वतःला सर्वव्यापी बनवीलेले आहे. "हा अभ्यास परिपूर्ण, पुरेसा चिकित्सक, शिस्तबध्द आणि फलदायी ठरण्यासाठी कोणती पध्दत अवलंबावी किंवा कोणकोणत्या बाबी विशेषत्वाने विचारात घेतल्या जाव्यात यासंबधी अभ्यासकांना मार्गदर्शन ठरु शकेल असे सैध्दांतिक पातळीवरील लेखन मराठीमध्ये फारसे झाल्याचे दिसत नाही. कोणत्या तरी निमित्ताने प्रकाशित झालेल्या समीक्षात्मक लेखसंग्रहांतील दोन तीन लेखांपलीकडे असे लेखन शोध घेऊनही सापडत नाही."[2] अनेक प्रबंधांच्या माध्यमातून मराठी साहित्यातल्या वेगवेगळ्या साहित्यिकांवर या अभ्यास क्षेत्रातून अभ्यास झालेला आहे. पण तरीही या अभ्यास क्षेत्राचे पद्धतशीर विवरण कुठेच झालेले दिसत नाही. हीच उणीव भरून काढण्याचा प्रयत्न या प्रकरणाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. एका लेखकाचा अभ्यास करत असताना लेखकाला त्या अभ्यासाच्या केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करणे अपेक्षित असते, हे जरी खरे असले तरी तो अभ्यास नेमका कशा पद्धतीने करावा याचे विश्लेषण या प्रकरणात आलेले आहे. लेखक अभ्यासाची पद्धत, या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या अभ्यासाच्या वाटा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या अभ्यास क्षेत्रात येणाऱ्या अडचणींचे विस्तृत विवरण या प्रकरणात करण्यात आलेले आहे.

[1] सं. जोशी, वसंत. "भाषा आणि साहित्य: संशोधन". *विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास.* नोवेंबर १९८१. प्रु.२४ ,

[2] सं. समिति "साहित्याचा अभ्यास गुरुवर्य डॉ. र. बा. मंचरकर सद्भाव ग्रंथ". *लेखकाचा अभ्यास.* प्रु. ६२

## १.१ लेखकाभ्यासाचे प्रकार

'विशिष्ट लेखकाचा अभ्यास' हे अभ्यास क्षेत्र वरवर पाहता जरी सरळ-, सोपे आणि मर्यादित स्वरूपचे वाटत असले तरी त्याचा सखोल अभ्यास केल्यास, ते तितकेच क्लिष्ट, खिचकटी आणि अमर्याद असल्याचे जाणवतेया अभ्यास क्षेत्रात . हा अभ्यास .लेखकाला मध्यवर्ती ठेवून त्याचा अनेक केंद्रीय अभ्यास केला जातो'साहित्य लक्षी' आणि 'जीवन लक्षी' अश्या स्वरूपाचा असतोसाहित्यिक .ाचे जीवन व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूपसाहित्य ,िकाच्या निर्मितीचां काळ , एकूण समाजिकसाहित्यिकाने कोणकोणत्या साहित्यप्रकारांमध्ये निर्मिती ,वाङ्मयीन पर्यावरण ,सांस्कृतिक पर्यावरण-साहित्यिकाच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या आशयविश्वाचे स्वरूप ,केलेली आहे कसे आहेया गोष्टींच्या आधारे हे संशोधन , हे संशोधन करत असतान .करावे लागतो अभ्यासकाच्या मनात काही प्रयोजने असतातअभ्यास करण्यामागे त्याची काही . या प्रकारांना प्रयोज .त्या उद्दिष्टांना डोळ्यासमोर ठेवून या अभ्यासाचे दोन प्रकार केले जाऊ शकतात .उद्दिष्टे असतातन आधारित प्रकार म्हणणे योग्य ठरेल.

1. ललित लेखनासाठी केला जाणारा अभ्यास.

2.संशोधनासाठी केला जाणारा अभ्यास.

### १.१.१ ललित लेखनासाठी केला जाणारा अभ्यास.

या प्रकारात लेखकाच्या जीवनाची आणि त्याच्या वाङ्मयाची सविस्तर माहिती वाचकासमोर प्रस्तुत करणे हा मुख्य हेतू असतो.लेखकाभ्यासाच्या या प्रकारात संशोधनाला कमी महत्त्व असून माहिती प्रसारणाला जास्त महत्व दिले जाते . "एखाद्या लेखकाच्या ग्रंथाचा अभ्यास करताना नवीन काही सांगणे हा उद्देश असतोच असे नाहीलेखकाच्या . साहित्यकृतीविषयी विविध समीक्षकांनी घेतलेले विविध दृष्टिकोन एकत्रित स्वरूपात देणे हेच अशा ग्रंथांमागचे मुख्य सूत्र असते"[3] म्हणजेच 'व्यक्ती आणि वाङमय'या स्वरूपाचे ग्रंथ या प्रकारांतर्गत येतातबऱ्याच वेळी अशा स्व .रूपाचे ग्रंथ हे विशिष्ट पूर्वग्रह ठेवून केलेले असतातया प्रकारात संशोधनात्मक वृत्तीपेक्षा सर्जनात्मक वृ .त्तीला जास्त महत्त्व दिले जाते .

[3] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

“लेखकाचा अभ्यास हा संशोधकाच्या सर्जनशीलतेच्या पायावरच आधारलेला असतो हा पाया जितका भक्कम तितके संशोधन अधिक जोरकस आणि हा पाया जितका ठिसूळ तितकी संशोधन कृती ही कमकुवत आढळून येते”[4]

१.१.२ संशोधनासाठी केला जाणारा अभ्यास.

ग्रंथ ले‘खनासाठी केला जाणारा अभ्याससंशोधनासा‘ आणि ’ठी केला जाणारा अभ्यासया दोनही ’ प्रकारात असलेला सर्वात महत्त्वाचा फरक  हा की, संशोधन करत असताना चिकित्सात्मक अभ्यास करणे महत्त्वाचे ठरतेपण अशी  , सक्तीललीत लेखनासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात नसते संशोधनासाठी .केल्या जाणाऱ्या अभ्यासाची भाषा ही अलंकारिक नसूनया प्रकारात अभ्यासकाला त्या .वस्तुनिष्ठ स्वरूपाची असणे गरजेचे असते ,ंनी निवडलेल्या लेखकाबद्दल पूर्वग्रह असणे ग्राह्य धरले जात नाही .“लेखकांच्या अभ्यास मांडणीतील संपूर्ण विवेचन हे सूत्रांच्या आधारे सिद्ध करण्यासाठी किंवा, अधिक स्पष्ट करण्यासाठी केलेले असतेअस्सल संशोधनकृतीत माहिती .वजा चर्चेस किंवा मान्यताप्राप्त दृष्टिकोन विवेचनाच्या भागात फारसे महत्त्व दिले जात नाही”अशी माहिती गृहीत धरली जात नाही .[5] या प्रकारांतर्गत केला जाणारा अभ्यास हा चिकित्सात्मक स्वरूपाचा असूनहा अभ्यास योग्य ,त्या संदर्भ ग्रंथांचा वापर करूनकाही तरी नवीन मांडण्याचा  , थोडक्यात सांगायचे झाले तर .प्रयत्नातून केलेला अभ्यास असतोललित लेखनासाठी केला जाणारा अभ्यास हा संशोधन वा चिकित्सात्मक पातळीवर जात नाही मात्र संशोधनासाठी केला गेलेला अभ्यास हा चिकित्सा आणि संशोधनाच्या दिशेने जाणारा अभ्यास असतो.

## १.२ लेखक अभ्यासातील केंद्रस्थाने

विशिष्ट लेखकाचा अभ्यास या अभ्यास पद्धतीत प्रामुख्याने तीन केंद्रस्थाने मानणे शक्य आहे. याच तीनही केंद्र स्थानांना अनुसरून हा अभ्यास करणे अपेक्षित असते. लेखकाच्या ‘वैयक्तिक जीवनाचा अभ्यास’, त्याच्या ‘वांड़मयीन चरित्राचा अभ्यास’ आणि ‘चिकित्सात्मक अभ्यास’ अशी ही तीनही स्थाने एकमेकांवर अवलंबून असलेली दिसतात.

लेखक अभ्यासातील तीन केंद्रस्थाने;

---

[4] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

[5] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

1. लेखकाच्या वैयक्तिक जीवनाचा अभ्यास

2. लेखकाच्या वाङमयीन प्रवासाचा अभ्यास

3. चिकित्सात्मक अभ्यास

ज्याप्रमाणे एक इमारथ तिच्या स्तभांवर उभी असते, त्याच प्रमाणे लेखकाभ्यासाचे हे संशोधन या तीन स्तभांवर आधारित असते. हे संशोधन यशस्वी करण्या साठी या तीनही केंद्रस्थानांवर तटस्थ आणि यथायोग्य अभ्यास होणे गरजेचे असते. सर्वसामान्य पणे 'लेखकाच्या वैयक्तिक जीवनाचा अभ्यास' आणि 'लेखकाच्या वाङमयीन प्रवासाचा अभ्यास' या दोन्ही भिंन आणि विरोधाभासी वाटणाऱ्या पण, वास्तविक एकमेकांशी जुळलेल्या असणाऱ्या केंद्रस्थानांचा अभ्यास एकाच वेळी होत असतो. या दोघांची सांगड घालून तिसऱ्या म्हणजेच 'चिकित्सात्मक अभ्यास' या केंद्रस्थानाचा अभ्यास करणे अपेक्षित असते. म्हणून या अब्यासाची प्रतीकात्मक आकृती म्हणून खालील दिलेल्या अकृतीला स्वीकारली जाऊ शकते.



### १.२.१ लेखकाचा वैयक्तिक जीवनाभ्यास

हा अभ्यास करत असताना अभ्यासकाने  हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की, लेखकाचा वैयक्तिक जीवनाभ्यास म्हणजे लेखकाच्या चरित्राचा सखोल अभ्यास नव्हे. हा अभ्यास प्रामुख्याने लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या लक्षणीय घटनांचा आढावा घेण्यासाठी केलागेलेलाअभ्यास असतो.

#### १.२.१.१  जडण घडण

अस्तित्ववादी सिद्धांताची उभारणी करणाऱ्या 'हेगेलने' मानवी मनाला आणि मानवाला महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. हे मानवी मन त्याच्या जडणघडणीचे, किंबहुना तो ज्या पर्यावरणात, ज्या समाजात वावरतो त्या समाजाचे प्रतिबिंब असते. त्यामुळे लेखकाचा अभ्यास करत असताना लेखकाच्या जडणघडणीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते. लेखकाच्या जडणघडणीचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने त्याचे व्यक्तिमत्व कसे घडले, बालपणापासून ते साहित्यिक होण्यापर्यंत त्याच्यावर कोणाचा प्रभाव झाला, लेखकाचे शिक्षण किती, कुठे आणि कसे झाले, त्याच्यावर कोणाचे, कसे संस्कार झाले, त्याच बरोबर लेखक ज्या समाजिक पर्यावरणात वावरतो त्याचाही अभ्यास करणे आवश्यक ठरते.

उदाहरणार्थ: एखाद्या लेखकाची जडणघडण खेड्यागावात झालेली असेल तर त्याच्यावर ग्रामीण संस्कृती, लोककला, लोकजीवन यांचा प्रभाव असणे साहजिक आहे. तथापि त्याचे लेखन हे तशाच धाटणीचे असण्याची संभवता असते.

कोणत्याही व्यक्तीचे बालपण हे त्याच्या आयुष्यात महत्त्वाचे ठरत असते कारण त्या काळात त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. त्यामुळे लेखकाच्या बालपणात त्याच्यावर झालेले संस्कार हे लेखकाच्या व्यक्तिमत्व विकासात महत्त्वाचे ठरते. याच काळात लेखकावर कोणा एका व्यक्तीचा, शिक्षकाचा, किंवा आई-वडिलांच्या विचाराचा प्रभाव पडत असतो. या प्रभावामुळेच तो त्यांना आदर्श मानत असतो, त्यांच्या विचारांना आत्मसात करण्याचा प्रयत्न करत असतो, किंबहुना आपल्या आदर्शाव्यक्ति सारखाच बनण्याचा प्रयत्न करत असतो आणि स्वतःच्या नकळतपणे त्यांचे विचार आत्मसात करून त्याचे अनुकरण करत असतो. लेखकाच्या जडणघडणीचा काळ हा खूप महत्त्वाचा मानला जातो कारण या काळातच त्याचे व्यक्तिमत्व विकसित होत असते.

#### १.२.१.२  कौटुंबिक जीवन

लेखकाच्या जीवनात त्याच्या जडणघडणीबरोबर त्याच्या कुटुंबाची समाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणही तितकीच महत्त्वाची ठरते. ज्या कुटुंबात, ज्या परिस्थितीत लेखक आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करतअसतो त्यावेळी त्या परिस्थितीचा आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा लेखकाच्या सुप्त मनावर प्रभाव पडत असतो. लेखकाच्या कौटुंबिक जीवनाची माहिती करून घेण्यासाठी त्याचा समाजिक स्थर आर्थिक, परिस्थिती, धर्म या

सगळ्यांबरोबरच कुटुंबातील व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे तितकेच महत्त्वाचे ठरते. लेखकाचा त्याच्या कुटुंबाशी असलेला संबंध आणि त्याच्यावर त्याच्या कुटुंबाचा झालेला परिणाम यावरूनही लेखकाचे व्यक्तिमत्व दर्शविण्यास मदत होते.

१.२.१.३ जीवनातील लक्षणीय प्रसंग

लेखकअभ्यास करत असताना लेखकाच्या जीवनात घडलेल्या लक्षणीय प्रसंगांचा आढावा घेणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे ठरते. कारण, एखाद्या लेखकाच्या आयुष्यात एखादा प्रसंगामुळे एक वेगळे वळण मिळालेले असू शकते.
उदाहरणार्थ: एखादा लेखक समजा कवितेच्या माध्यमातून वा लेख, कथांच्या माध्यमातून जगातील नैराशा, दुःख, विरह यांचे दर्शन घडवत असेल आणि त्याच्या आयुष्यातील एखाद्या अशा प्रसंगामुळे त्याला जगात असलेल्या सुखाची आणि दैवी शक्तीची अनुभूती झाली असेल तर त्याच्या आयुष्यात घडलेल्या त्या घटनेमुळे त्याचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि साहजिकपणे त्याचा परिणाम त्याच्या लेखनात होणे शक्य आहे.
अनेक लेखकांच्या बाबतीत असेही घडलेले दिसते की कालानुक्रमे त्यांच्या लेखन विषयात आणि लेखन पद्धती जमीन आसमानाचा फरक जाणवतो. हे त्यांच्या आयुष्यात होणाऱ्या घटनांवर आणि तत्कालीन काळातील समाजिक परिस्थितीमुळे होणारे परिणाम असतात. काही अपवाद सोडले तर साहित्याच्या इतिहासात घडलेली क्रांती ही तत्कालीन समाजात झालेल्या बदलामुळे झालेली असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच असे म्हणणे योग्य होईल की लेखकाच्या जीवनात झालेल्या घडामोडींचा परिणाम त्याच्या लेखनात होत असतो. बर्याचदा असेही झलेले आढळते कि लेखकाच्य आयुष्यात घड्लेल्य प्रसंगांचा आणि त्याने त्याच्या परिसरात पाहिलेल्या वा ऐकलेल्या प्रसंगांचा त्याच्या साहित्यावर प्रभाव पढतो .

हा अभ्यास करत असताना लेखकाचे चरित्र अत्यंत महत्त्वाचे ठरते त्याचबरोबर त्याच्या सोबत दीर्घकाळ संपर्कात आसलेल्या व्यक्तींची मते, त्यांची मुलाखते सुद्धा महत्त्वाची ठरतात. येथे चरित्राचा व कोणत्याही व्यक्ती संदर्भाचा आधार घेत असताना अभ्यासकाला त्याची सत्यता पडताळून पाहण्याचा इतर कोणताही दुसरा मार्ग नसल्यामुळे ती गृहीत धरावी लागते. या अडचणिमुळे लेखकाच्या अभ्यासात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. या सरख्या बारीक-सारीक चुकांमुळे निष्कर्ष चुकीचा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच अभ्यासकाने या संदर्भांचे आधार घेत असताना सावधगिरी राखणे गरजेचे ठरते.

१.२.२ लेखकाच्या वाङ्मयीन प्रवासाचा अभ्यास

लेखक हा त्याने लिहिलेल्या साहित्यामुळे ओळखला जातो. त्याच्या जीवनात त्याला आलेले अनुभव आणि त्याची प्रतिभा या दोघांची सांगड घालून तो साहीत्याची रचना करत असतो. याचाचं अर्थ असा कि त्याला आलेल्या अनुभवांचे

आकलन लेखकाच्या जीवनाचा अभ्यास करून केले जाऊ शकते, पण त्याच्या प्रतिभेचे मूल्यमापन किंबहुना त्याच्या रचनेचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य जाणून घेण्यासाठी त्याच्या वांड्मयीन प्रवासाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

१.२.२.१ वाड्मयीन कालखंड

वांड्मयीन कालखंडाचा अभ्यास करत असताना सर्वात आधी लेखकाच्या वाड्मयीन वाटचालीची सुरुवात शोधणे आवश्यक ठरते. त्यावरून त्यांच्यावर तत्कालीन किंवा पूर्वकालीन सहितिकांचा व साहित्याचा प्रभाव झाला आहे की नाही, याचा शोध लावता येऊ शकतो. त्यांच्या लेखन काळाची निश्चिती झाली की त्यांच्या समकालीन साहित्यिकांची आणि साहित्याची माहिती गोळा करणे आवश्यक ठरते. या संकलनामुळे लेखकाचा त्याच्या समकालीन लेखन परंपरेशी असलेला संबंध स्पष्ट होतो. ज्याप्रमाणे लेखकाच्या जीवनात होणाऱ्या महत्त्वाच्या घटनांचा त्याच्या लेखनावर प्रभाव होत असतो, त्याचप्रमाणे साहित्यात होणाऱ्या लक्षणीय घटनांचा समकालीन लेखकांवर प्रभाव नक्कीच होत असतो. त्यामुळे अशा घटनांची नोंद असल्यास, ती करणे आवश्यक ठरते. वाड्मयीन कालखंडाची माहिती संकलित करत असताना त्यांच्या साहित्य निर्मितीसाठी निवडलेले विषय आणि भाषा तितकीच महत्त्वाची ठरते. प्रस्थापित साहित्य चळवळीत लेखकाचा कोणता वाटा आहे, त्यांचे मत तत्कालीन साहित्य चळवळीत किती महत्त्वाचे होते व ते त्याचा कसा वापर करायचे याचाही शोध घेणे क्रमप्राप्त ठरते.

१.२.२.२ वाड्मय प्रकार

प्रत्येक लेखक आपल्या क्षमतेप्रमाणे आणि प्रतिभेच्या कलाने साहित्यप्रकार हाताळत असतो काही लेखक अनेक साहित्य प्रकार सकसपणे हाताळून इतिहास घडवतात तर काही आपले अवघे आयुष्य एकाच साहित्य प्रकारात लेखन करतात. काहीही असले तरी लेखकाने निवडलेल्या साहित्य प्रकारात त्याची पारंगतता तपासणे महत्त्वाचे ठरते. लेखकाने कितीही प्रकारात लेखन केले तरी कोणता तरी एक प्रकार त्याच्या जवळचा आणि त्याला पारंगत असतो ते शोधणे अभ्यासकाचे लक्ष असते. अनेकदा प्रकारानुरूप लेखकाच्या भाषेत दिसणारे बदल सुद्धा टिपणे आवश्यक ठरतात. लेखक जेव्हा विविध प्रकार हाताळत असतो किंवा तो एकाच प्रकारात लेखन करत असतो तेव्हा त्याने निवडलेल्या प्रकाराच्या साच्यात आणि मर्यादित राहून तो लेखन करतो का की त्या प्रकाराच्या साच्याच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करतो याचेही मूल्यमापन करणे गरजेचे असते.

विशिष्ट लेखकाच्या अभ्यास परंपरेच्या सुरुवातीपासूनच लेखकाच्या प्रतिभेला अनन्यसाधारण महत्त्व अभ्यासकांनी दिलेले आहे. त्यानुसार आजही अभ्यासाचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. आज लेखन क्षेत्रात व्यावसायिकरण जरी झाले असले, लेखकाच्या मतापेक्षा आणि प्रतिभेपेक्षा वाचकाच्या, प्रेक्षकाच्या मताला महत्त्व जरी आले असले तरीही लेखकाच्या

निर्मितीमागील प्रतिभेचे महत्त्व कमी होत नाही. त्यामुळे लेखकाच्या साहित्यातून उमटणारी त्याची प्रतिभा आणि सौंदर्यदृष्टी या दोघांचे मूल्यमापन करून लेखकाची साहित्याच्या इतिहासात असलेली स्थाननिश्चिती केली जाऊ शकते. लेखकाचा अभ्यास करत असताना किंबहुना त्याच्या साहित्याचे मूल्यमापन निरपेक्ष दृष्टिकोनातून त्याचे मूल्यमापन केले पाहिजे. निवडलेल्या लेखकाचे साहित्य साहित्य शास्त्राच्या नियमांची एकनिष्ठ आहेत की नाही याचेही परीक्षण करणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

लेखकाच्या साहित्याचे मूल्यमापन करत असताना समीक्षा पद्धतींचे अवलंब करणे सोईस्कर ठरते. विविध समीक्षा पद्धतींच्या मदतीने लेखकाने लिहिलेल्या साहित्यांचे तटस्थ मूल्यमापन करता येते. साहित्याची रचना पद्धत, त्यात आलेली भाषा, अलंकारांचा वापर, साहित्यरचना करत असताना लेखकाने स्वीकारलेला दृष्टिकोन, प्रतिमा प्रतीकांचा केलेला वापर, विषय निवड यासारख्या साहित्याच्या घटका अनुसार साहित्य समीक्षा करणे शक्य आहे. ही समीक्षा करत असताना अभ्यासकाने पूर्वग्रहदूषित असू नये.

### १.२.३ चिकित्सात्मक अभ्यास

चिकित्सा या शब्दावरूनच या केंद्रस्थानाचे कार्य स्पष्ट होते. या टप्प्यावर अभ्यासकाने संकलित केलेल्या माहितीची चिकित्सा केली जाते. ही चिकित्सा करत असताना लेखकाच्या वैयक्तिक आयुष्याची आणि त्याच्या वाड़मयीन चरित्राची तुलना केली जाते . प्रामुख्याने या टप्प्यात लेखकाच्या वैयक्तिक आयुष्याचा आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला जातो. लेखकाने अनुभवलेल्या अनुभवांचा, त्याच्या सभोवताली असलेल्या समाजाचा आणि त्याने लिहिलेल्या साहित्याचा सहसंबंध येथे स्पष्ट करणे अपेक्षित असते. याच केंद्रस्थानाच्या अंतर्गत लेखकाची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी आणि त्याच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी यात सहसंबंध आहे की नाही याचा शोध घेतला जातो. "प्रत्येक लेखकाच्या अनुभवाचे एक विशिष्ट अशा प्रकारचे क्षेत्र असते. एखाद्या लेखकाच्या लेखनामध्ये विविध जीवनस्तर येत असेल तरी त्याच्या चित्रणाचे एक प्रमुख केंद्र असते.असे लेखकाचे एखादे केंद्रवर्ती चित्रणक्षेत्र लक्षात आले की, अभ्यासकाला त्या क्षेत्रात संबंधित लेखकाने किती बारकाईने बुडी मारली आहे, ते शोधावे लागते. चित्रणक्षेत्र खूप मोठे असेल अगर खूप छोटे असेल, पण त्या लेखकाच्या दृष्टीने ते मोठेच असते."[6]

लेखक आपल्या आयुष्यात अनेक बरेवाईट अनुभव घेत असतो. तो त्यांची साठवण आपल्या मनात करत असतो आणि त्याच्याही नकळत त्यांचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यात येत असते. तो आपण अनुभवलेल्या प्रत्येक प्रसंगाला साहित्यात न आणता काही निवडक प्रसंगांची गुंफण करत असतो, त्या प्रसंगाला प्रतिभा आणि कलात्मक अभिव्यक्तीची

---

[6] आवलगांकर, अविनाश. “मराठी साहित्य संशोधन: नव्या दिशा”. *लेखकाभ्यसच्या दिशेने* . नोवेंबर २००६. प्रु.११२

जोड देऊन साहित्यात आणत असतो. वर्ड्सवर्थ कवितेचे प्रयोजन सांगत असताना असे म्हणतो की “spontaneous overflow of powerful feelings record in the moment of tranquility”[7] या त्यांच्या विधानात कवीच्या प्रतिभेपेक्षा त्याच्या भावनेला आणि अनुभवांना महत्त्व देण्यात आलेले आहे. "सामान्य माणसांना न दिसणारे विश्वाचे मर्म केवळ कवीला जाणवू शकते या गृहीतकामुळेच कवी प्रतिभेला कवीला व त्याच्या लौकिक अस्तित्वाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. आणि यातूनच जन्म झाला चरित्रात्मक समीक्षेचा. म्हणजेच काय तर कवी आपल्या साहित्याच्या माध्यमातून स्वतःचे चरित्रच रेखाटत असतो असे स्पष्ट झाले. हे चरित्र रेखाटत असताना तो प्रतिभेचे आणि स्वतःच्या सर्जनशक्तीचे वापर करून त्यात कथानकानुसार बदल घडवत असतो."[8] अलीकडच्या काळात झालेले लेखन मात्र या सिद्धांताला अपवाद आहे. आजचे लेखन हे अर्थ प्राप्तीसाठी केले जाते किंबहुना आजचे लेखन हे लेखकाधिष्ठित नसून ते वाचकाधीष्टीत बनलेले आहे त्यामुळेच या लेखनात लेखकाची अभिव्यक्ती कमीच जाणवते. असे जरी असले तरीही तो स्वतःच्या अनुभवांना त्यात रेखाटतच असतो. उदाहरणार्थ एखादा ग्रामीण भागात राहणारा लेखक महानगरीय कादंबरी लिहायला लागला तर त्याच्या त्या लेखनात सुक्तपणे ग्रामीण संदर्भ येणारच.

लेखकाच्या साहित्याचा चिकित्सात्मक अभ्यास करत असताना सर्वप्रथम भारतीय अभ्यासकांनी मांडलेल्या साहित्याच्या प्रयोजनांच्या निकषाच्या आधारे त्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. लेखकाने साहित्याची रचना कोणते प्रयोजन ठेवून केली आहे हे स्पष्ट करण्यासाठी त्याच्या चरित्राचा आधार घ्यावा लागतो आणि म्हणूनच सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे चिकित्सात्मक अभ्यास हा ‘लेखकाच्या वाङ्मयीन प्रवासाचा अभ्यास’ आणि ‘लेखकाच्या वैयक्तीक जीवनाभ्यास’ या दोन्ही केंद्र स्थानांचा समन्वय साधणारा अभ्यास ठरतो. असे जरी असले तरीही चरित्राचे आणि लेखकाने लिहिलेल्या साहित्याचे अनुबंध उलगडून सांगणे हा या अभ्यासाचा फक्त एक भाग आहे हे अभ्यासकाने समजून घेणे अत्यंत आवश्याचे आहे. या अभ्यासाचे मुख्य प्रयोजन लेखकाचे वाङ्मय इतिहासात स्थान निश्चित करणे आणि त्याच्या लेखनातील सौंदर्य स्थळे आणि उच्चांग स्पष्ट करणे आहे.

किंबहुना विशिष्ट लेखकाचा अभ्यास या अभ्यासक्षेत्राचे अध्ययन, संकलन, संशोधन हे अभ्यासविषय म्हणून निवडलेल्या लेखकावर अवलंबून असते. अभ्यासकाने निवडलेल्या लेखकाने कशा प्रकारचे साहित्य लिहिलेले आहे, त्या साहित्याचे कशाशी जवळचे संबंध आहेत, याच्यावर त्या साहित्य अभ्यासाचे निकष आणि पद्धती अवलंबून असतात. उदाहरणार्थ: ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, महानगरीय कविता यासारख्या तत्कालीन काळातील विषयांना घेऊन रचलेल्या साहित्याचे मूल्यमापन करत असताना तत्कालीन समाजाचे, लेखकाच्या आयुष्याचे, त्याच्या आर्थिक सामाजिक

---

[7] निरगुडकर, “समिक्षासंहिता”. *लेखकाभ्यस: संकल्पना व सूत्र.* २३ मार्च २०१२. प्रु. १२१

[8] निरगुडकर, “समिक्षासंहिता”. *लेखकाभ्यस: संकल्पना व सूत्र.* २३ मार्च २०१२. प्रु. १२१

परिस्थितीचे, त्यांनी लिहिलेल्या साहित्याशी संबंध जोडता येते. परंतु विज्ञान कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाचा किंवा व्याकरण लिहिणाऱ्या लेखकाचा लेखकाभ्यास करत असताना यापैकी कोणत्यात गोष्टीशी संबंध जोडता येणार नाही. मग अशावेळी त्याच्या साहित्याचे मूल्यमापन हे तत्कालीन साहित्य प्रवाह, लेखकाची जीवनदृष्टी, रचना कौशल्य, प्रतिभा या निकषांच्या आधारे चिकित्सा करणे भाग असते. हेच कारण आहे ज्यामुळे लेखक अभ्यास हा जितका सोपा तितकाच क्लिष्ट अभ्यास मानला जातो. अनेक वेळेला लेखकाचे साहित्य खूप वर्षांनी लोकप्रिय होते मग ते तसे का त्या साहित्याची रचना करत असताना लेखक प्रासंगिक नव्हता का त्यात आलेले प्रसंग तत्कालीन वाचकाच्या आकलन क्षमते पलीकडचे होते का यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणे अपेक्षित असते. ही उत्तरे शोधण्यासाठी तत्कालीन वांग्मय प्रवृत्तींचा अभ्यास करावा लागतो, तत्कालीन समाजाचा अभ्यास करावा लागतो, लेखकाने लिहिलेल्या इतर साहित्य आणि त्या काळातील इतर लेखकांचे साहित्य यांचा अभ्यास करून निष्कर्ष मांडावे लागतात. हा अभ्यास करत असताना अभ्यास विषय म्हणून निवडलेल्या लेखकाचे जीवन विषयक आणि साहित्य विषयक दृष्टिकोन समसमान आहेत की नाही याचाही अभ्यास करून चिकित्सा करणे अपेक्षित असते. त्यासाठी लागणाऱ्या संदर्भांचे आणि माहितीचे संकलन करत असताना अभ्यासकाने विशेष दक्षता पाळावी लागते ती त्या संदर्भ आणि दस्ताऐवजांच्या सत्यतेबद्दलची. अनेक अभ्यासकांचे असेही मत आहे की निवडलेल्या लेखकाचा या अभ्यास प्रक्रियेत कमीत कमी सहभाग असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसे न केल्यास या अभ्यासाचे परिणाम चुकीचे आणि विपरीत येऊ शकतात. तसे पाहता तांत्रिकदृष्ट्या हा अभ्यास लेखकाच्या निधनानंतर होण्यापेक्षा असते कारण विशिष्ट लेखक हयात असताना त्याच्या साहित्याचे संकलन करून अभ्यास केल्यास तो अपूर्ण होऊ शकतो आणि काही काळातच कालातीत होऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे हा अभ्यास करत असताना अभ्यासकाच्या मनात कोणताही पूर्वग्रह असणे अपेक्षित नसते.

## १.३ लेखक अभ्यासात येणाऱ्या अडचणी

लेखकाचा अभ्यास करत असताना येणारी सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे प्रत्येक लेखकाचे आपले असे एक वेगळे वैशिष्ट्य असतेत्याचे वैयक्तिक आयुष्य वेगळे .प्रत्येक लेखकाची आपली अशी एक वेगळी लेखन पद्धती असते . या .असते आणि म्हणून प्रत्येक लेखकाचे लेखन विषयही वेगळे असताततचाच अर्थ या अभ्यास पद्धतीचा एकच एक असा साचा सांगता येत नाहीप्रत्येक लेखक वेगळा असल्यामुळे त्यांचा अभ्यास हा त्या त्या लेखकाच्या लेखन पद्धतीनुसार . हा अभ्यास एकाच लेखकाचा असला तरी या अभ्यासा .आणि त्याच्या आयुष्यात घडलेल्या घडामोडीनुसार करावा लागतो अंतर्गत वििविध विषयांचा समावेश होत असतोप्रार्थमिक ,हा अभ्यास करण्यासाठी अनेक संदर्भ वापरावे लागतात .

त्यामुळे या अभ्यासाचा अभ्यासक हा .संदर्भांबरोबरच दुय्यम संदर्भांचाही आधार या अभ्यास पद्धतीमध्ये घ्यावा लागतो .अनेक केंद्री अभ्यास करण्यासाठी तत्पर असायला हवा

१.३.१ पूर्वाग्रह

लेखक अभ्यास करत असताना येणारी सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे पूर्वाग्रहहे पूर्वाग्रह प्रामुख्याने दोन . विशिष्ट लेखकाभ्यासातील अडचणी म्हणून ,याच दोन प्रकारांचा पाश्चात्य समीक्षकांनी उल्लेख केलेला .प्रकारचे असतात .केलेला आहे

1. प्रयोजननिष्ठ हेत्वाभास

2. परिणामनिष्ठ हेत्वाभास

१.३.१.१ प्रयोजननिष्ठ हेत्वाभास

या प्रकारामध्ये लेखकाने लिहिलेल्या साहित्यकृतीच्या प्रयोजना मागे असलेल्या पूर्वाग्रहाचा उल्लेख होतोएखाद्या . साहित्यकृती मागील उद्दिष्टांत विषयी गैरसमज अभ्यासकाच्या मनात निर्माण होतो त्याला प्रयोजननिष्ठ हेत्वाभास म्हणण्यात आलेले आहे.

उदाहरणार्थत्या साहित्यकृतीत ,एखाद्या लेखकाने ग्रामीण भागाचे चित्रण करत असताना शिवराळ भाषा वापरली असता : .मुद्दामून शिव्यांचा वापर केल्या असल्याचे गैरसमज अभ्यासाकाच्या मनात निर्माण होणे म्हणजे प्रयोजननिष्ठ हेत्वाभास होय

विशेष लेखकाभ्यास करताना लेखकाविषयी गैरसमज आणि चरित्राबद्दलचे पूर्वग्रह बाजूला ठेवून साहित्याचे संशोधन करावे “ .लागते”[9]

१.३.१.२ परिणामनिष्ठ हेत्वाभास

लेखकाने लिहिलेल्या साहित्यकृतीमुळे वाचकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यासकाच्या मनात पूर्वाग्रह निर्माण होणे म्हणजेच परिणामनिष्ठ हेत्वाभास .“एखाद्या साहित्यकृतीमुळे वाचकाच्या धार्मिक भावना दुखावतीलवाचक हिंसक बनेल , .असे वाटणे म्हणजे अभ्यासकाची भूमिका पूर्वाग्रहदूषित असण्याची शक्यता असते”[10]

[9] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

लेखक अभ्यास करत असताना अभ्यासकाला अत्यंत जबाबदारीने माहितीचे संकलन करून हा अभ्यास करावयाचा असतो . या अभ्यासादरम्यान एखाद्या व्यक्तिमत्त्वाविषयी चांगला .या अभ्यासात येणाऱ्या निष्कर्षांची मांडणी करावयाची असते अथवा वाईट पूर्वाग्रह निर्माण होणे सहाजिक असते पण त्याला बळी पडून त्याचा परिणाम अभ्यासकाने त्याच्या अभ्यासावर .होऊ देता कामा नये तसे झाल्यास अभ्यास यशस्वी होण्यास अडथळे निर्माण होऊ शकतात.

१.३.२ लेखकाची निवड

विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा त्याच्या समग्रह साहित्याला अनुसरून केला जातोहा अभ्यास करत असताना . निवडलेल्या लेखकाचे चरित्राचा अभ्यास आणि त्याच्या वांग्मयीन चरित्राचा अभ्यास करून त्य ाच्यावर चिकित्सा केली जातेतसे झाल्यास .याचाच अर्थ आगामी काळात निवडलेल्या लेखकाच्या अधिक साहित्याची रचना होणे अपेक्षित नसते . .त्या साहित्यकृतीमध्ये व्यक्त झालेला मठला आणि अभ्यासात आलेल्या निष्कर्षांमध्ये तफावत जाणवणे शक्य आहे

[10] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

त्यामुळे लेखक निवडत असताना अशा लेखकाची निवड करणे अपेक्षित असते ज्या लेखकाने साहित्य क्षेत्रातून निवृत्ती घेतलेली आहे वा तो लेखक दिवंगत झालेला आहे.

लेखकाच्या साहित्यकृती अप्रकाशित असतील तरही या अभ्यासात अडचणी येणे स्वाभाविक आहेअशावेळी . अभ्यासकाला निवडलेल्या लेखकाच्या प्रकाशित साहित्यावर अभ्यास करणे भाग पडतेत्यामुळे लेखक निवडत असताना . .या सगळ्या गोष्टींना डोळ्यासमोर ठेवून निवडावा

१.३.३ उपलब्ध माहितीची सत्यता

वर सांगितलेल्या मुद्द्याप्रमाणे निवडलेला लेखक दिवंगत झाला असेल तर त्याच्या चरित्राचा अभ्यास करत असताना अभ्यासकाला दुय्यम संदर्भांवर आधारित राहणे क्रमप्राप्त ठरतेअशा परिस्थितीत या संदर्भांची सत्यता . या सर्वात महत्त्वाच्या .पडताळण्याचे दुसरे साधन नसल्यामुळे त्यांची सत्यता गृहीत धरण्या खेरीज दुसरा मार्ग नसतो . अडचणीमुळे या अभ्यास क्षेत्रात काम करणे क्लिष्ट वाटू लागते

१.३.४ विषय विविधता

विशिष्ट लेखक अभ्यास हे अभ्यासक क्षेत्र जरी वरवर पाहता साधे सरळ आणि एककेंद्री वाटत असले तरी ते तितकेच क्लिष्ट, किचकटी आणि अनेक केंद्री आहे. या अभ्यासक क्षेत्रात अभ्यास करत असताना लेखकाने हाताळलेल्या विषयानुसार किंवा अनेक आयामांना अनुसरून या क्षेत्रात अभ्यास केला जाऊ शकतो. अशा वैविध्यपूर्ण आयामांना अनुसरून केला जाणारा अभ्यास विविध पद्धतीने स्वीकारून केला जाऊ शकतो. याचेच तात्पर्य असे की हा अभ्यास करण्यासाठी एकच एक अशी अभ्यास पद्धती स्वीकारली जाऊ शकत नाही. तरीही या प्रकरणात मांडलेल्या सुरुवातीच्या दोन केंद्रस्थानांचा उपयोग हा या अभ्यास पद्धती स्थिर राहतो हे निश्चित.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणात विशिष्ट लेखकाच्या अभ्यास प्रक्रियेचे विश्लेषण करण्यात आलेले आहेया अभ्यास पद्धतीत . असे दिसून ,त्यांचा आढावा घेता .येणाऱ्या अडचणींचा आढावा या प्रकरणात गेलेले आहे येते की या अभ्यास पद्धतीची सुरुवात प्राचीन काळापासून झालेली आहेया अभ्यास पद्धती ला एकच एक असा साचा जरी नसला तरी वर मांडलेल्या . .प्रक्रियेचा सर्वसामावेशक विचार केला जाऊ शकतो

विशिष्ट लेखक अभ्यास करत असताना असे गृहीत धरले जाते की एक लेखक आपल्या साहित्यातून स्वतःचे आयुष्य व्यक्त करत असतोलेखक आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घडामोडींना कलात्मक पातळीवर नेऊन त्यांचे वर्णन . अनेकदा तो त्याच्या साहित्यात येणाऱ्या विविध पात्रांच्या माध्यमातून स्वतःच्या जीवनाचे मर्म भेद सांगण्याचे .करत असतो .प्रयत्न करत असतो

लेखक अभ्यास करताना लेखकाच्या जीवन चरित्राबरोबर तत्कालीन सामाजिकसांस्कृतिक ,राजकीय , त्याच्या .कोणत्याही व्यक्तीचा जीवनावर तत्कालीन काळाचा प्रभाव होत असतो .घडामोडींचाही अभ्यास करावा लागतो वैयक्तिक आयु ष्यात घडणाऱ्या घडामोडींचा प्रभाव त्याच्या साहित्यावरही होत असतोयाच .ाच अर्थ त्याच्या जीवनावर आणि त्याच्या साहित्यावर होणाऱ्या प्रभावाचे मूळ जाणून घेण्यासाठी तत्कालीन काळातील वर्तमानपत्रत्यांच्या सानिध्यात , लेखकांनी स्वतः त्यांच्या साहित्यकृतीमध्ये लिहिलेले मनोगत यासारख्या अनेक प्रार्थमिक ,असलेल्या लोकांच्या मुलाखती किंवादुय्यम संदर्भांचा आधार घेणे आवश्यक ठरते.

## निष्कर्ष

- ललित लेखनासाठी आणि संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या विशिष्ट लेखक अभ्यासात भिन्नता आढळते.
- ललित लेखनासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात संशोधनाला कमी महत्त्व असून माहिती प्रसारणाला जास्त महत्त्व असते.
- संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात चिकित्सात्मक अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.
- लेखकाच्या अनुभव विश्वाचा आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा सहसंबंध असतो.
- ‘लेखकाचा वैयक्तिक जीवनाचा अभ्यास’ आणि ‘लेखकाच्या वांग्मयीन प्रवासाचा अभ्यास’ या अभ्यास क्षेत्रातील पहिला टप्पा असतो.
- चिकित्सात्मक अभ्यास हा या अभ्यास क्षेत्रातील दुसरा टप्पा असतो.
- या अभ्यास प्रक्रियेत अभ्यासकाने निवडलेल्या लेखकानुसार दुसऱ्या टप्प्यात बदल होतो, मात्र पहिला टप्पा तसाच राहतो.
- विशिष्ट लेखकाचा अभ्यास या अभ्यास क्षेत्राचे अध्ययन, संकलन, संशोधन हे अभ्यास विषय म्हणून निवडलेल्या लेखकावर अवलंबून असते.
- लेखक अभ्यास करत असताना अभ्यासकाने पूर्वग्रह विदुषित असणे महत्त्वाचे ठरते.

- विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा अनेक केंद्रीय अभ्यास आहे.
- विशिष्ट लेखकाचा अभ्यास सर्व समावेशक असल्यामुळे या अभ्यासाची एकच एक अशी अभ्यास पद्धती सांगता येत नाही.

## संदर्भ सुची

[1] सं. जोशी, वसंत. "भाषा आणि साहित्य: संशोधन". *विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास.* नोवेंबर १९८१. प्रु.२४ ,

[1] सं. समिति "साहित्याचा अभ्यास गुरुवर्य डॉ. र. बा. मंचरकर सद्भाव ग्रंथ". *लेखकाचा अभ्यास.* प्रु. ६२

[1] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

[1] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

[1] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

[1] आवल्गांकर, अविनाश. "मराठी साहित्य संशोधन: नव्या दिशा". *लेखकाभ्यसच्या दिशेने*. नोवेंबर २००६. प्रु.११२

[1] निरगुडकर, "समिक्षासंहिता". *लेखकाभ्यस: संकल्पना व सूत्र.* २३ मार्च २०१२. प्रु. १२१

[1] निरगुडकर, "समिक्षासंहिता". *लेखकाभ्यस: संकल्पना व सूत्र.* २३ मार्च २०१२. प्रु. १२१

[1] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

[1] https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2022-2023/SIM/SIM%20Oct%202022%20Exam/M.%20A.%20I%20Marathi%20Visesh%20S.%20Aabhyas%20P.%202.2%20%206.2%20all.pdf.

# अनूक्रमणिका


प्रस्तावना....................................23

२.१ प्रारंभिक जीवन....................................23

२.२ विष्णु वाघ आणि पत्रकारिता....................................27

२.३ विष्णु वाघ आणि नाटक....................................29

२.३.१ उपलब्ध साधनांनुसार प्राप्त झालेल्या विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या नाटकांची सूची.....................................31

२.४ विष्णु वाघ आणि कवीता....................................32

२.५ विष्णु वाघ आणि आध्यात्म....................................33

२.६ विष्णु वाघ आणि राजकारण....................................34

२.७ आजारपण आणि मृत्यू....................................36

२.८ विष्णू सूर्या वाघ यांची प्रकाशित पुस्तके....................................36

२.९ विष्णू सूर्या वाघ यांना प्राप्त झालेले पुरस्कार....................................37

समारोप....................................38

निष्कर्ष....................................39

संदर्भा सुची....................................40

## प्रस्तावना

कविता, नाटक, पत्रकारिता, दिग्दर्शन, अभिनय, पटकथा लेखन, संवाद लेखन, व्यंगचित्रकला, वक्तृत्व, प्रवचन, राजकारण, समाजकारण या सारख्या अनेक क्षेत्रातून आपले नाव अजरामर केलेले व्यक्ति मत्व म्हणजे स्व. विष्णू सूर्या वाघ. आपल्या लेखनाच्या आणि वक्तृत्वाच्या बळावर संपूर्ण गोमंतक आणि महाराष्ट्र प्रदेशावर नावलौकिक प्राप्त झालेले साहित्यिक, पत्रकार म्हणजे विष्णू सूर्या वाघ. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण करताना देविदास आमोणकर म्हणतात, "सदैव स्वयं तेजाने तळपणारा. आपल्या साहित्यातून गोव्याच्या मातीचा गंध सर्वदूर पसरवणारा गोमंतकाचा एक सांस्कृतिक आणि साहित्यिक राजदूत, बऱ्याच क्षेत्रांमध्ये यशस्वीरित्या मुशाफिरी करणारा"[11] वाघांच्या साहित्याला प्रामुख्याने गोमंतकीय लोककलांची, गोमंतकीय राजकारणाची, एकंदर गोव्यात असलेल्या जातीप्रधान समाज व्यवस्थेची आणि समाज मनाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. असे जरी असले तरी ते फक्त गोव्यापूर्तीच मर्यादित न राहता त्यांचे साहित्य हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विषयही हाताळताना दिसतात. या सगळ्याच विषयांचे मूळ शोधण्यासाठी त्यांच्या चरित्राचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

विविध क्षेत्रात काम करूनही प्रत्येक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण करणारे विष्णू सूर्या वाघ हे कोणत्या ना कोणत्या कारणास्तव त्यांच्या जीवनात वादग्रस्त बनले आहे, हे नक्की. या प्रकरणाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

## २.१ प्रारंभिक जीवन

विष्णू सूर्या वाघ यांचा जन्म २४ जुलै १९६४ साली, गोवा राज्यातील, तिसवाडी तालुक्यातील डोंगरी गावात झाला. विविध सण उत्सवाने भरलेला आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेला असा हा प्रदेश. या प्रदेशातील लोककला, लोक संस्कृती आणि लोकजीवन अनुभवत विष्णू वाघांची जोपासना झाली. त्यांच्या आई 'जानकी वाघ' या तत्कालीन काळातील लोककलेच्या गाढ्या_कलाकार होत्या. 'त्यां संपूर्ण पंचक्रोशीत धालांच्या ओव्या मुखोद्गत असलेल्या फार कमी महिलांपैकी

---

[11] सं. मडगावकर, विनय. "तिसर्य सहस्रकारंभी भरतीय नाट्य आणि नट्क्कार" *श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या 2000 नंतरच्या नाट्यसंहिता* . 2021 प्रु. 105

एक होत्या.’[12] ‘त्याकाळी या गावात ‘थोरलेभाट’ परिसरामध्ये तीन मंडपांमध्ये संपूर्ण वाडा विभागला होता. त्या तिन्ही मांडांवर पूर्वी ‘धाकल्यो धालो’ व ‘व्हडल्यो धालो’ या नावाने पाच दिवस धालांचा उत्सव चालू असे. एका मंडपाच्या ‘धाकल्यो धालो’ या वाघांच्या घरच्या अंगणात व्हायचा व त्यामुळे जानकी वाघ यांची धालोगीतांवर जबरदस्त पकड होती. याच उत्सवा मध्ये ‘सोंगे’ सादर करण्याची पद्धत होती. यासाठी बालमंडळी व्यक्तिगत अथवा सामूहिक प्रवेश वा गीत व खास रचलेलं एखादं पात्र रंगवायची. धालो सुरू असताना मध्येच जाऊन ते सादर करण्याची पद्धत होती. सादरीकरण झाल्यावर धालोमांडावरील प्रत्येक बाई आपल्या बटव्यातून सुटे पैसे सोंगे करणाऱ्या बालकांना बिदागी म्हणून देत असे. त्यामुळे धालांचे दिवस हे त्यांच्या साठी पर्वणी होती, ते फक्त त्यांच्या वाड्यावरच नव्हे तर ‘नेवरा’ भागातील धालोंच्या मांडावरदेखील यानिमित्ताने भेट देऊन कला सादर करायचे. या सर्वांमध्ये बाबांचा (विष्णु वाघ) सहभाग महत्वाचा होता. सर्व बायामंडळी मुलांचा, प्रामुख्याने बाबुशचा (विष्णु वाघ) कार्यक्रम केव्हा होतो याची वाट पाहायच्या. अनेकवेळा त्याचे दर्शन एखाद्या देवतेच्या रूपामध्ये होत असे व कृष्ण, राम अशी विविध रूपे घेऊन तो शाबासकी मिळवायचे.’[13] त्यांनी आईकडून लोककलांचे धडे घेतले तर त्यांच्या वडिलांकडून वक्तृत्व, नेतृत्व, साहित्य, नाटक, यासारख्या अनेक कौशल्यांचे आकलन केले. त्यांचे वडील सूर्या विष्णू वाघ हे तत्कालीन काळातले ज्येष्ठ रंगकर्मी दिग्दर्शक आणि समाज सुधारक तथा समाजसेवक होते. ते त्यांना ‘भाऊ’ म्हणत असत. संपूर्ण गोमंतकभर त्यांची ओळख प्रख्यात नाट्य दिग्दर्शक म्हणून आहे. आपलं संपूर्ण आयुष्य त्यांनी नाट्य क्षेत्राला वाहिलं. ‘हंस संगीत नाट्य मंडळ’ या संस्थेत त्यांनी अनेक वर्षे काम केले.

एक नाट्य दिग्दर्शक त्याचबरोबर नाट्य कलाकार म्हणून ते रंगमंचावर वावरले. ‘गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात सुद्धा त्यांचा हातभार लागलेला होता.’[14] ‘कागदापासून फुल करणे, हार करणं, बांबूचे वेगवेगळे नक्षीकाम करणं, आकाश दिवे तयार करणे, आकाश दिव्यांवर लावल्या जाणाऱ्या मुलींच्या डिझाइन्स करणं, यासारख्या अनेक कलांबरोबर ‘शिरती’ बनविण्यात सुद्धा त्यांचा हातखंड होता.’[15] विष्णू वाघांना एकूण तीन भावंड, एक लहान भाऊ (रामराव वाघ) आणि दोन बहिणी (स्मिता आणि जोस्ना). या चारही भावंडांमध्ये विष्णू वाघ अत्यंत बुद्धिमान आणि तल्लख होते. त्यामुळे त्यांच्या वडिलांना त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या. त्यांनी मोठे होऊन डॉक्टर व्हावं अशी त्यांची इच्छा होती. ते त्यांना लहानपणापासूनच विविध पुस्तकं आणून द्यायचं. मराठी तसेच कोकणीतील नावाजलेल्या लेखकांच्या पुस्तकांचा संच ते

---

[12] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा*. 17 फेब्रूवारी 2019 प्रु. 08

[13] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा*. 17 फेब्रूवारी 2019 प्रु. 08

[14] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 64*

[15] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 29*

घरात आणून त्यांना वाचायला लावायचे. त्यामुळे लहानपणापासूनच विष्णू वाघांवर खूप चांगले संस्कार घडले. ‘इयत्ता चौथीत असताना त्यांनी चक्क ‘दया पवार’ यांची ‘मृत्युंजय’ कादंबरी वाचली होती. त्या कादंबरीने त्यांना इतके झपाटून टाकले की त्या झपाटलेपणाने त्या तान्ह्या वयात त्यांनी ‘एकलव्य’  ही कादंबरीका लिहायचा प्रयत्न केला होता.’[16] लहानपणापासूनच त्यांच्यात विकसित झालेला त्यांच्या स्वभावातला महत्त्वाचा गुण हा की,  ‘कोणत्याही नवीन गोष्टीशी यांचा परिच आला की, त्या गोष्टीचे आकलन करून त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न ते करायचे.’[17] त्यांनी त्यांच्या वडिलांच्या अनेक नाटकात बालकलाकार म्हणून काम केले.

त्या काळात गावात होणाऱ्या नाटकांचे प्रोटींग करण्यासाठी त्यांना खास बोलविण्यात यायचे. वडिलांबरोबर अनेक राजकीय सभांमध्येही ते जायचे. त्यांच्या गावात त्याकाळी एक ग्राम वाचनालय होते. शाळा सुटल्यानंतर त्यांचा बराचसा वेळ त्या वाचनालयात जायचा. साने गुरुजी, नाथ माधव, खांडेकर अशा श्रेष्ठ लेखकांच्या साहित्यकृतीचे वाचन त्यांनी त्या ग्रंथालयात केले. त्यांचे पूर्व प्राथमिक शिक्षण ‘रामाची शाळा’(डोंगरीत असलेल्या कृष्णामभटांच्या घराच्या माळीवर ही शाळा भरायची) येथे झाले. सणासुदीला खास करून पाडवा झाल्यानंतर गावातील रामाच्या देवळात आयोजित करण्यात येणाऱ्या कीर्तनांना ते जायचे. तिथे त्यांची भेट राष्ट्रीय पातळीवर नावलौकिक असलेल्या किर्तन बुवांशी व्हायची. त्यांचे वडील त्यांना विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रेरित करायचे. शालेय अवस्थेपासुनच त्यांना कविता लिहिण्याचा छंद होता. त्यांनी शाळेत लिहिलेल्या कविता वाचून स्वयं कुसुमाग्रजांनी सुद्धा त्यांचे कौतुक केले होते. या प्रसंगाचे वर्णन ते असे करतात, “शाळेत शिकत असताना मी कविताही लिहू लागलो होतो. अर्थात शाळेतली मुलं लिहितात याच पठडीतल्या त्या कविता होत्या, पण भाऊंना त्याचंही कौतुक वाटत होतं. १९७६ साली हंस संगीत नाट्य मंडळीचा रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन साजरा झाला. या महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेने ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर आणि कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रम सुरू होण्याआधी तात्या थिएटरमधील प्रेक्षकांच्या पहिल्या रांगेत बसले होते. भाऊ मला त्यांच्याकडे घेऊन गेले. “तात्या, हा माझा मुलगा. याचंही नाव विष्णूच आहे. हा कविता लिहितो,” असं म्हणत त्यांनी माझ्या कवितांची चोपडी तात्यांच्या हाती दिली. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी ती वही उघडली आणि त्यात मी लिहिलेल्या दोन – तिन कविता वाचून काढल्या. मी त्यांच्यासमोर अवघडल्यासारखा उभा होतो. मराठीचा महाकवी आपणासमोर बसलेला आहे हे कळण्याचं ते काही वय नव्हतं. तात्यांनी वही मिटली. कौतुकानं ओथंबलेल्या नजरेनं

---

[16] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या*. *श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019* प्रू.56

[17] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा*. 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

माझ्याकडं पाहिलं. हलकेच ओठातल्या ओठांत स्मित केलं आणि आपला उजवा हात माझ्या डोक्यावर ठेवून म्हणाले, "कविता उत्तम. अक्षर छान आहे. मोठा कवी होशील!"[18]

त्यांचे प्राथमिक शिक्षण 'आजमाने' नावाच्या त्यांच्याच वडिलांनी नाव दिलेल्या शाळेत झाले.

दहावीपर्यंतचे त्यांचे शिक्षण त्यांनी त्याच शाळेत घेतले. दहावीच्या शालांत परीक्षेमध्ये त्यांनी संपूर्ण गोव्यामध्ये दहावा क्रमांक पटकावला होता. पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मावशीकडे वास्कोला पाठविण्यात आले. तेथे त्यांनी वडिलांच्या सांगण्यावरून एम. ई. एस. महाविद्यालयात, विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. "येथे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या कक्षा रुंदावल्याच, पण शैक्षणिक प्रगतीला वेगळी दिशा लाभली."[19] 'ते विविध स्पर्धा-कार्यक्रमांमध्ये विद्यालयात व वास्कोमध्ये चमकू लागले. ग्रंथालयाची तसेच नगरपालिकेच्या ग्रंथालयातली विपुल ग्रंथसंपदा त्याच्या हाताला लागली. वास्कोतली इतर कलाकार मित्रमंडळी त्यांना लाभली व एकांकिका लेखनाकडे व दिग्दर्शाकडे त्यांचा कल वाढू लागला. महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांसाठी त्याने दिग्दर्शन, अभिनय, लेखन सुरू केले. एव्हाना त्यांचं लक्ष विज्ञान विषयावरील अभ्यासाकडे विचलित झालं होतं व बारावीची परीक्षाच त्याने दिली नाही. पण घरीदेखील कुणाला सांगितलं नाही. निकाल लागल्यानंतर भाऊंना मोठा धक्काच बसला. ते चौकशीसाठी महाविद्यालयात गेल्यानंतर त्यांना कळलं की बाबा परीक्षेला बसलाच नाही. त्यांचे त्याला डॉक्टर करण्याचे स्वप्न भंगले होते. पुढच्या वर्षी परत परीक्षा देण्याचं निश्चित झालं. त्या वर्षी त्याने प्रथमश्रेणी मिळवली, पण त्यांना चांगले गुण भाषा विषयात मिळाले होते. शास्त्र व गणित विषयांमध्ये त्याने रस न दाखवल्याने पाहिजे ती टक्केवारी त्याला मिळाली नव्हती.'[20]

महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी त्यांनी पणजीतील धेंपे महाविद्यालयात, रसायन शास्त्र आणि जीव शास्त्र या विषयात बीएससी पूर्ण केली. या दरम्यान त्यांच्या व्यक्तिमत्वात नेतृत्व क्षमता निर्माण झाली. याच कालावधीत त्यांचा परिचय अनेक विद्यार्थी संघटनेशी आल्यामुळे त्यांच्यातील नेतृत्व कौशल्य विकसित झाले. ते महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी सुद्धा याच काळात झाले. या त्यांच्या पदाचा वापर करून त्यांनी महाविद्यालयात या काळात अनेक कार्यक्रम राबविले आणि ते यशस्वीरित्या पार पाडले. त्यांच्या मित्रासोबत मिळून त्यांनी या महाविद्यालयामध्ये 'क्रिएशन्स' नावाचा आंतर महाविद्यालयीन स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन सुरू केले होते. विद्यार्थी चळवळी बरोबर नाट्यलेखन दिग्दर्शन या क्षेत्रातही या काळात ते अग्रेसर होते. गोवा तसेच गोवा बाहेरही विविध क्षेत्रात ते त्यांनी लिहिलेले एकांकिकांचे प्रयोग

---

[18] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 57*

[19] "नवप्रभा" *सर्वांना नादाला लावणारा बाबा*. 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[20] "नवप्रभा" *सर्वांना नादाला लावणारा बाबा*. 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

करण्यासाठी जायचे. यात ते कधी कधी स्वतः कामही करायचे. गोवा विद्यापीठात बायो केमिस्ट्रीत पदव्युत्तर शिक्षणासाठी त्यांनी प्रवेश घेतला. तेथेही त्यांनी अनेक कार्यक्रम, कविता संमेलने, वक्तृत्व स्पर्धा त्याचबरोबर इतर स्पर्धांमध्ये स्वतःची वेगळी छाप सोडली. पण वडिलांच्या आकस्मित निधनामुळे त्यांना विद्यापीठीय शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागले.

## २.२ विष्णु वाघ आणि पत्रकारिता

बारावी पासून ते विद्यापीठापर्यंत विज्ञान क्षेत्रात तांत्रिक शिक्षण विष्णू वाघांनी घेतले, पण शिक्षण झाल्यानंतर त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत ते या क्षेत्राकडे परत कधी वळलेच नाही. आईकडून लोकसाहित्याचे धडे गिरवणारे आणि वडिलांकडून कलाक्षेत्राचे ज्ञान प्राप्त झालेले विष्णू सूर्या वाघ हे अनावधानानं पत्रकारिता क्षेत्रात वळले. “माझा पिंड तसा मूळ कवितांचा, नाटकांचा पण मी अपघातानं पत्रकार झालो.”[21] असे ते स्वतः म्हणतात.

गोवा विद्यापीठात मायक्रोबायोलॉजी चे पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच त्यांच्या वडिलांचा आकस्मिक मृत्यू झाला. त्यांच्या घरातील कर्ताधर्ता पुरुष मृत्युमुखी पडल्यामुळे घराची जबाबदारी मोठा मुलगा या नात्याने विष्णू वाघांवर पडली. आणि म्हणूनच त्यांना विद्यापीठ शिक्षण दुसऱ्या वर्षाच्या मध्येच सोडावे लागले. त्या नंतर ते १९८७ साली, त्यावेळी नव्यानेच सुरू झालेल्या ‘गोमंतक टाइम्स’ या इंग्रजी दैनिकात उपसंपादक म्हणून रुजू झाले. खरतर त्यांना या क्षणी पत्रकारितेतलं काहीच कळत नव्हतं पण त्यांच्या सहकाऱ्यांच्या साथीने त्यांनी या क्षेत्राचे शिक्षण ग्रहण केले आणि त्यात ते पारंगतही झाले. त्या वेळचे गोमंत टाइम्सचे वृत्त संपादक ‘नवीनचंद्र पाल’ यांचेही त्यांना खूप मार्गदर्शन लाभले. ते इंग्रजी पत्रकारितेत काम करीत असले तरी त्यांच्यावर तत्कालीन काळातील गोमंत वृत्तपत्राचे संपादक ‘नारायणराव आठवले’ यांचा जबरदस्त प्रभाव होता. त्यानंतर एक-दीड  वर्षांनी ते बेळगावच्या ‘न्यूज लिंक’ मध्ये वृत्तसंपादक म्हणून रुजू झाले. याच काळात त्यांच्यातील व्यंगचित्रकारालाही उभारी आली. त्यांनी रेखाटलेली व्यंगचित्रे वृत्तपत्रांच्या माध्यमातून खूप लोकप्रिय झाली. तरुण भारत ग्रुपचे हे दैनिक म्हणजे त्यांचे छोटे कुटुंब झाले होते, पण दुर्दैवाने आर्थिक अडचणीमुळे हे दैनिक बंद पडले.

नंतर काही काळ ते त्यांच्या मित्राच्या आग्रहास्तव तरुण भारतच्या गोवा आवृत्ती त्याचं काम पाहू लागले. न्युझलींक हा इंग्रजी वर्तमान असल्यामुळे त्यांना ते सोयीस्कर ठरत होते पण, आता मात्र त्यांना मराठीतून लेखन करणे भाग होते. सुरुवातीचे काळ अवघड गेले पण हळूहळू त्यांना सवय झाली. त्या दिवसाबद्दल व्यक्त होताना ते लिहितात “तरुण भारतचा गोव्यातील खप त्यावेळी फारसा नव्हता. हे दैनिक अधिकाधिक लोकांपर्यंत पोचावं यासाठी आम्ही काही बदल केले.

[21] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019. पृ.*

काही नवीन सदरं सुरु केली. दरम्यान माझी व्यंगचित्रंही अधून-मधून छापून येत होती व ती लोकांना आवडत होती. त्याची हळूहळू, ‘तरुण भारत’ वाचकप्रिय झाला. याच सुमाराला गोव्याच्या सचिवालयात टावर विनयभंग प्रकरण घडलं. अख्खा गोवा ढवळून निघाला. यातून जे आंदोलन उभं झालं त्यात सडेतोड, निर्भीड बातम्या देण्यात ‘तरुण भारत’ आघाडीवर होता. ‘तरुण भारत’ च्या खपाला लक्षणीय उठाव मिळाला तो याच काळात.”[22] १९९० मध्ये दैनिक गोमंतक तसेच संपादक नारायणराव आठवले यांच्या आग्रहास्तव ते उपसंपादक म्हणून दैनिक गोमंतक मध्ये रुजू झाले आणि लगेचच १ जानेवारी १९९९ या दिनी त्यांनी दैनिक गोमंतकचे संपादक पद स्वीकारले. आपल्या पदावरून निवृत्त होताना नारायण आठवलेंनी दैनिकामधून प्रकाशित केलेल्या निरोपाच्या अग्रलेखात म्हटले की “आजपासून हा विष्णू नारायणायच आहे असं तुम्ही समजा."[23]

साल १९९९ पासूनच गोव्यात पक्षांतराचे पर्व सुरू झाले. या काळात एक पत्रकार म्हणून वाघांना नवी ओळख प्राप्त झाली._समाज वास्तवाचे दर्शन आपल्या अग्रलेखाच्या माध्यमातून घडवणारे पत्रकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. तत्कालीन काळात पक्षांतरित झालेल्या अनेक नेत्यांवर आपल्या अनोख्या शैलीतून लेखन करून त्यांनी बहुजन समाजाला जागं केलं. नारायणराव आठवले यांच्या प्रमाणेच त्यांची ही शैली काहीशी आक्रमक रोखठोक व बेधडक बनली होती. हि त्यांची अनोखी शैली आणि या शैलीतून येणारे त्यांचे अग्रलेख लोकांना आवडू लागले होते. या सुमारास सामाजिक क्षेत्रातही अनेक घटना घडल्या त्या घटनांची ही त्यांनी निरपेक्ष भावनेने चित्रण आपल्या अग्रलेखांच्या माध्यमातून केले. त्यांचे अग्रलेख फक्त गोव्याच्याच घडामोडी पूर्ती मर्यादित नसून हळूहळू त्यांचे क्षेत्र विस्तारत चालले होते. अनेक राजकारणांवर, सामाजिक घडामोडींवर, त्याचबरोबर साहित्यिकांच्या कृत्यांवरही त्यांनी अक्षरशः झपाटलेपणाने टीका केल्या. याच काळात 'विष्णुपुराण' हे भाष्य कवितांचे नवे सदर त्यांनी सुरू केले. ओवी छंदात तत्कालीन राजकीय सामाजिक परिस्थितीवर अत्यंत मार्मिक भाष्य त्यातून ते करीत होते. खरंतर ही प्रेरणा त्यांना नाना आठवले यांच्या 'नारायण गाथेपासून' मिळाली होती. या त्यांच्या सदरात लेखांबरोबर व्यंगचित्रेही ते प्रकाशित करायचे. पुढे दैनिक गोमंतक मध्ये मटक्याचे आकडे छापण्याच्या व्यवस्थापनाच्या निर्णयाला विरोध करून त्यांनी संपादक पदाचा राजीनामा दिला आणि गोमंतकशी असलेला त्यांचा संबंध संपुष्टात आला.”[24]

---

[22] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[23] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[24] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

त्यानंतर काही काळ त्यांनी मुंबईतील व्यवसायिक रंगभूमीवर नाट्यलेखन केले. पण तिथल्या कलाकारांमधल्या शीतयुद्धामुळे त्यांच्या नाटकाचे अपेक्षित प्रयोग होऊ शकले नाही. पडद्यामागील कटकारस्थान पाहून ते उद्विग्न झाले आणि मुंबई सोडून गोव्यात परतले. येथे त्यांची भेट सौ. मंदा बांदेकर यांच्याशी झाली. सौ. मंदा बांदेकर यांनी त्यांना आर्थिक मदत केली आणि 'आपलं वर्तमान' हे गोव्यातील पहिले ‘सायं दैनिक’ सुरू झाले. तसे पाहिले तर गोव्यातील लोकसंख्या खूप कमी. मुंबई प्रमाणे धावपळीचे जीवन येथे नाही. रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या सुद्धा खूप कमी त्यामुळे सायं दैनिकाची संकल्पना इथे यशस्वी करणे हे खूप कठीण काम होते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्तमान पत्र वितरणासाठी खूप कष्ट घ्यावे लागणार होते. यासारख्या असंख्य अडचणींचे सामोरे करत त्यांनी सायं दैनिक ही संकल्पना गोव्यात रुजवली आणि ती यशस्वीरित्या चालवलीही. 'लिफ्ट नसलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर ऑफिस. सुरुवातीचे चार-पाच महिने टेलिफोनही नाही कार्यालयात फक्त टाइप्स सेटिंगची सोय बाकीची सगळी छपाई पणजी पासून चार कि.मी वर असलेल्या एका प्रेस मध्ये असा एकंदर कारभार होता.'[25] हे सायं दैनिक बराच काळ टिकले.काही काळात हे सायं दैनिक बंद पडले. त्यानंतर ‘सुदर्शन’ म्हणून त्यांनी एक नवे दयनिक सुरू केलं पण तेही फारसे चालले नाही . या काळात विष्णू वाघांच्या  करकीर्दीला एक वेगळे वळण प्राप्त झाले.

## २.३ विष्णु वाघ आणि नाटक

विष्णू सूर्या वाघ यांचा जन्म डोंगरी सारख्या कलासंपन्न गावात झाल्यामुळे नाटकाचा किंबहुना एकंदर सर्वच कलांचा त्यांच्याशी संपर्क फार लहानपणापासून येत होता त्यात त्यांचे वडील नाट्य कलाकार होते ते गोव्यातील एक उत्तम नाट्य दिग्दर्शक होते. त्यामुळे अनावधानाने त्यांच्यावर नाटकाचे संस्कार झाले. “आमच्या डोंगरी गावच्या कलासंपन्नतेबद्दल मी बरंच काही याआधीच सांगितलंय. डोंगरी ही संगीत रंगभूमीची गंगोत्री. डोंगरीचं नाट्यवेड हे सर्वात जुनं. डोंगरीकरांची आर्थिक परिस्थिती तशी बेतास बेत, पण नाटक निवडतील ती मात्र एकाहून एक भारी. डोंगरीवासीयांचा एक ठळक गुण (की दोष?) म्हणजे ‘वॉर्रदपण.’ छोटंमोठं नव्हे तर कंपनीचं नाटक गावात झालं पाहिजे ही जिद्द. याच जिद्दीपोटी इंत्रुजोत्सवाच्या काळात डोंगरीत मोठमोठी नाटकं सादर केली जायची. गावात नामांकित नटमंडळी आधीपासूनच होती. सूर्या वाघ यांच्या पदार्पणानंतर त्यात आणखी एकाची भर पडली.”[26] अशा नाट्यमय वातावरणात त्यांची जडणघडण होत गेली. बालपणात त्यांनी ‘हंस संगीत नाट्य मंडळ’ या नाट्य मंडळात बालकलाकार म्हणून अनेक नाटके केली. लहानपणापासूनच ते हुशार असल्यामुळे ज्या क्षेत्रात जायचे त्या क्षेत्रात प्राविण्य मिळवायचे. त्यांच्या स्वभाव धर्माप्रमाणे नाट्य क्षेत्रातही त्यांनी

---

[25] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[26] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

चपळता प्राप्त केली होती. देविदास आमोकर त्यांच्या नाट्य प्रतिभे विषयी बोलत असताना म्हणतात “सदैव स्वयम तेजाने तळपणारा, आपल्या साहित्यातून गोव्याच्या मातीचा गंध सर्वदूर पसरवणारा गोमंतकाचा एक सांस्कृतिक आणि साहित्यिक राजदूत, बर्याच क्षेत्रामद्धे यशस्वीरीत्या मुशाफिरी करणाऱ्या या अवलियाला नाट्यलेखक म्हणून एक वैशिष्टपूर्ण स्थान आहे.”[27] वास्तविक त्यांच्या उच्च माध्यमिक विद्यालयीन जीवनापासूनच नाट्यलेखन कारकिर्दीला सुरुवात झाली. विष्णू सूर्या वाघ यांनी एकांकिका लेखनाने आपल्या नाट्य लेखनास प्रारंभ केल्याचे आढळते. एम ई एस मध्ये शिकत असताना त्यांचा वास्कोतील युवा नाट्य कलाकारांशी परिचय आला. तिथे त्यांनी अनेक एकांकिका लिहिल्या त्या बसवल्या आणि त्यामध्ये कामही केलं. या एकांकिकांचे प्रयोग ते गोव्यात तसेच गोव्याबाहेरही करायचे. त्यांच्या एकांकिका प्रेक्षकांना आवडायच्या त्यातून प्रेरणा घेत ते नवनवीन एकांकिका लिहून हळूहळू नाटके लिहू लागले. ‘समाज पुरुशाक फोण खणटा’ ही एकांकिका त्यांनी लिहिलेली पहिली एकानिका. हंस संगीत नाट्य मंडळ या संस्थेसाठी ही त्यांनी अनेक नाटके लिहिली. किंबहुना या संस्थेच्या माध्यमातूनच त्यांच्या नाट्य लेखनाला बहर आला. त्यानंतर रुद्रेश्वर पणजी, कला अकादमी रंगमेळ, भार्गवी थेटर्स, ड्रॅमेटीक असोसिएशन, सिद्धी नंदन थिएटर्स, यासारख्या संस्थांमधून त्यांच्या हातून अनेक नाटके, एकांकिका जन्माला आल्या. ‘१९९१-९२ च्या नाट्य स्पर्धेत ‘धर्मश्री’ हे त्यांचे पहिले नाटक सादर करण्यात आले. धरणाच्या बांधकामामुळे विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या संघटित संघर्षाचे चित्रण या नाटकात त्यांनी केले होते.’[28] याच काळात त्यांनी दैनिक गोमंतक मधून राजीनामा दिला होता. जवळजवळ बारा वर्षाच्या कालावधीत त्यांनी समाजातील अनेक घटनांवर टीकास्पद लेखन केले होते. अनावधानाने त्यांना समोर दिसणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची सवय झाली होती. आणि आता स्वतःच्या हाती असलेले हत्यार त्यांनी स्वतःहून टाकून दिल्यामुळे मनात अनेक खटके उडाले तरीसुद्धा त्यांना व्यक्त होण्याचा मार्ग दिसत नव्हता होता. मनात गोंधळ घालणाऱ्या या विचारांना मार्ग देण्यासाठी, मनात खटकणाऱ्या असंतोषाला वाट फोडण्यासाठी त्यांनी नाट्यलेखनाकडे आपली दिशा वळवली.

‘या काळात त्यांनी तत्त्वनिष्ठ पत्रकार आणि ध्येय शून्य राजकारणी यांमध्ये संघर्ष दाखवणारे ‘साम्राज्य’ हे नाटक लिहिले.’[29] मुंबईच्या व्यवसायिक रंगभूमीवर हे नाटक आले. त्यांच्या अनेक सवंगड्यांना घेऊन त्यांनी हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणले होते. सयाजी शिंदे, सुहास पळशीकर, प्रमोद पवार, सुहास भालेकर, उत्कर्षा नाईक, तुषार दळवी

---

[27] सं. मड्गावंकर, विनय. “तिसर्य सहस्रकारंभी भरतीय नाट्य आणि नट्क्कार” *श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या 2000 नंतरच्या नाट्यसंहिता .* 2021 प्रु. 105

[28] .गोमंतकीया मराठी वंग्मयाचा ईतिहास खंड दूसरा. *नाटक.* गोमंतक मराठी अकादमी प्रकशन. प्रू.147

[29] वाघ, रामराव. वैयक्तीक मूलखत 12 मार्च 2024.

यासारख्या अनेक प्रतिभावंत कलाकारांनी या नाटकात काम केले होते. 'त्याकाळी विद्याधर गोखले यांच्यासारख्या प्रतिभावंत नाटककारांनी त्यांचे या नाटकासंदर्भात कौतुकही केले होते.'[30] 'दुर्दैवाने कलाकारांमधील शीतयुद्धामुळे नाटकाचे अपेक्षे एवढे प्रयोग होऊ शकले नाही. व्यवसायिक रंगभूमीवर पडद्यामागे चालणारी अनन्वित कटकारस्थाने पाहून ते उद्विग्न झाले आणि मुंबई सोडून गोव्याला परतले'[31] 'त्यांनी २००० पर्यंत ४८ नाटकांचा भला मोठा संच निर्माण केलेला आहे.'[23] यात प्रायोगिक रंगभूमीसाठी लिहिलेल्या एकांकिका, नाटके आणि व्यवसायिक रंगभूमीसाठी लिहिलेली नाटके सुद्धा समाविष्ट आहेत.

विष्णू सूर्या वाघ यांचे 'तुका अभंग अभंग' हे नाटक अजरामर ठरले. साल २००० नंतरच्या काळात त्यांनी 'सं. युद्ध नको मज बुद्ध हवा', 'चार बापांचा मुलगा', 'आदित्यचक्षू', 'हांगा जाय जातीचें', 'शिवगोमंतक', 'मी बाई दगुड फोडते', 'तीन पैशांचें तीयात्र', इत्यादी नाटके लिहिली.

२.३.१ उपलब्ध साधनांनुसार प्राप्त झालेल्या विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या नाटकांची सूची.

| क्र. | मराठी | क्र. | कोंकणी |
|---|---|---|---|
| १ | एका माणसाचा मृत्यू | १ | सुंवारी |
| २ | धर्मश्री | २ | धरणगाज |
| ३ | समुद्रपक्षी | ३ | वक्षक |
| ४ | साम्राज्य | ४ | दोगरा माथ्यार पेंटला उजो |
| ५ | माझ्या मातीचे गायन | ५ | हांगा जाय जातीचें |
| ६ | वक्षक | ६ | पेद्रू पडलो बांयत |
| ७ | तुका अभंग अभंग | ७ | फांतोडफूल |
| ८ | स्मशानवेद | ८ | तीन पैशांचो तियात्र |
| ९ | पुन्हा एकदा | ९ | ल्हेमटो मनीस |
| १० | चार बापांचा मुलगा | १० | परत एकदां |
| ११ | घर थकलेली एकाकी | ११ | जय हो |

[30] वाघ, रामराव. वैयक्तीक मूलखत 12 मार्च 2024

[31] सुर्या, वाघ. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. पृ.*

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | भगव्या मातीचा माणूस | १२ | हॅलो हांव उलयतां |
| १३ | शिवगोमंतक | १३ | तीन तिके अमुरपिके |
| १४ | आदित्यचक्ष | १४ | लोकांफुडें हांव |
| १५ | मगधमया | | |
| १६ | नोट लावीन तिथं गुदद्धा | | |
| १७ | बाई मी दगूड फोडते | | |
| १८ | प्राचीवर ये भास्करा | | |
| १९ | वैराग्यमठ | | |
| १२ | पुन्हा एकदा | | |
| १३ | भगव्या मातीचा माणुस | | |
| १४ | घर थकले एकाकी | | |
| १५ | स्मशानवेल | | |

## २.४ विष्णु वाघ आणि कवीता

विष्णू वाघ यांचे वडील सूर्या वाघ हे नाटककार होते. ते त्यांच्या नाटकांमुळे नेहमीच घराबाहेर राहत असत या दरम्यान त्यांच्या आई घरातील सगळा कारभार सांभाळायच्या. घरातला सगळा कारभार सांभाळत त्यांच्या शेतातील अनेक विविध कामही त्या करायचे. त्यांच्या साथीला ही लहान भावंड ही जायची तिथे विष्णू वाघांना त्यांच्या कवितेतील निसर्ग सापडला. लोकगीतांची पारायण करता करता त्यांना त्यांच्यामध्ये असलेल्या कवी मनाची जाणीव झाली आणि लहानपणापासूनच ते कवितेच्या विश्वात रमायला लागले. लहानपणापासूनच ते कविता लिहायचे. त्यांच्या कविता वाचून कुसुमाग्रजांनी सुद्धा त्यांना शाबासकी दिली होती आणि "भविष्यात तू मोठा कवी होशील"[32] आशी भविष्यवाणी ही केली होती. त्यानंतर महाविद्यालयीन जीवनातही अनेक कविता संमेलनांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. कविता लिहून सादर करण्यात त्यांनी कौशल्य प्राप्त केले होते. अनेक स्पर्धेत त्यांनी बक्षीसे प्राप्त केली आणि कवी सृष्टी आपली एक ओळख निर्माण केली. पुढे १९८७ नंतर बरीच वर्षे कामाच्या व्यापामुळे त्यांनी कवितेकडे दुर्लक्ष केले पण, २००२ नंतर ते मुंबई शहरात राहायला गेले आणि त्यांच्यातील कवी मनाला पुन्हा उभारी आली. या काळात त्यांच्या संपर्कात अनेक कवी आले. त्यांनी

---

[32] सुर्या, वाघ. *नाट्यसूर्या*. *श्रृश्टी प्रकाशन. मार्च 2019. पृ. 57*

अरुण म्हात्रेच्या कवी क्लब मध्ये आपले जाणे वाढवले. तिथे त्यांचा संपर्क रामदास फुटाणे, महेश केळुसकर यांसारख्या व्यक्तींशी झाला. या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र गोमंतकच्या विविध भागात कवी संमेलनांमधून आपल्या विल्होभनीय वक्तृत्व शक्तीतून स्वयंरचित कवितांना सादर केले. त्यांच्या कवितांमधून गोमंतकीय लोकसाहित्याचा गंध दरवळतो. ते स्वतः आपल्या कवितांविषयी स्पष्ट करतात की, "आईच्या गळ्यातून निघणाऱ्या अत्यंत सुरेल ओव्या मी धालांच्या मांडावर ऐकल्या. या धालांतच मला माझी कविता सापडली. त्या कवितेत लय उतरली. तिची शब्दकळा ही माझ्या वडिलांची देण. कुठेही गेलो तरी त्यांचे हे ऋण व्यक्त केल्याशिवाय मला राहवत नाही. माझी कविता ही साधी, सरळ, सोपी आहे. कारण अंत:करणाच्या गाभ्यातून ती आलेली आहे. ती दुर्बोध नाही याचा मला अभिमान आहे."[33] त्यांचा पहिला कविता संग्रह 'झिंझीर-झिंझीर' सांज हा २१ नोव्हेंबर २००३ मध्ये प्रकाशित झाला. पणजी कला अकादमीत झालेल्या 'आनंद स्वारी' या सोहळ्यात या कवितासंग्रहाचे प्रकाशन पार पडले. त्याच वर्षी एप्रिल महिन्यात या पुस्तकासाठी त्यांना दि गोवा हिंदू असोसिएशन या संस्थेतर्फे कविवर्य बाब बोरकर पुरस्कार जाहीर झाला. सप्टेंबर महिन्यात त्यांना हा पुरस्कार मुंबईमध्ये बहाल करण्यात आला. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांची कविता बऱ्याच दिग्गज व्यक्तींकडे पोहोचली ती लोकप्रिय झाली. त्यानंतर झिंजीर झिंजीर सांज, फील गुड फेणी, सुशेगाद, वाघनखे, लोकोपनिषद, बच्चूभायची वाडी, सूदिरसूक्त (कोंकणी) इत्यादी अनेक कवितासंग्रहांच्या माध्यमातून ते कवीप्रेम्यां समोर येत राहिले.

## २.५ विष्णु वाघ आणि आध्यात्म

विष्णू वाघाचे वडील सूर्या वाघ हे तसे देवभक्ती रस घेणारे नव्हते, त्यांच्या गावात होणाऱ्या कीर्तन तिथे त्यांना भेटणाऱ्या अनेक कविता बुवांच्या संपर्कात होते. त्यांच्या मधले आध्यात्मिक कुतूहल वाढू लागले होते. याच वयात त्यांचा संपर्क पद्मनाभ संप्रदायाशी आला. त्यांची चुलत आजी सावित्री, चंद्रभागा व आत्या केसर या सर्वजणी दत्त पद्मनाभ पीठाच्या अनुयायी होत्या व त्यामुळे त्यांच्या घरी व कुटुंबामध्ये पद्मनाभ संप्रदायाचा वार होत असे. इथे त्यांचा अध्यात्मिक पांडा झाला. पद्मनाभ संप्रदायाच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी अनेकविध श्लोकांचे पठण करायला सुरुवात केली. "श्रावण महिन्यामध्ये गावामध्ये ठिकठिकाणी होणारी ग्रंथपारायणे, त्यामध्ये ओवी गाऊन दाखवणे व त्याचा अर्थ सांगणे या दोन कामांमध्ये गावातील काही जाणकार मंडळीचा सहभाग होत असे. बाबा त्याठिकाणी जायचा. आणि तो हळूहळू ओव्या गाऊन दाखवायचं काम करू लागला. कालांतराने ओव्यांचा अर्थदेखील तो बालवयात उलगडून दाखवू लागला."[34] या ओढीनेच त्यांनी नाट्यपुराण, हरिविजय आदी ग्रंथ वाचून काढले. 'त्याच्या हट्टामुळे मग त्यांच्या घरी त्यांच्या वडलानी

---

[33] सुर्या, वाघ. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. प्रू.*

[34] "नवप्रभा" *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

हरिविजयची प्रत आणून, पारायणाचा कार्यक्रम केला व त्याची सांगता शेवटी यांच्या घरी गोकुळाष्टमी करून करण्यात आली.'[35] हळूहळू त्यांना या दैवी सेवेत रस वाटू लागला. ते श्लोक पठण करायचे त्यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करायचा. वाढत्या वयाबरोबर त्यांना या श्लोकांचे अर्थ आपोआपच समजायला लागले आणि त्यांनी पारायण करायला सुरुवात केली. एक काळ असा होता ज्यावेळी ते पद्मनाभ संप्रदायाच्या अनेक एखादा आमच्या घरी पारायण करायला जायचे. त्याकाळी लोकांनी त्यांना दैव स्वरूपच मानले होते. आकर्षित वक्तृत्व कौशल्याने आणि अध्यात्माच्या गहन अभ्यासाने उत्तम दिलेली ही पारायणा असायची. दत्त पद्मनाभ पिठाचे त्याकाळचे पिठादेश पद्मनाभ स्वामी यांच्याशी त्यांचे कनिष्ठ संबंध होते. पण काही कारणास्तव या संप्रदायाचा आणि विश्व सूर्य वाघ यांचा दुरावा निर्माण झाला आणि वाघांचा आध्यात्मिक प्रवास लेखणीतून उमटू लागला.

## २.६ विष्णु वाघ आणि राजकारण

विष्णू वाघांच्या महाविद्यालयीन आयुष्यातूनच त्यांच्या आतला नेता तयार होऊ लागला होता. पणजी येथील स्थित असलेल्या 'धेम्पे कॉलेजमध्ये' त्यांनी रसायन शास्त्र आणि जीवन शास्त्र या विषयात बीएससी पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेतला. या महाविद्यालयात त्यांचा परिचय अनेक विद्यार्थी संघटनांची येत गेला. ते प्रथम वर्षामध्ये असतानाच त्यांनी या महाविद्यालयात 'क्रिएशन्स' हे विद्यापीठयस्तरीय स्पर्धात्मक कार्यक्रमाचा सोहळा सुरू केला. त्यानंतर दुसऱ्या वर्षी ते त्या महाविद्यालयाचे कल्चरल सेक्रेटरी झाले आणि तिसऱ्या वर्षी ते जनरल सेक्रेटरी. या काळात त्यांनी अनेक संघटनांच्या माध्यमातून काम केले. विद्यार्थी चळवळीत सक्रिय राहून तत्कालीन विद्यार्थ्यांना होणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यासाठी अनेक मोर्चामध्ये भाग घेतला. अखिल गोवा विद्यार्थी संघटना, पी एस यु यासारख्या अनेक संस्थांची त्यांचे घनिष्ठ संबंध होते. 'कॅपिटेशन कॉलेज आंदोलन' यासारख्या अनेक आंदोलनामध्येही ते सहभागी व्हायचे. महाविद्यालयाच्या विद्यार्थी संघटनेमध्ये ते शेवटच्या वर्षी जीएस झाले. आणि त्या महाविद्यालयात होणाऱ्या 'क्रिएशन्स' या स्पर्धेला वेगळा आयाम प्राप्त झाला. या काळात त्यांना महेश सुमन सारखे मित्रांचा सहवास लागला. त्यानंतर ते विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी दाखल झाले. तिथेही त्यांनी आपल्या नेतृत्वाने आणि कर्तृत्वाने अनेक उपक्रम राबविले. या काळात त्यांचा संबंध नंदकुमार कामत यांच्याशी आला.

विद्यापीठात चळवळीत सहभाग घेऊन विद्यार्थी दशेत स्वतःमधील नेतृत्वाला उभारी देणारे विष्णू सूर्या वाघ राजकारणात १९९० मध्ये आले. शिवसेने मधून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर मगो, काँग्रेस, आणि भारतीय

[35] "नवप्रभा" *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

जनता पार्टी या पक्षामधून त्यांनी राजकारण केले. "१९९४ मध्ये भाई खलप यांनी विष्णु वाघ यांना मगो पक्षात घेतले आणि ऐन निवडणुकीच्या अगोदर त्यांना पक्षाचे प्रवक्तेही बनविले. भाजपच्या कट्टर विरोधातील विचारसरणीच्या या नेत्याला मगो-भाजप दरम्यान झालेली युती पसंत तर नव्हतीच शिवाय भंडारी समाजाचे नेते रवी नाईक यांच्या कट्टर विरोधात आपली लेखणी झरविलेल्या या वाघ यांनी अचानक एक दिवस काँग्रेस पक्षात प्रवेश करून रवी नाईक यांचा प्रचार करावयाला प्रारंभ केला आणि विष्णु वाघ नावाच्या उगवत्या राजकीय नेत्याच्या प्रतिमेलाच तडे गेले. वाघ यांना मडकईमध्ये जनतेने झिडकारले व रवी नाईक यांचाही दणक्यात पराभव झाला. श्रीपाद नाईक विजयी झाले. कालांतराने काँग्रेस पक्ष सोडला. शिवसेनेत गेले. शिवसेना सोडली. पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेले. तेथून पुन्हा काँग्रेस व नंतर थेट भाजपमध्ये प्रवेश केला."[36] २०१२ यावर्षी ते सांतआंद्रे मतदारसंघातून १२१९ च्या आघाडीने निवडून आले. यानंतर पाच वर्ष त्यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. गोवा विधानसभेचे सभापती, गोवा मनोरंजन सोसायटीचे अध्यक्ष, कला अकादमीचे अध्यक्ष यासारखी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी या काळात भूषविली. २०१८ मध्ये कला अकादमी मध्ये झालेले 'काव्यहोत्र' असो वा त्या काळात लोकप्रिय झालेले 'सरकार विरोधाचे गाराणे' असो यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून ते नेहमीच चर्चेत राहिले. त्यांच्या वक्तृत्व कौशल्याचा यथोचित वापर करून ते राजकीय सभांमध्ये आकर ठरायचे.

## २.७ आजारपण आणि मृत्यू

मे २०१६ साली कार्यक्रमात असताना त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आला. त्याच्यावर योग्य उपचार झाले आणि त्यांना घरी पाठवण्यात आले. डॉक्टरानी त्यांना आता आरामाची गरज आहे आशी सूचना केली होती. त्यांनी त्यांची सूचना न ऐकता पुन्हा कामात व्यस्त राहणे पत्करले. मराठी भाषेसाठी आपला पुनर्जन्म झाला असे त्यांचे मत होते. याच अनुषंगाने त्यांनी आखणी करायला सुरुवात केली आणि ते त्यांच्या कामात व्यस्त झाले. याच दरम्यान त्यांनी रेकॉर्ड ब्रेक करणारे काव्य संमेलन गोवा कलाकादमीमध्ये काव्य होत्र या नावाने भरविले. या दरम्यान त्यांची खूप धावपळ झाली, रात्री ची जागरण झाली आणि त्यांना १५ ऑगस्ट २०१६ या दिनी दुसरा हृदयविकाराचा झटका आला. यावेळेस मात्र ते खूप आजारी पडले गोवा वैद्यकीय महाविद्यालयात त्यांना दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांना मुंबईतील कोकिळाबेन इस्पितळात नेण्यात आले तिथे त्यांच्यावर बरेच दिवस उपचार झाले आणि त्यांना पुढील उपचारासाठी घरी पाठवण्यात आले. "आजारपणातून बाहेर येऊ न शकल्याने त्यांच्या कुटुंबियांनी त्यांना ईश्वरी प्रार्थनेच्या बळावर बरे करण्याच्या इराद्याने

[36] "नवप्रभा" *विष्णू सूर्या वाघ यांचे दक्शिण आफ्रिकेत निधन.* 14 फेब्रूवारी 2019 प्रु.1

दक्षिण आफ्रीकेतील जोहान्सबर्ग व केपटाऊन येथे नेले होते."[37] आणि शेवटी ८ फेब्रुवारी २०१९ मध्ये त्यांना दक्षिण आफ्रिकेत स्वर्गवास झाला.

## २.८ विष्णू सूर्या वाघ यांची प्रकाशित पुस्तके

| क्र. | पुस्तकाचे नाव | साहित्य प्रकार | प्रकाशक | प्रथम आवृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | शब्दकुंड | एकांकिका संग्रह | रुद्रेश्वर पणजी प्रकाशन | १९ ऑगस्ट २००० |
| २ | तुका अभंग अभंग | नाटक | पार्थ प्रकाशन | सप्टेंबर २००० |
| ३ | झिजीर झिजीर सांस | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | २१ नोव्हेंबर २००३ |
| ४ | फिल गुद फेणी | कवितासंग्रह | अपक्ष प्रकाशन | फेब्रुवारी २००४ |
| ५ | सुसेगाद | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | २९ फेब्रुवारी २००८ |
| ६ | वाघ नखे | कवितासंग्रहा | इंदु सूर्या प्रकाशन | ३० मार्च २००८ |
| ७ | शिवगोमंतक | नाटक | इंदु सूर्या प्रकाशन | ३० एप्रिल २००८ |
| ८ | बच्चूभायची वाडी | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | ३१ में २००८ |
| ९ | पर्जन्यधून | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | २४ जुलै २००८ |
| १० | आदित्यचक्षु | नाटक | इंदु सूर्या प्रकाशन | २६ सप्टेंबपर २००८ |
| ११ | लोकोपनिषद | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | १९ जून २००९ |
| १२ | नचिकेतास | एकांकिका संग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | २२ मार्च २०१३ |
| १३ | सुदीरसूक्त | कवितासंग्रह | इंदु सूर्या प्रकाशन | ३१ जानेवारी २०१३ |
| १४ | रक्तपर्जन्य | एकांकिका संग्रह | सुष्टी प्रकाशन | ३१ जानेवारी २०१३ |
| १५ | तीन पैशांचो तियात्र | नाटक | इंदु सूर्या प्रकाशन | २७ मार्च २०१३ |
| १६ | एका सुरश्रीची कथा | चरित्र | कला अकादमी गोवा | ०८ नोव्हेंबर २०१३ |
| १७ | हे सुरांनो जितेंद्र व्हा | चरित्र | सुष्टी प्रकाशन | मार्च २०१९ |
| १८ | नाट्यसूर्य | चरित्र | सुष्टी प्रकाशन | मार्च २०१९ |
| १९ | सळ सळ पिंपळ पानांची | चरित्र | उत्तरा नरेंद्र गावकर | नोव्हेंबर २०२३ |

[37] "नवप्रभा" *विष्णू सूर्या वाघ यांचे दक्शिण आफ्रिकेत निधन.* 14 फेब्रूवारी 2019 पृ.1

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | ती बाई मीच आहे | दीर्घ काव्य | सृष्टी प्रकाशन | |

## २.९ विष्णू सूर्या वाघ यांना प्राप्त झालेले पुरस्कार

- दमाणी पुरस्कार, सोलापूर.
- बा. भ. बोरकर पुरस्कार, मुंबई.
- यशवंतराव चव्हाण पुरस्कार, पुणे.
- पुणे फेस्टीवल सन्मान.
- धनंजय कीर पुरस्कार, मुंबई.
- रणजित देसाई पुरस्कार, कोबाड.
- युवा चेतना पुरस्कार.
- गोमंत विद्या निकेतन पुरस्कार.
- गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार.
- कला अकादमी नाट्य लेखन पुरस्कार.
- गोवा रत्न पुरस्कार.
- राज्य युवा पुरस्कार, गोवा राज्य.
- विद्या वाचस्पती पुरस्कार.
- आचार्य पि.के. अत्रे साहित्य पुरस्कार.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणात विष्णू सूर्या वाघ यांच्या जीवनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. या प्रकरणात त्यांच्या जीवनात घडलेल्या प्रमुख घटनांचे उल्लेख आलेले आहे. साहित्य, राजकारण, समाजकारण, अध्यात्म आणि पत्रकारिता यासारख्या

विविध क्षेत्रात मुशाफिरी करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाच्या आयुष्यातील महत्त्वाच्या क्षणांची नोंद या प्रकरणात केलेली आहे. या प्रकरणाच्या आधारे त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांच्या जीवनाचा आणि साहित्याचा समन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

त्यांच्या जीवनाचा आढावा घेतल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की त्यांनी ज्या क्षेत्रात काम केले तिथे त्यांनी प्राविण्य मिळविले. परिणामांची फिकीर न करता त्यांनी विशिष्ट प्रसंगी योग्य वाटणारी भूमिका घेतली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकाच वेळी ते अनेक क्षेत्रात वावरत असल्यामुळे त्यांच्या आयुष्यात अस्थिरता निर्माण झाली होती. त्यांच्या शिक्षणाचे नंतरचे जीवन म्हणजे त्यांच्या बालपणात त्यांना मिळालेल्या शिकवणीचे प्रतिबिंब, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यांच्या वडिलांच्या विचारांचा त्यांच्यावर गाढा प्रभाव होता. त्यांची आई लोककलेत पारंगत असल्यामुळे सहाजिक त्यांच्यातही ते गुण अवतरले.

त्यांच्या आयुष्यात होणाऱ्या विविध घटनाक्रमांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव होत गेला आणि त्यातून ते घडत गेले हे नक्की. म्हणूनच विद्यार्थी दशेतले विष्णू सूर्या वाघ आणि २००४ नंतरचे विष्णू सूर्या वाघ यात फरक जाणवतो. एकाच व्यक्तीकडे जेव्हा विविध क्षेत्रात तितक्याच परिणामकारकतेने काम करण्याची क्षमता असते तेव्हा त्याच्या मनात द्वंद्व निर्माण होते आणि तो अस्थिर होतो. असेच काहीसे विष्णू वाघांच्या बाबतीतही घडले. विविध क्षेत्रात पारंगत असल्यामुळे त्यांना एखद्याक्षेत्रात अपेक्षित उंची गाठता आले नाही. त्यांच्या संपूर्ण जीवनात योग्य आणि निरपेक्ष भावनेने मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकाची उणीव भासते.

त्यांनी अनेक चळवळीत आपले योगदान दिले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी भाषेला राजभाषा करण्यासाठी ते वावरत होते. ते मराठी प्रेमी असले तरी कोंकणी भाषेशी त्यांचा द्वेष नव्हता. “गोव्यात मराठी इतकीच कोंकणी रुजलेली आहे किंबहुना मराठी ही लोकांची पत्रव्यवहाराची भाषा आहे आणि कोंकणी ही बोली आहे.”[38] असे त्यांचे ठाम मत होते.

## निष्कर्ष

- विष्णू सूर्या वाघ हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.
- ते ज्या क्षेत्रात गेले त्या क्षेत्रात त्यांनी प्राविण्य प्राप्त केले.
- त्यांच्या बालवयात त्यांच्यावर झालेल्या संस्काराचे पडसाद त्यांच्या पुढील आयुष्यात दिसतात.

[38] Youtube

- त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेकविध क्षेत्रात काम केले पण, त्यापैकी ते साहित्यिक म्हणून प्रभावी दिसतात.
- राजकारण, वक्तृत्व, अध्यात्म, समाजसेवा, नाटक, कविता यासारख्या अनेक क्षेत्रात त्यांनी जरी काम केलं असलं तरी त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांच्यातला पत्रकार डोकावतो.
- विष्णू वाघ यांच्या वडिलांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला .
- २००२ – २००४ या काळात त्यांच्यातील कवी मनाला उभारी आली.
- एकाच वेळी अनेक क्षेत्रांमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांच्या साहित्य रचनेवर परिणाम झालेला आहे.

## संदर्भा सुची


[1] सं. मडगावकर, विनय. “तिसर्य सहस्रकारंभी भरतीय नाट्य आणि नट्क्कार” *श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या 2000 नंतरच्या नाट्यसंहिता* . 2021 प्रु. 105

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु. 08

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु. 08

[1] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या* . *श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 64*

[1] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या* . *श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 29*

[1] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या* . *श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019* प्रू.56

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या* . *श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019 प्रू. 57*

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. प्रू.*

[1] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[1] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[1] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[1] वाघ, विष्णु. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019.प्रू.*

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] सं. मड्गावंकर, विनय. “तिसर्य सहस्रकारंभी भरतीय नाट्य आणि नट्क्कार” *श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या 2000 नंतरच्या नाट्यसंहिता* . 2021 प्रु. 105

[1] .गोमंतकीया मराठी वंग्मयाचा ईतिहास खंड दूसरा. *नाटक.* गोमंतक मराठी अकादमी प्रकशन. प्रू.147

[1] वाघ, रामराव. वैयक्तीक मूलखत 12 मार्च 2024.

[1] वाघ, रामराव. वैयक्तीक मूलखत 12 मार्च 2024

[1] सुर्या, वाघ. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. प्रू.*

[1] सुर्या, वाघ. *नाट्यसूर्या* . *श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. प्रू. 57*

[1] सुर्या, वाघ. *फील गूड फेणी. श्रूश्टी प्रकाशन. मार्च 2019. प्रू.*

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] “नवप्रभा” *सर्वांना नादाला लावणारा बाबा* . 17 फेब्रूवारी 2019 प्रु.08

[1] “नवप्रभा” *विष्णू सूर्या वाघ यांचे दक्शिण आफ्रिकेत निधन.* 14 फेब्रूवारी 2019 प्रु.1

[1] “नवप्रभा” *विष्णू सूर्या वाघ यांचे दक्शिण आफ्रिकेत निधन.* 14 फेब्रूवारी 2019 प्रु.1

[1] Youtube

# अनुक्रमणिका

प्रस्तावना........48

३.१ कविता........49

३.१.१ आषय सूत्र........50

३.१.२ भाषा शैली........55

३.१.३ अविष्कार तंत्र/ वांग्मयीन मूल्यमापन........56

३.२ नाटक........59

३.२.१ आशय........60

३.२.२ पात्र........63

३.३ चरित्र........66

३.३.२ नाट्यसूर्य........68

३.३.३ सळसळ पिंपळपानांची........68

३.३.४ हे सुरांनो जितेंद्र व्हा!........70

३.४ चिकित्सक अभ्यास........70

समारोप........72

निष्कर्ष........73

संदर्भ सुची........75

प्रस्तावना

विष्णू सूर्य वाघ हे गोव्यातील एक प्रतिभावान लेखक आणि साहित्यिक होतेत्यांच्या साहित्याच्या माध्यमातून . गोमंतकिय संस्कृतीचे आणि तिथल्याआगळ्यावेगळ्या अशा लोकसाहित्याचे दर्शन घडतेविष्णू वाघ यांनी आपल्या . वेगवेगळ्या विषयांना अनुरूप अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांच्या .साहित्याच्या माध्यमातून अनेक विषय हाताळले आहेत मराठी सा .माध्यमातून त्यांनी मराठी आणि कोकणी साहित्य विश्वात आपले योगदान दिलेहित्य विश्वाला त्यांनी दिलेले योगदान विशेष महत्त्वाचे आहेकविता आणि चरित्र यांच्या माध्यमातून मराठी साहित्य विश्वात भर ,त्यांनी लिहिलेली नाटके . त्यांच्या साहित्याचे विशेष महत्त्व म्हणजे त्यांनी त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून वापरलेली कोंकणी .पडलेली आहेमराठी शिम्रीत भाषासहाजिकपणे साहित्याच्या मागणीनुसार ही भाषा बदलत जाते पण त्यांच्या काही कविता संग्रहांच्या . या प्रकरणाचे मुख्य उद्दिष्ट त्यांच्या साहित्यातील .माध्यमातून त्यांनी मराठी वाचकांसमोर प्रस्तुत केलेली भाषा विशेष आहे उच्चतम बिंदूचा शोध घेणे आणि त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्यांचा शोध घेणे असा आहे.

प्रकरण दोन मध्ये आलेल्या विवेचनात वाघांच्या व्यक्तिगत जीवनाची आणि त्यांच्या जीवनात घडलेल्या महत्त्वाच्या प्रसंगांची माहिती प्राप्त होतेयाच न .त्या माहितीचे आणि या प्रकरणात येणाऱ्या माहितीचे खास नाते आहे .त्याला स्पष्ट करणारे विवेचन या प्रकरणात करण्यात येईलदोन्ही प्रकरणांचा आधार घेऊन या प्रकरणात लेखकाच्या जीवनाचा आणि . .त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा समन्वय शोधण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे

विष्णू सूर्या वाघ यांनी प्रामुख्याने तीन साहित्य प्रकारांमधून लेखन केलेनाटक आणि चरित्र लेखन ,कविता . त्यांच्या साहित्याचा वांग्मयीन मूल्यानुसार .यांमधून त्यांनी आपल्या विचारांना लोकांसमोर प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आणि चिकित्सात्मक अभ्यास करून त्यांनी त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून मांडलेल्या विचारांची आणि त्यांच्या साहित्यरचनेचा स्थर स्पष्ट करण्याचा प्रयत्न या प्रकरणाच्या माध्यमातून केला जाईल.

या प्रकरणाचे मुख्य उद्दिष्ट विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या साहित्याचा स्थर तपासून त्यांच्या साहित्य प्रेरणेचा शोध घेणे असा आहे.

## ३.१ कविता

विष्णू सूर्या वाघ यांचा मराठी कविता विश्वात पदार्पण झाले ते त्यांच्या .या कवितासंग्रहाने ’झिंजिर झिंजिर सांस‘ मध्ये जरी प्रकाशित झाला असला तरी त्या आधीपासून ते कविता २००३ हा कवितासंग्रह ’झिंजिर झिंजिर सांस‘ त्यांचा लिहायचे आणि त्या कवितांचे सादरीकरण अनेक कविता संमेलनाच्या माध्यमातून करायचेमुळात त्यांच्या कविता . .पुस्तकात छापलेल्या शब्दांपुरती मर्यादित नसून त्यांची रचना समाज प्रबोधन आणि समाज दर्शनासाठी केला गेलेला आहे या कवितासंग्रहात त्यांनी गोमंतकीय लोकजीवनाचे लोक संस्कृतीचे आणि गोमंतकाला लाभलेल्या परंपरेचे दर्शन घडविले हे कविता संग्रह गोमंतकीय लोकजीवन आणि इथल्या निसर्ग वर्णनाला ’सुशेगाद‘ आणि ’झिंजिर झिंजिर सांस‘ त्यांचे .आहे व्यक्तिचित्रणपर आणि समाज प्रबोधनासाठी लिहिलेल्या ,या संग्रहांमध्ये अपवादाने काही रोमँटिक .समर्पित आहेत ’बच्चूबायची वाडी‘ त्यांनी लिहिलेल्या .कवितांचा समावेश आहे, आणि या कवितासंग्रहांमधून तत्कालीन ’ती बाई मीच आहे‘ तिथल्या समाजाचे त्याचबरोबर समाजात वावरणाऱ्या प्रवृत्तींचे .गोमंतकीय आणि महाराष्ट्रातील मुंबई प्रदेशाचे दर्शन घडते ही कविता ’माझा गणेश‘ या कवितासंग्रहात आलेली ’बच्चूबायची वाडी‘ मात्र .दर्शन या संग्रहांच्या माध्यमातून घडत जाते .यांना अपवाद ठरते‘फील गूड फेणी’, गोवा आणि एकंदर ,हे त्यांचे कविता संग्रह मुंबई ’लोकोपनिषद‘ आणि ’वाघ नखे‘ .राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या राजकीय घडामोडींवर केलेली टीका आहे

आपल्या कविता संग्रहांच्या माध्यमातून विष्णू वाघ यांनी गोमंतकीय लोक जीवनाच्या दर्शनाने आणि गोमंतकाला लाभलेल्या जाज्वल्यपूर्ण इतिहासाच्या पुनरावृत्तीने कविता लेखन करण्यास सुरुवात केली ’झिंजिर झिंजिर सांस‘ त्यांच्या . कोकणी .या कवितासंग्रहामध्ये काही कवितांमधून त्यांनी गोमंतक आणि तिथल्या भाषा वैविद्याचे दर्शनही घडविले आहे आणि मराठी या दोघी भाषा भगिनींचे समिश्र रूप या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जगभराला दाखवून दिले . .त्यामुळेच कदाचित त्यांच्या या कवितासंग्रहाला मराठी कविता विश्वातील महत्त्वाचे मानले जाणारे दोन पुरस्कार प्राप्त झाले आपल्या कवितेला त्यांनी गोमंतकीय लोकज ीवन आणि गोमंतकीय समाजा पुरती मर्यादित न ठेवता महाराष्ट्रातील मुंबई प्रदेश आणि राष्ट्रीय पातळीवरील समाजिक घडामोडींचाही त्यांनी या कवितेत समावेश केलेला आहेत्यांच्याविषयी बोलत . तर ते .कवी विष्णू सूर्या वाघ हे केवळ कवी नाहीत“ असताना अरुण म्हात्रे म्हणतात कीएक वैशिष्ट्यपूर्ण नाटककार , सामाजिक कार्यकर्ता आणि निसर्गात आणि माणसात रमलेले दिलखुलास असे ,गायक ,दिग्दर्शक ,नट ,चरित्रकार ,पत्रकार या विविध रंगी व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या बहुप्रसवा प्रतिभेचे विविध पैलू कवी वाघांच्या कवितेत .बहुरंगी व्यक्तिमत्व आहे आपल ्याला पहायला मिळतात.”[39]

---

[39] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र. ११

३.१.१ आषय सूत्र

कवी विष्णू सूर्या वाघ यांचे एकूण आठ मराठी कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेया कवितासंग्रहांच्या . .माध्यमातून त्यांनी हाताळलेले विषय वैविध्यपूर्ण आहेत‘झिंजिर झिंजिर सांसया कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी ’ गोमंतकीय संस्कृतीचे तिथल्या समाजाचे आणि रूढी परंपरांचे त्याचबरोबर लोकजीवन आणि लोक साहित्याचे दर्शन घडविलेले आहेया दोनही .मध्ये प्रकाशित झाला २००८ याच संग्रहाचा तोलामोलाचा असा त्यांचा सुसेगात हा कवितासंग्रह . कविता संग्रहाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन गोमंतकीयप्रदेशाचे वर्णन केलेली आहेहे वर्णन करत असताना ते कधी . गोमंतकात सुप्तपणे वावरणाऱ्या जातीप्रथांचा ते .स्मृती रमण करतात तर कधी वाचकांना वास्तवाचे दर्शन करून देतात .तितक्याच कळकळीने खुलासा करतात आणि तिथल्या लोकजीवनाचा आणि लोकसाहित्याचा अभिमानही ते बाळगतात

१“ ९८६ साली गोव्यात कोकणीखुद्द माझ्या डोंगरी गावात गावकरी .मराठी भाषावादावरून तणाव निर्माण झाला- आम्ही मराठीसाठी .या भांडणात काही मुलांचे प्राण गेले .व पलीकडच्या आगशी गावातले लोक यांच्यात मारामारी झाली आगशीमधली म .त्या दंगलीचा मीही एक साक्षीदार होतो .लढत होतोुलं मेली तेव्हा मला जबरदस्त धक्का बसला होता व माणसां .माणसांत भांडण होत असेल तर भाषा हवीच कशाला हा प्रश्नही मी माझ्या मनाला सारखा विचारीत होतो – ‘मायभास.या कवितेत विचारांची ही आंदोलनं प्रतिबिंबीत झाली आहेत ’”[40] या विष्णू वाघांच्या वक्तव्याच्या माध्यमातून या संग्रहात येणाऱ्या कवितांना लाभलेल्या भाषावादाच्या विषयाचाही उलगडा होतोएकंदर या दोन कवितासंग्रहांच्या . त्यांच्या इतिहासाचे किंबहुना ,तिथे होणाऱ्या सण उत्सवांचे ,तिथल्या समाजाचे ,माध्यमातून त्यांनी गोमंतकीय जीवनाचे गोमंतकीय प्रदेशाचे चौफेर दर्शन घडविलेले आहे .“’सटी’, ’लईराई‘, ,मातीचे देव‘’ ‘रुद्रभारया कवितांमधून आपल्याला ’ .काही प्रसिद्ध लोकदैवतांचं दर्शन होईल‘महाराजया कवितेत मठाचा बाजार झाल्यानंतर अध्यात्माचा बोजवारा कसा उडतो ’ व भक्तांची गर्दी समाधीच्या दर्शनाला लोटत असतानाही महाराज एकटेच कसे राहतात त्याबद्दलचा विषाद आहेतर दमाणी , .या कवितेत आहे ’स्वामी समर्थ‘ पुरस्कार स्वीकारल्यानंतर अक्कलकोटला गेलो असताना तिथे आलेला एक अनुभव”[41] त्यांच्या ’सुंवारी‘, ’इंत्रूज‘, ’धेंडलो‘, ’देवचार‘, ’भूतावळ‘, ’इंगर्ज‘, ’मेरी‘, यासारख्या कवितांच्या माध्यमातून ’रोंबाट‘ .गोमंतकीय लोक जीवनातील मिथकांचे दर्शन घडते‘घणचे कटर घण!’ ,‘रापणया कवितांच्या माध्यमातून ते गोमंतकीय ’ समाजाची किंबहुना गोमंतकातील बहुजन समाजाच्या झालेल्या दुरावस्थेचे वर्णन करतात .‘खोप’, ’म्हाताऱ्या‘, ’आईसोबत‘ हे स्मृती रमण फक्त त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यापुरतीच .यासारख्या कवितांच्या माध्यमातून ते स्मृती रमण करतात

[40] वाघ विष्णु, सुशेगाद, इंदु सुर्या प्रकाशन . फेब्रुवरी २००८, प्रु. अकरा

[41] वाघ विष्णु, सुशेगाद, इंदु सुर्या प्रकाशन . फेब्रुवरी २००८, प्रु. बारा

मर्यादित राहत नाही तर या स्मृती रमणांच्या माध्यमातून वाचकांना ते एक संदेश देण्याचा प्रयत्न करतात ."या माझ्या कवितेत दर्याच्या लाटांवर घामाची शिंपण करीत अवसेच्या ,च्या तालावर रापण ओढणारे खारवी आहेत'ओस्सय ओस्सय' हिरव्या शेतात हिरवाच घाम ,साखळ्या आहेत ,म्हारु ,काजळराती कराकरा वाहाणा वाजवीत चालत जाणारे देवचार वैर ,गाळणारी आई आहेभाव विसरुन गावच्या मांडावर छातीला छाती भिडवत ,'उधळा गुलाल ,म्हणणारे गावकरी आहेत ' ,चंद्राला डोळे मोडीत ढोल ताशा वाजवीत जाणारे वीर आहेत ,कुंवारी मातेच्या दुःखाचा हुंकार चेतवणारी सुंवारी आहे ,हरवलेल्या पावसाचा शोध घेणारा घेणलो आहे'आम्ही गे ईश्वराची आदिमाया 'म्हणणाऱ्या सरगींच्या देवरंभा आहेत , .ख्रिस्ताच्या गाभाऱ्यात घुमणारा कृष्णाचा पावा आहे ,किरणांची पिवळी टोपली घेऊन येणारी दिवसाची यल्लम्मा आहे"[42] हे त्यांचे वक्तव्य त्यांच्या कवितेचे विषय आणि आशय स्पष्ट करून देते .

'घन गरजत येते', 'पावस रोंबात', पाऊस झिंगत ये'तो', 'सागर सांज', 'जंगल हाक', 'अमोरवेळ', 'सैम संवार', !आले घन'' यासारख्या कवितांच्या माध्यमातून त्यांनी निसर्ग वर्णन केलेले आहेहे निसर्ग वर्णन करत असताना . त्यांच्या कवित .समाजातील वेग वेगळ्या घटकांच्या दृष्टिकोनातून हे निसर्गाचे वर्णन केले असल्याचे जाणवतोंच्या माध्यमातून त्यांचे आईवर असलेले प्रेम कळतेअगदी ,त्यांच्या आईने घेतलेल्या कष्टांचे साक्षीदार ते राहिले असल्यामुळे . हे सगळे विषय .सहाजिक आणि स्वाभाविकपणे त्यांच्या आईच्या कष्टाळू स्वभावाचे दर्शन या कवितांच्या माध्यमातून घडते हाताळताना काही कवितांच्यामाध्यमातून त्यांच्या मनातील रोमँटिक कवीही डोकावत राहतो हे मात्र खरे .'नरकासुर', 'लईराई', ,या कवितांच्या माध्यमातून गोव्यात साजरे होणारे सण उत्सवांचा उल्लेख ते करतात तर 'सटी'"जरा गोव्याला येऊन जा असे म्हणत ते शहरातील लोकांना दूर देशातील लोकांना गोव्याला "येण्याची निमंत्रण देतात .'शहरातला गावया ' कवितेच्या माध्यमातून ते धंद्या व्यवहारासाठी गावातून शहराकडे जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनातल्या भावना मांडतात तर 'करबट' यासारख्या कवितेमधून ते शहर आणि गावातला फरक वाचकांना स्पष्ट करतात 'शहर आणि गाव' कधी, मत्स्य'पुराणसारख्या कवितेतून ते 'भाटी' सारख्या कविता त्यांचे व गोमंतक यांचे मासळीवर असलेले प्रेम स्पष्ट करते तर ' त्या ,या दोन्ही संग्रहातील एकूण कविता नोस्टेजरी असून .गोव्यातील पारंपरिक फेणी काढण्याच्या प्रक्रियेचे वर्णन करतात विष्णू वाघांच्या एकूण जीवन प्रवासात त्यांना सापडलेल्या अनेक कथाभिजांचे वर्णन करतात म्हणूनच कजाती विष्णू वाघही त्यांना .म्हणून उद्भवतात 'काव्यकथी'

पर्जन्य धून हा त्यांचा कवितासंग्रह संपूर्णपणे निसर्ग वैशिष्ट्यांचे वर्णन करण्यासाठी समर्पित केलेला आहे . पावसाच्या वेगवेगळ्या रूपांच्या माध्यमातून निसर्गातील नैसर्गिक कृत्यांचा पर्यावरणात होणाऱ्या बदलांचा मानवाशी संबंध

---

[42] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र. ०८

जोडून या कविता आपले एक वेगळे रूप धारण करतातया कवितांचा .या कवितांना गोमंतकीय लोकगीतांची पार्श्वभूमी आहे . ,उगम सांगत असताना विष्णू वाघ म्हणतात "पावसाची अशी कितीतरी चित्रं मनाच्या कॅनवासवर रंगवून हृदयाच्या कप्प्यात मी जपून ठेवली आहेतबहुधा त्यामुळेच .ती कधी थांबलेली नाही .खूप खोलवर चालूच आहे ,ही पाऊसझड माझ्या आत . .राजकरणासारख्या रुक्ष क्षेत्रात वावरत असतानाही मी आतून खूप ओला राहिलो आहे"[43] या त्यांच्या निसर्ग कविता कधी रोमँटिक होतातातर क ,धी बहुजन समाजाचे दर्शन घडवून घेतातअनेक वेगवेगळ्या रूपकांच्या माध्यमातून समोर येणाऱ्या . .या कविता सामाजिक आणि संस्कृती विषयांना ही आपल्या सोबत घेऊन येतात

या दोन कवितासंग्रहांच्या माध्यमातून विष्णू सूर्या वाघ यांनी महाराष्ट्रातील 'वाघनखे' आणि 'फील गूड फेणी' मुंबई प्रदेश आणि राष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या राजकीय घटनांवर टीका केलेली आहे."तसं पाहिलं तर प्रस्तुत कवितासंग्रहातील अनेक कविता तात्कालिक राजकीय संदर्भावर आधारित आहेतपण त्यामुळे त्यांच्या आविष्काराचं मोल . वर्तमान घटनांवर तीव्रपणे प्रतिक्रियित .कमी होत नाही होणं हा या कवीचा लक्षवेधी गुणविशेष आहेआपली निरीक्षणं आणि . ,मिश्कीलपणा ,उपहास ,उपरोध .प्रतिक्रिया यांना प्रचारी स्वरुप येणार नाही याची काळजी विष्णू सुर्या यांनी घेतलेली आहे वाचकांच्या मनात जो तीव्र विचा ,विडंबना या माध्यमातून जो आशय ते व्यक्त करु इच्छितातर कल्लोळ निर्माण करतात त्याचं महत्व दुर्लक्षित करता येणार नाहीसमाजमनाला चोहोबाजूंनी घेरलेल्या भयाण वास्तवावर प्रहार करीत आपल्या . .मध्ये जागोजाग दर्शन देते 'फील गुड' ही या कविमनाची आस ,आसपास तरी नवी चेतना जागवावी"[44] हे महेश केळुसकर यांचे विधान विष्णू वाघ यांच्या या दोन संग्रहातील कवितांच्या आशय सूत्राचे स्पष्टीकरण 'फील गुड फेणी' आणि 'वाघनखे' या संग्रहाच्या .या कवितासंग्रहांच्या माध्यमातून कवीच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवेचा प्रत्यय येतो .देणारे आहे माध्यमातून त्यांच्यात सुक्तपणे दडलेल्या पत्रकाराचे दर्शन होतेकोणत्याही घटना प्रसंगावर अभ्यासू वृत्तीचे वक्तव्य . .या कवितेने होते 'रामदास वंदना' या कवितासंग्रहाची सुरुवात .आणि टिपण देण्याची त्यांची वृत्ती आगळी वेगळी अशी आहे रामदास फुटाणे यांचे व्यक्तिचित्रण करणारी आणि विष्णू वाघांच्या अंतरात्मक त्यांच्याविषयीची पार्थ भावना व्यक्त करणारी ही कविताया कवितेच्या माध्यमातून निवडणुकांच्या दरम्यान होणाऱ्या अनेक 'फील गूड फेणी' त्यानंतर . अशा टीकास्पद विधानाने या कवितेची "निवडणुकीचा सिझन आला राजा गातो गाणी" घडामोडींचे दर्शन त्यांनी केलेले आहे .सुरुवात होते

[43] वाघ विष्णु, पर्जन्यधून, इंदु सूर्या प्रकाशन, जुलै २००८, पृ.०३

[44] वाघ विष्णु, फिल गुड फेणी, अपक्ष प्रकाशन, फेब्रुवारि २०१४,

ढोंगी राजकारणीत् ,यांची फसवी आश्वासने आणि निवडणुकीच्या सीजनपुरतेच त्यांच्याकडून सर्वसामान्यांना सर्वसामान्यांना मिळणारे आयते वेतन यासारख्या अनेक विषयांना हाताळत ही कविता आकार घेतेया कवितेच्या . ?फील गुड की फील बेड' मागोमागच' या शीर्षकाची कविता मात्र मतदारांना सजग करताना दिसतेएका कवितेच्या . .माध्यमातून वास्तवाचे दर्शन आणि लगेच दुसऱ्या कवितेच्या माध्यमातून परिणामांचे दर्शन हे या संग्रहाचे वैशिष्ट्य'फील गुड की फील बेड?' या कवितेच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहेमतदान हे काही . पैशांच्या लालसेने केल्यामुळे देशाची आणि देशातील सर्वसामान्य नागरिकांची काय अवस्था होऊ शकते याचे दर्शन या कवितेच्या माध्यमातून केले गेलेले आहे .

'घराणेशाही', 'चालू नवरा भोळी बायको', 'हिंदुरुदय सम्राट', यासारख्या कवितांच्या 'मातोश्री ने काय केले' माध्यमातून राजकीय टीका करण्यात आलेली आहे तर ?मी मुंबईकर'' यासारख्या कवितांच्या माध्यमातून मुंबईतील वास्तवाचे दर्शन घडविले आहे .'श्री राम', 'काळे पाणी', 'चमत्कार', यासारख्या कवितांच्या माध्यमातून तत्कालीन 'बाजार' कालखंडात घडलेल्या घडामोडींवर कवी विनोदी स्वरूपाने धीर गंभीर टीका करतातही टीका वाचत असताना त्यांच्या . .मनातील आर्थ भावनेचे दर्शन घडते'फोटो बायोग्राफीसारख्या कवितेच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन समाजात निर्माण ' या कवितेची पार्श्वभूमी सांगत .झालेल्या एका वेगळ्याच आणि समाज स्थळ सापेक्ष अशा ट्रेंड चे दर्शन घडविलेले आहे असताना कवी म्हणतात की, "लहान माणसांनी आपल्या जीवनातले फोटो एका ठिकाणी संग्रहित केले तर त्यांना अल्बम म्हणतातमहाराष्ट्रात दोन वर्षांपूर्वी एक .पण मोठ्या माणसांचे फोटो एकत्र केले की त्याला फोटो बायोग्राफी म्हणतात . तिच्यापासून प ,फोटो बायोग्राफी भलतीच गाजली्रेरणा घेऊन आम्हीही फोटो बायोग्राफी काढायला गेलो पण...."[45] 'भाऊबंदकी' या कवितेच्या माध्यमातून वाघांनी तत्कालीन राजकारणाची परिस्थिती स्पष्ट केलेली आहे तर 'घराणे', यासारख्या कवितांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची झालेली छाळणी नमूद केलेली 'पिपाणी' आहे.

राजघाटावर श्रध्दांजली देऊन

सारे बगळे पळाले

महात्म्याचे सत्याचे प्रयोग

सत्तेच्या उन्हात जळाले! (वाघ नखे; गांधि आणि मुन्ना भाय )

---

[45] वाघ विष्णु, वाघ नखे, इंदुसूर्य प्रकशन, मार्च २००८ प्रु.१४

असे म्हणत ते सर्वसामान्य राष्ट्रभाव जागृत करण्याचा प्रयत्न करू इच्छिता आणि या कवितेच्या 'ड्राय डे' 'कारावेला' माध्यमातूननावाच्या जुगार खेळण्याच्या बोटीवर स्वातंत्र्य दिन एक अभिनव पार्टी आयोजित करण्यात आलेल्या त्या प्रसंगाचे वर्ण करतातएकूणच या दोनही संग्रहांचा विचार करता तत्कालीन राजकीय परिस्थितीचे आणि समाजात . होणाऱ्या अनेक घटना प्रसंगांचे टीकास्पद वर्णन या संग्रहांच्या माध्यमातून केले असल्याचे जाणवतेया कवितांच्या . समाजात होणाऱ्या अनेकविध घटनांचा त्यांच्या मनावर होणारा .माध्यमातून त्यांच्या मनातील आर्थ भावनेचा उलगडा होतो या कविता म्हणजे कवीने तत्कालीन .परिणाम होतो आणि त्या परिणामाचे प्रतिबिंब म्हणून त्यांची कविता समोर येते समाजात घडणाऱ्या घडामोडी विरोधात मांडलेले मत आहे हे नक्की.

.या दोन कवितासंग्रहांच्या माध्यमातून कवी समाज मनाचा वेध घेतो 'ती बाई मीच आहे' आणि 'बच्चुबाईची वाडी' 'ती बाई मीच आहेया दीर्घ कवितेच्या माध्यमातून ते समाजात वावरणाऱ्या हिंस्र मनोवृत्तीचा वेद घेण्याच 'ा प्रयत्न करतात . स्त्री कडे वाकड्या नजरेने बघणाऱ्या प्रत्येक पुरुषाला दिलेले हे एक झणझणीत उत्तर आहे असे म्हटले तर कोठे ठरणार परस्त्रीकडे फक्त उपभोगाची वस्तू म्हणून पाहणाऱ्या प्रत्येक चारित्रहीन पुरुषाला त्याच्या घरातल्या आई भगिनींची .नाही आठवण करून देणारीही कवितात्याच बाईचा शोध घेत असताना ,प्रत्येक पुरुषाच्या आत म्हणे एक बाई दडलेली असते . या कविते समाजात वावरणारे आपल्या अवतीभवती असणारे .विष्णू वाघांना ही कविता सुचली असे ते स्वतःच मुलगा प्रत्येकाला आपल्याशा वाटणारे कधीतरी पाहिलेले अशा प्रत्येक महिलेचे नकाशे वर्णन झालेली आहेहे वर्णन करत . ते कधी हिंस्र पुरुषाच्या नजरेतून घडते तर कधी कोण आहे का कठोर विरोधी .असताना अनेक पातळीवर ते वर्णन जाते .बाईच्या नजरेतून घडते

समाजदर्शन हा विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्याचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे .त्यांच्या साहित्यात येणारा समाज हा फक्त 'बहुजन वर्ग'(बहुजन वर्ग असा येणारा उल्लेख येथे जातीवाचक नसून संख्यावाचक आहेइथे हा शब्द . आणि सर्व सामान्यपणे समाजाने ,पांढरपेशा समाज :उदाहरणार्थ .समाजातील बहुसंख्यिक वर्गाचा प्रतिनिधित्व करतो स्वीकारलेले काम करणारेलोकव सर्वसामान्य वर्गातून येणारा (सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजात प्रतिष्ठेने वावरणारे लोक . समाज नसून हा समाज अनेक वेळा समाजात असलेल्या अशा घटकांचेही वर्णन करताना दिसतो ज्यांना आज पर्यंत त्यांनी लिहिलेल्या साहित्याच्या माध्यमातून .समाजाने स्वीकारलेले नाही बऱ्याच वेळा सर्वसामान्य समाजातनिषिद्ध . एकीकडे अध्यात्माचे धडे देणारे विष्णू सूर्या वाघ दुसरीकडे दारूचे फायदे .मानल्या जाणाऱ्या विषयांचे प्रकटीकरण होते एकीकडे गोमंतकीय लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारे विष्णू सूर्या वाघ दुसरीकडे याच गोमंतकीय .सांगताना दिसतात स्ंस्कृतीत सुक्तपणे वावरणाऱ्या जातीभेद आणि भाषावादाचे दर्शन घडवून घेतातइतक्या परस्पर भूमिका घेणारे विष्णू . .वाघ मात्र एका विशिष्ट साहित्यकृतीत घेतलेल्या भूमिकेला चपळतेने आणि अत्यंत कसोशीने वाचकांपर्यंत पोहोचवितात त्यामुळे असे म्हटले तर खोटे ठरणार नाही की वैचारिक रित्या द्वंद्व बाळगणार्या विष्णू वाघ त्यांच्या मनातील तत्कालीन विषय वाचकांना पटवून देण्यात पारंगतता होती.

विष्णू वाघ यांनी आपल्या आपल्या साहित्याच्या माध्यमातून गोमंतकीय आणि महाराष्ट्रातील मुंबई प्रदेशाचे जे वर्णन केलेले आहेत त्याच्या माध्यमातून या प्रदेशाचे सामाजिक वास्तव शोधता येतेहे सामाजिक वास्तव अस्थिर असले . त्यांच्या साहित्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे आणि .तरी तेच सत्य आहे हे मान्य करावे लागते या प्रकरणाच्या माध्यमातून व .समाजात घडलेल्या अनेक बऱ्या वाईट घटनांचे उलघडे होऊ शकतातिष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या साहित्याचा अभ्यास करून त्यात आलेल्या समाजाचे सिंहावलोकन करण्यात येईलहा अभ्यास करत असताना . .त्यांच्या साहित्यात आलेल्या समाजदर्शनाला चार भागात विभागणे महत्त्वाचे ठरते

१लोकसाहित्याचे आणि लोक संस्कृतीचे दर्शन (

२गोमंतकात स (ूक्तपणे वावरणारा जातीभेद आणि भाषाभेद

३तत्कालीन समाजातल्या राजकारणाचे दर्शन (

४(समाज मनाचा मनोविश्लेषणात्मक अभ्यास) समाज मनाचे दर्शन (

## ४.१ लोकसाहित्याचे आणि लोक संस्कृतीचे दर्शन

विष्णू वाघ यांचा जन्म ’गोव्यातील‘, हा .सारख्या एका छोट्याशा गावात झाला ’डोंगरी‘ गाव मुळातच लोक संस्कृतींनी सण उत्सवांनी आणि लोककलांनी समृद्ध असल्यामुळे विष्णू वाघ यांच्या सुरुवातीच्या काही रचनांमध्ये हा परिसर आणि तिथल्या संस्कृतीचे दर्शन घडते’झिंजीर झिंजीर सांस‘ त्यांच्या ., ’सुशेगाद‘, ’पर्जन्यधून‘, या  ’नाट्यसूर्य‘ साहित्यकृतींमधून लोकसाहित्याचे आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

अरुण म्हात्रे आपल्या एका भाषणात म्हणतात की विष्णू वाघ जगाच्या पाठीवर कुठेही गेले असते तरी त्यांचे मन “ .मात्र गोव्यातच राहिले असते”[64] या वक्तव्याला सार्थ ठरणारे असेच विश्वास यांचे साहित्य आहे या ’डोंगरी‘ गोव्यातील . गावात साजरा होणारा ’इतरुज‘, तिथला ’शिगमोत्सव‘, ’सटी देवी‘ गावची ’डोंगरी‘, ’धेंडलो‘, ’सुवारी‘, ’धालो‘, ’गुलालोत्सव‘, ’सुतां पूनम‘, ’चवथ‘, ’नरकासुर‘, ’जत्रोत्सव‘, यासारख्या सण उत्सवांचा उल्लेख यामध्ये घेतो . त्याचबरोबर गोमंतकीय लोक मनावर अनेक पिढ्यांपासून प्रभाव टाकणारे लोक दैवतांचे वर्णन साहित्यामध्ये येते.

पाठीवर उमटले

यातनांचे वण

आता चाबूक पिसड

नि मार दणादण

कटर घणचे कटर घण्! (झिंजिर झिंजिर सांज; घणचे कटर घण!)

! घणचे कटर घण‘ ’ या कवितेत आलेल्या या ओळींच्या माध्यमातून त्यांनी लोकसाहित्याचे आणि लोक जीवनाचे वर्णन करत असताना ते जीवन जगणाऱ्या जनमानसाचे मांडलेले दु:ख जाणवते’घुमट‘ त्यांच्या कवितांवर ., ’समीर‘, ’कासाळे‘, ’ढोल‘, त्यांनी या कवितांना प्रस्तुत करण्यासाठी वापरलेली ही  .यासारख्या वाद्यांच्या लई चा प्रभाव आहे ’ताशा‘ लव एका विशिष्ट प्रयोजनाने आलेली आहे हे मात्र नक्की.

तिथल्या डोंगर पर्वती  ,या कवितेच्या माध्यमातून कवी त्यांच्या जन्मस्थानाचे कथन करतो ’माझी डोंगरी डोंगरी‘ आपल्या गावाचे वर्णन करत असताना तो त्या  .सैमाचे चाललेल्या भजनाचा उल्लेख करतो ,काजू आंब्यांच्या दरवळाचा

---

[64] youtube

मानस‘ गावात केल्या जाणाऱ्या पारंपारिक शेतीचे’घुमट‘ तिथे होणाऱ्या आरती भजनात वापरल्या जाणाऱ्या ,वर्णन करतो ’, ’शमेळ‘, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिथल्या लोक संस्कृतीचे आणि लोक ,या वाद्यांचा उल्लेख करतो ’कासाळे‘ या कवितेत येणाऱ्या आशयाला अधिक उभारी देते ती या कविते .जीवनाचेही दर्शन घडवून घेतोची त्यांनीच नमूद केलेली पार्श्वभूमी ,या पार्श्वभूमीत ते असे म्हणतात की .“गोव्याच्या तिसवाडी तालुक्यात ,जुन्या गोव्यापासून दहा किलोमीटर दूर , अघ या .अघनाशिनी म्हणजे पापाचा नाश करणारी .या जुवारीचं जुनं नाव अघनाशिनी .जुवारी नदीच्या काठावर वसलेलं शब्दाचा आणखी एक अर्थ आहे मगरया नदीला अघनाशिनी म्हणण्याचं हेसुध्दा एक .जुवारीच्या पाण्यात मगर रहात नाही . .कारण असावं”[65] या पार्श्वभूमीत त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांच्या आधारे आणि कवितेत व्यक्त केलेल्या आशयाच्या माध्यमातून त्यांच्या गावाचा परिसरतिथ ,तिथला भौगोलिक प्रदेश ,ली संस्कृतीत्यांचे उगम व ,तिथे पूजले जाणारे दैवत , .गावातील लोक जीवनात त्यांचे असलेले विशेष महत्त्व यासारख्या अनेक संशोधनात्मक विषयाचे बीज सापडतात

,त्याचा इतिहास ,हा वैशिष्ट्यपूर्ण सोहळा ’हित्रूज‘ या त्यांच्या कवितेत त्यांच्या गावात साजरा होणारा ’हित्रूज‘ गोमंतकीय लोकसंस्कृतीत त्याचे असलेले महत्त्व आणि त्या सोहळ्याशी जोडलेल्या प्रथा परंपरांचे दर्शन या कवितेच्या माध्यमातून घडते’धेंडलो‘ त्यांच्या ., ’सुंवारी‘, ’उधळा गुलाल‘, ’पुरसांव‘, ’चवथ‘, ’सटी‘, ’नरकासुर‘, या ’लईराई‘ कवितांच्या माध्यमातून गोव्यात साजरे होणारे सण उत्सवआणि त्यांची ,ते साजरे होण्यामागचे कारण ,त्यांचे महत्त्व , किंबहुना या त्यांच्या कविता लोकसाहीत्याचा व लोकसंस्कृतीचा अभ्यास करणाऱ्यांसाठी .तपशीलवार माहिती मिळते .महत्त्वाचे दस्ताऐवज बनतात‘उधळा गुलालय .या कवितेत आलेला आशय विशेष महत्त्वाचा ठरतो ’ा कवितेच्या माध्यमातून त्यांनी गोव्यात साजरा होणाऱ्या ,ते म्हणतात .वर्णन केलेले आहे ’गुलालोत्सवाचे‘

विसरून द्वैतभाव

बुजवून जुनी माव

एक झालं सारं गाव

भेटे भावाला हा भाव

रंगवीत गाल ...

उधळा गुलाल ! (झिंजिर झिंजिर सांज; उधळा गुलाल)

---

[65] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.१६

अशा प्रकारचा आशय व्यक्त करणारी त्यांची कविता समाजात असलेल्या द्वैत भावाचे नाश करण्यासाठी महत्त्वाची ठरतेते सण साजरे करण्यामागे नेमका काय भावार्थ ,अनेक पिढ्यांपासून साजरे होणारे सण आम्हाला कोणता संदेश देतात . म्हणूनच .यासारख्या चिंतनशील विषयाला अनुसरून त्यांच्या कविता येतात ,होता कदाचित त्यांच्या कवितांविषयी बोलत असताना अरुण म्हात्रे म्हणतात की ,"ह्या कविता रसिकांच्या मनातील पाटीवर कायमच्या कोरल्या जातील."[66]

आम्ही गे'ऽऽ' या कवितेच्या माध्यमातून गोव्यातील नावाच्या शेतकरी महिलांच्या उत्सवात म्हटल्या 'धालो' जाणाऱ्या गीतांचा गाभा त्यांनी स्पष्ट केलेला आहे .'सरगीच्या देवरंभाम्हणत असताना हा शब्द नेमका कोणत्या अर्थाने ' ,आला याची स्पष्टीकरण देताना ते म्हणतात" खेडवळ बायकांच्या तोंडून उमटलेल्या त्या शब्दांना फार मोठा अर्थ आहेत्या . ?तुम्ही कोण' एकाच शब्दांतून' या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं आहेऋग्वेदाच्या नासदीय सूक्तांत सृष्टीच्या उत्पत्तीची कथा . ...अंधारानंच अंधाराला लपेटून घेतलं होतं .अगदी सुरुवातीला केवळ अंधारच होता .सांगितली आहे

तम आसीत्तमसा गूढमग्ने ...

या अंधारातच खळबळ झाली नि प्रणवाचा हुंकार झालामायेच्या गर्भातून विश्वाची निर्म .िती झालीही सृष्टी एका . तिच्या ,माझ्या आईनं .मूळमाया नसती तर ईश्वराचा संकल्प पूर्ण होऊच शकला नसता .ईश्वरानं निर्माण केलेली नाही पण वैदिक नि उपनिषदीय सूक्तात वर्णिलेल्या .सवंगडी बायांनी जन्मात कधी नावही ऐकलं नव्हते उपनिषदांचं आदिशक्तीच्या सामर्थ्याची सुप्तजाणीव खळखळून वहात होती त्यांच्या काळजातआम्ही गे – म्हणूनच ओठांवर आले शब्द . ! सरगींच्या देवरंभा"[67] याचाच अर्थ त्यांनी लिहिलेल्या साहित्या मागे त्या साहित्यात आलेल्या प्रत्येक शब्दामागे त्यांचा सखोल अभ्यास झालेला असल्याचे जाणवहाच अभ्यास त्यांच्या या साहित् .याला दस्ताऐवज बनविण्यात मदत करतो.

संस्कृती दर्शन करीत असताना त्यांचे साहित्य इतिहास कथन आणि संस्कृतीत घडलेल्या नूतनीकरणामुळे झालेल्या घोळाचे दर्शन घडवतात .'खुरीस', 'नरकासुर', 'जुन्या गोव्यात', या कविता इतिहासात 'जेझू आणि पाईक' घडलेल्या गैरवर्तनामुळे वर्तमानात निर्माण झालेल्या मतभेदांचे आणि तंट्यांचे दर्शन करतातआज निर्माण होणाऱ्या प्रत्येक . कोमंतकीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी अत्यंत ,प्रश्नाचे मूळ आपल्या इतिहासात आहे हे स्पष्ट करणाऱ्या या कविता या कवितांच्या माध्यमातून आज संस्कृतीला हाताश .महत्त्वाचा आहेी धरून समाज विकृतीकडे कसा जातो आहे याचेही दर्शन कवींनी घडविलेले आहे.

---

[66] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.०७

[67] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.२७

’मातीची दैवते‘, ’भुतावळ‘, ’देवचार‘, यासारख्या कवितांच्या माध्यमातून गोमंतकीय संस्कृतीत ’अवसर‘ महत्त्वाचा वाटा निभावणाऱ्या एक महत्त्वाच्या घटकाचे वर्णन ते करतात तर वरील सर्व आशयाला विरोधाभासी दर्शन त्यांच्या ’परिस्थितीची फेणी‘, ’क्रांती आणि हुर्राक‘, ’त्या रात्री‘, यासारख्या कवितांमधून घडते .‘भाटीया त्यांच्या ’ या कवितेचे वैशिष्ट्य .कवितेच्या माध्यमातून गोव्यातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या वेणी व्यवसायाचे चित्रण ते करतात म्हणजे हे चित्रण फक्त अनुभवाच्या आणि आस्वादाच्या पातळीवर न राहता या चित्रणाच्या माध्यमातून त्यांनी काढण्याच्या प्रक्रियेचे क्रमवारी वर्णन केलेले आहे.

विष्णू सूर्या वाघ यांच्या या पुस्तकात आणि संदर्भ गोमंतकीय लोक जीवनातील लोककलांचे दर्शन ’नाट्यसूर्य‘ निसर्गात उपल .घडवतातबध होणाऱ्या अनेक विविध घटकांच्या माध्यमातून नक्षीदार आणि कलात्मक वस्तू बनविण्याच्या प्रक्रियेचे वर्णन आणि या वस्तूंचे महत्त्व विशद करणारे विधान या पुस्तकात येतेआकाश ,कागदी फुले बनविण्याची कला . शि‘ त्याचबरोबर ,मिठाई ,पंचखाजी ,नेवर्या ,कंदील बनविण्याची कलारती ’(गोव्यात लग्न करून दिलेली मुलगी पहिल्यांदा गर्भवती झाली की तिला फुलं माळण्याची पद्धत आहेफुलं मळतात तेव्हा तिच्यासमोर कागदापासून बनविलेल्या मोठ्या . यात वापरल्या जाणाऱ्या कागदापासून .केळीच्या पानाच्या आकाराच्या वर अनेक विविध पदार्थ मोठ्याची पद्धत आहे बनविलेल्या मोठ्या केळीच्या पानाच्या आकाराला यासारख्या लोककलांचा उल्लेख त्यांच्या (.असे म्हणतात ’शिरती‘ .साहित्यात येत राहतो

## ४.२ गोमंतकात सूक्तपणे वावरणारा जातीभेद आणि भाषाभेद

लहानपणापासून गावात पाहिलेल्या घटना प्रसंगाच्या माध्यमातून त्यांच्या मनावर परिणाम झाला. या घटना प्रसंगांचा प्रभाव झाल्यामुळे त्यांच्या मनात सुक्तपणे जातीभेद आणि भाषाभेद याविषयीचे अढळ स्थान निर्माण झाले. त्यांच्या साहित्यात येणाऱ्या या विषयामुळे त्यांच्या साहित्याला विद्रोही स्वरूप प्राप्त होते. शिवराळ आणि बोचक भाषा त्यांच्या साहित्याला प्राप्त झाली ती याच विषयाला अनुसरून. समाजात सुक्तपणे असलेल्या जातीभेदान विरोधात ते सक्त विरोधी भूमिका घेताना दिसतात .

गावाला कशी रे सैतानाची नजर लागली?

शेतामधीं नडणी बघ

राक्षसासारखी वाढली!

कोण कुठली गरीब पोरं

गुन्यांव नसताना मेली...

अरे काळीज नसलेली तुमची भाषा

सात आयांची कूस

रिकामी करून गेली! (सुशेगाद; मायभास)

अशा प्रकारचे वक्तव्य करून ते गोव्यात निर्माण झालेल्या भाषाभेदामुळे घडणाऱ्या हृदयस्पर्शी घटनांचे चित्रण करतात. ते कुठल्याच अवास्तविक घटनेबद्दल न बोलता सर्वसामान्य माणसाचे मन व्यक्त करतात. कुठल्याही सामाजिक घडामोडी बद्दल तत्कालीन प्रसंगाबद्दल बोलत असताना ते सर्व सामान्य जनतेचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात. 'मायभास' या त्यांच्याकडून तुमच्या माध्यमातून ते त्यांच्या गावात घडलेल्या हत्याकांड विषयी व्यक्त होतात. यांच्याकडून अनावधानाने मारल्या गेलेल्या लोकांविषयी कळकळ व्यक्त करताना ते ही कविता लिहितात.

दुसऱ्या दिवशी पेपरात बातमी

भाषावादाची ठिणगी पडली

डोंगरीची माती रगतानं भिजली

कातराच्या खाजनशेतात

सात जणांची मढी पडली... (सुशेगाद; मायभास)

असे म्हणत असताना ते सर्वसामान्य लोकांना गुणवंतकीय संस्कृतीची आठवण करून देऊ पाहतात. ज्या गोव्यात सर्वधर्मसमभावचे धडे गिरवले जात होते त्याच गोव्यात भाषा भेदामुळे आज लढे घडतात. तत्कालीन काळात भाषा भेदामुळे घडणाऱ्या लढ्यांच्या माध्यमातून अनेक निरागस लोकांचे बळी गेले याचे दाखले देणारी ही कविता.

गोव्यात कित्येक वर्षांत आधीपासून वावरत असलेल्या मराठी भाषेचा इतिहास सांगणारी आणि मराठी भाषेची महती सांगणारी 'माय मराठी बोलविते' ही विष्णू वाघ यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

कोंकणी सुध्दा अमुची भाषा

आम्हां तिचाही मोग असे

परंतु अमुच्या हृदय मंदिरी

मराठीचाही ध्यास वसे

ओठीं वसते कोंकणी आणि

उरी मराठी लवलवते ! (झिंजिर झिंजिर सांज; माय मराठी बोलविते)

असे म्हणत ते मराठी आणि कोकणीचे आप्त संबंध स्पष्ट करतात. गोमंतक्यांच्या मनात असलेल्या मराठी आणि कोकणी भाषा भगिनी विषयीचे मत या कवितेच्या माध्यमातून स्पष्ट करताना दिसतात. गोमंतकात कोकणी बरोबर मराठीलाही मान आहे. कोकणी ही घुमंत किंवा वासियांची बोली तर लेखणीतून मराठीत वाहते असे सांगणारी ही कविता, गोमंतकीय समाजात असलेल्या भाषा भेदाला वेगळे वळण देताना दिसते. 'मराठीचे आई' या कवितेच्या माध्यमातून आजपर्यंत भाषा भेदामुळे मराठी भाषेला सोसाव्या लागणाऱ्या संघ कडांचे आणि अपमानांचे दर्शन ते घडवतात या अपमानांमुळे क्रोधित झालेल्या त्यांच्या मनाचे प्रकटीकरण ते या कवितेच्या माध्यमातून करतात. ते मराठी भाषेकडे दान मागतात लढण्याचे, ते म्हणतात की या राज्यातील प्रत्येक घराघरात शिवबाचा जन्म होऊ दे आणि तो सुसज्ज होऊ दे भाषेसाठी पुन्हा एकदा लढण्यासाठी.

भाषा भेदा विषयी त्यांच्या आलेल्या कवितांमध्ये सुप्त पणे आशावाद दिसतो. हा आशावाद आहे गोव्यात पुन्हा एकदा कोकणी आणि मराठीचा एकोपा निर्माण झाल्याचा. हा आशावाद आहे पुन्हा एकदा होऊयात मराठीला तिचे अपेक्षित स्थान मिळवून देण्याचा आणि हा आशावाद आहे गोव्याला लाभलेल्या मराठी भाषेचा इतिहासाला स्वीकारून गोवेकरांना पुन्हा एकदा मराठमोळे करण्याचा. गोव्यात आधी कालापासून मराठी वापरली जात होती या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न या कवितेच्या माध्यमातून विष्णू वाघ करतात. आपल्या कवितेच्या माध्यमातून ते मराठी भाषेची महती सांगत असताना कोकणी भाषेलाही यथोचित सन्मान देताना दिसतात. मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषांना ते भाषा भगिनी म्हणून संबोधतात हे त्यांच्या साहित्यातील विशेष.

त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून जातीभेदा स्पष्ट करणाऱ्या आशयाला अनुसरून महत्त्वाचे विधान म्हणून 'नाट्यसूर्य' या पुस्तकात येणाऱ्या "आज कोकणीचा पुरस्कार करणारी जी मंडळी आहे ती सरसकट उच्चवर्णीय आहे. ते घरी बोलतात त्याच भाषेला प्रमाण भाषा म्हणून त्यांनी पुढे आणलं आहे. ही बहुजनांची भाषा नाही. त्यांच्या कंपूत तू गेलास तर ते आपली भाषा तुझ्याही डोक्यात ठोकतील. दोन दिवस तुम्हाला खांद्यावर घेऊन नाचवतील आणि नकळत कुठेतरी फेकून देतील,"[68] या विधानाला महत्त्व प्राप्त होते. त्यांच्या लहानपणापासून त्यांना सभोवताली दिसल्या जातीभेदामुळे त्यांच्या मनावर परिणाम झाला आणि याचमुळे याविषयी बोलत असताना त्यांचे साहित्य विद्रोही स्वीकारते. हे विद्रोही स्वरूप त्यांच्या मनात याविषयी असलेल्या क्रोधाचे दर्शन करून देते.

'सुतां पुनव', 'चवथ', यासारख्या कवितांबरोबर 'तुका अभंग अभंग' या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी समाजात सुक्तपणे वावरणाऱ्या जातीभेदाचे दर्शन घडविलेले आहे. समाजा त असलेल्या या प्रथेमुळे एका विशिष्ट समाजाची कशी अवहेलना केली जाते याचे दर्शन हे घडवतात. बहुजन समाज आणि त्यांना भोगावे लागणाऱ्या वेदनांचे दर्शन त्यांचे साहित्य

[68] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या*. *श्रूश्टी प्रकाशन. मार्च २०१९ प्रू. ५५*

करून घेते. हे दर्शन घडवून देत असताना ते उच्चभ्रू समाजाविषयी आक्रोश आणि विद्रोही स्वरूपाचे वक्तव्य करताना दिसतात.

जानवं घातल्यानं माणसं बामण होतात

पण गुरं, झाडं, माठ नि हंडे यांचं काय होतं

या प्रश्नाचं उत्तर

कधीच दिलं नाही बापानं (सुशेगाद; सुता पुनव)

असे म्हणत असताना कवी समाजापुढे एक आर्थ भावनेने प्रश्न निर्माण करतात, की जातीने विभागलेल्या या समाजाला ज्या निसर्गामुळे महत्त्व आहे त्या निसर्गाला का जाती प्रथांचे बंधन लागत नाही? हा प्रश्न कवीच्या मनापूर्ती न राहता तो या कवितेत आल्यामुळे सर्वव्यापी आणि अनेक सर्व सामान्य जनतेच्या मनातल्या प्रश्नाचे प्रतिनिधित्व करतो. 'चवथ' या कवितेच्या माध्यमातून कवी बहुजन समाजात जन्माला आलेल्या बाल मनाला पडणाऱ्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व करतात. हे प्रश्न कदाचित त्यांच्या बालवयात त्यांना पडले असू शकतात. मात्र त्यांचे उत्तर वृद्ध वयातही सर्वसामान्यांना सापडत नाही. याच आशय विषयाची कविता म्हणजे 'चवथ'.

'तुका अभंग अभंग' या नाटकात मात्र हा त्यांच्या मनात असलेला पाखरू शिखर गाठतो. अनेक प्रसंगांच्या माध्यमातून वाढवलांकडून आलेल्या अनेक मित्र कथांचा आधार घेऊन आणि त्यांना खोचक प्रश्न विचारत हे नाटक आकार घेते. नाटकातील पात्रांच्या मुखी येणारा संवाद लेखकाच्या मनातील क्रोध, अक्रोड आणि विद्रोह स्पष्ट करतो. लेखकाला बालपणापासून या नात्याकारणाने दिसणारा जातीभेद आणि त्या जातीभेदामुळे त्याच्या मनात निर्माण झालेली क्रोधाची भावना यांचे दर्शन या नाटकाच्या माध्यमातून घडते.

## ४.३ तत्कालीन समाजातल्या राजकारणाचे दर्शन

विष्णू सूर्या वाघ यांचे बरेच आयुष्य पत्रकारितेत आणि राजकारणात गेल्यामुळे सहाजिकपणे त्यांच्या साहित्यात त्याचे प्रतिबिंब दिसते. त्यांच्या 'शब्दकुंड', 'वाघनखे', 'फील गुड फेणे', 'लोकोपनिषद' या साहित्यकृतींच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील राजकारण आणि समाजकारण यांचे दर्शन घडते. त्यांच्या साहित्यकृतीत येणाऱ्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे दर्शन हे तत्कालीन सत्य परिस्थितीचे वर्णन करून थांबत नाही तर ते प्रबोधनात्मक होते.

'दिल्ली ते गल्ली' या त्यांच्या कवितांच्या संचामध्ये राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या राजकीय घटनांवर त्यांनी केलेली टीका आहे.

अणुकराराच्या नावे

भरपूर घेतले चावें

सोनियांची लाट येताच

आडवे पडले डावे ! (लोकोपनिषद; दिल्ली ते गल्ली)

यासारख्या कवितांच्या माध्यमातून ते स्पष्ट वक्ते पणाने समाजातील राजकारणाचे आणि त्या राजकारणात सहभागी असलेल्या लोकांचे टीकास्पद वर्णन करताना दिसतात. हे दर्शन घडवित असताना ते कुठल्याही समकालीन पक्षाचे व राजकारणी व्यक्तीचे समर्थन न करता जे आहे त्याचे यथोचित दर्शन घडवून देताना दिसतात. तत्कालीन राजकारणातील हेवे-दावे, राजकारणात वावरणाऱ्या व्यक्तींनी घेतलेल्या भूमिका आणि काही दिवसानंतर त्याच भूमिकेच्या परस्पर विरोधाच्या भूमिकेत दिलेली सहमती, यासारख्या अनेक विविध विषयांना हाताळत ही कविता साकार होते.

'कुंभमेळा' या त्यांच्या कवितेच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन काळात, विश्व हिंदू परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रवीण कुमार तोगाडीया यांनी एकदा भाजपवर टीका करताना साधू संतांचा एक पक्ष काढण्याची घोषणा केली. त्यावर केलेले भाष्य आहे.

मतपेटीने खरंच बघा

कसला चमत्कार केला

दगडी चाळीतला वाल्यासुध्दा

वाल्मिकी होऊन आत गेला ! (फिल गुड फेणी; मत दान)

या सारख्या कवितेच्या माध्यमातून ते प्रस्थापित समाजव्यवस्थे विरोधात प्रश्न निर्माण उठवताना दिसतात. भारतातील लोकशाही आणि तिच्या अवतीभवती असलेल्या अनेक घटकांविरोधात ते भाष्य करताना दिसतात. "ही मराठी राजकीय अस्मितेची झालेली परवड अत्यंत परखड शब्दांत मांडतांना विष्णू सुर्या धैर्य दाखवतात. त्यांच्या भेदक टीप्पणीतून शिवशाहीर, गानसम्राज्ञी, लोकसभापती आणि हिंदुहृदयसम्राटही सुटलेले नाहीत. समकालीन घटनांवर अशी जनसामान्यभाष्ये करीत असतांना कवीला लौकिक परिणामांची तयारी ठेवावी लागते आणि तशी जबाबदारी घेणे ही राजकीय भाष्य कवितेची एक सामर्थ्यखूण असते. तात्कालिक घटनांवरील भाष्यकवितांचा मराठीत एक जोरकस प्रवाह आहे. 'फील गुड फेणी' संग्रहामधील अनेक कवितांनी या प्रवाहाचं महत्व अधोरेखित केलं आहे."[69] आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तत्कालीन काळाचे व त्या काळाविषयी भाष्य करत असताना प्रत्येकाने आपले चित्र व आपले स्थान त्या काळात पहावे असे प्रतिपादन ते आपल्या कवितांच्या माध्यमातून करतात.समाजाच्या विविध स्तरांवर घडणारे राजकारण याचेही

[69] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.१६

दर्शन ते आपल्या साहित्याच्या माध्यमातून घडवतात. हे राजकारण समाजात बहुमानाचे असलेल्या धर्मपिठावरही चालते असे त्यांचे मत होते आणि या त्यांच्या मताचे स्पष्टीकरण देणारे त्यांच्या कविता विशेष आहेत.

'गांधी आणि मुन्ना भाय', 'ड्राय डे', 'चमत्कार', 'बाजार', यासारख्या कवितांच्या माध्यमातून ते समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न करतात. समाजासाठी योगदान देणारे स्वातंत्र्यवीर समाजाला आदर्श निर्माण करून देणारे गांधी सारखे व्यक्तिमत्त्वांचा समाजाला विसर पडलेला आहे आणि कुठल्यातरी एका चित्रपटाचा आधार घेऊन त्या व्यक्तीचे महान कार्य स्पष्ट करत आहे याचे दर्शन त्यांच्या कवितांच्या माध्यमातून घडते. तत्कालीन समाजात घडलेल्या घडामोडींचे दर्शन त्यांच्या कवितांच्या माध्यमातून कळते. त्यांच्या साहित्यात येणाऱ्या राजकारणाचे दर्शन करताना मात्र ते विद्रोह स्वीकारत नाही. तत्कालीन समाजातील राजकारणाचे यथोचीत दर्शन करून ते त्यावर हास्यास्पद टीका करत राहतात. मात्र तत्कालीन समाजात घडलेल्या घडामोडी विरोधात बोलताना ते तीव्र विद्रोही भूमिका स्वीकारतात.

## ४.४ समाज मनाचे दर्शन

विष्णू सूर्या वाघ आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजातील अनेक विविध विषयांना हाताळताना दिसतात . या सगळ्यांबरोबरच त्यांच्या अनुभव विश्वात ,जातीप्रथा ,समाजात सुक्तपणे वावरणारा भाषावाद ,बहुजन समाजाची व्यथा समाजाच्य .येणाऱ्या समाजाचे मनोविश्लेषणात्मक अभ्यास ते करतात ा मनाचे प्रकटीकरण करत असताना समाजात वापरणाऱ्या विविध स्तरावरील व्यक्तींचे प्रेम ते व्यक्त करतात.

क्रिकेटपटूराजकारणी यासारख्या सामाजिक पठावर काम करणाऱ्या ,पोलीस अधिकारी ,शिक्षक ,फुटबॉल पटू , व्यक्तींचे प्रेम ते त्यांच्या कवितेच्या माध्यमातून स्पष्ट करत जातात .'ती बाई मीच आहेया दीर्घ कविता मध्ये ते प्रत्येक ' समाजात वावरणाऱ्या हिंस्र नजरेचे आणि बुभुक्षित विचारांच्या पुरुषांचे ते .पुरुषाच्या आत दडलेल्या बाईचे दर्शन घडवितात या कविताच्या माध्यमातून त्यांनी मांडलेला विषय फक्त स्त्रीवर घडलेल्या अन्य .दर्शन घडवितात ायावर भाष्य करून थांबत नाही तर ते त्याच्या मुळाशी जाऊन समाजात वावरत असलेल्या मानसिकतेवर बोट ठेवतातत्यांनी लिहिलेली ही . .कविता तत्कालीन समाजात घडणाऱ्या अनेक घटनांचे दाखले पुरावे देत त्यांवर विचार करण्यासाठी वाचकांना प्रेरित करतात

'शब्दकुंड', पुलावरचा माणू'स', यांसारख्या एकांकिकांच्या माध्यमातून त्यांनी मानवाच्या मनाचा वेध 'रक्तपर्जन्य' समाजात सातत्याने घडणाऱ्या पत्रकार आणि राजकारणी यांचा मधला संघर्ष त्यांनी .घेण्याचा प्रयत्न केलेला आहे हा संघर्ष मांडत असताना ते वैय .या एकांकिकेमध्ये दाखविलेला आहे 'शब्दकुंड'क्तिक पातळीवर जाऊन त्यांच्या मनात

असलेल्या मुद्द्यांचे विवेचन करतात .‘पुलावरचा माणूसया एकांकिकेच्या माध्यमातून तर त्यांनी मनात निर्माण होणाऱ्या ’ ही पात्र .सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या एकांकिकेत येणाऱ्या पात्रांना नाव नाहीत .द्वंद्वाचे दर्शन केले आहेे एकूण समाजात वावरणाऱ्या कोणा एकाचे प्रतिनिधित्व न करता समाजात असलेल्या विचार प्रवाहांचे आणि मानसिकतेचे प्रतिनिधित्व करतात .

आदित्यछकूसारख्या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी समाजात सुप्तपणे वावरणाऱ्या एका मानसिकतेचे दर्शन घडविले आहेहे नाटक ऐतिहासिक घटनेवर क .िंवा भावना इतिहासातील एका ऋषीमुनी वर आधारित जरी असले तरी यात आलेला विषय मात्र तात्कालीन समाजातील मानसिकतेचे दर्शन घडविताना दिसतो.

## समारोप

विष्णू सूर्या वाघ यांचे साहित्य सुरुवातीपासूनच समाज पारदर्शक साहित्य राहिलेले आहेत्यांच्या लहानपणापासून . त्यांना आलेल्या अनुभवांचे आणि त्यांनी पाहिलेल्या समाजाचे दर्शन ते त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून घडवतात . लोकजीवनाचे दर्शन ,गोव्यातील लोक साहित्याचे ,त्यांच्या कवितेच्या माध्यमातून होणारे गोव्याचे संस्कृती दर्शन त्याचबरोबर इथल्या समाजाचे आणि सामाजिक परिवेशाचे दर्शनघडत जातेनंतरची काही वर्षे ते मुंबई शहरात राहत २००३ . होते. त्यामुळे सहाजिकपणे तिथल्या समाजाचेतिथल्या संस्कृतीचे किंबहुना तिथे असणाऱ्या समाजातील विविध घटकांचे , याच कारणामुळे त्यांचे साहित्य फक्त गोवा किंवा मुंबई पुरते म .प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसतेर्यादित राहत नाही तर ते राष्ट्रीय पातळीवरही जाऊन भाष्य करते.

ते पेशाने पत्रकार .त्याचमुळे त्यांचा समाजाशी जवळचा संबंध होता .तसेच राजकारणी सुद्धा होते ,चित्रकार ,वक्ते , त्यांची संस ,त्यामुळे गोव्यातील समाज .संपूर्ण गोवाभर ते या नात्या कारणाने भ्रमंती करायचे्कृती आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांची परिस्थिती यांचे भान त्यांना होतेत्यांच्या आईकडून त्यांनी गोमंतकीय संस्कृतीचे आकलन केले तर वडिलांकडून . त्यांच्या साहित्यातून उमटणारा मराठी भाषे प्रतीचा अभिमान हे त्यांच्या वडिलांची देण .मराठी भाषेवर प्रभुत्व प्राप्त केले आहेअवहेलना आणि द्वेषभाव ,ते स्वतः बहुजन समाजातले असल्या कारणामुळे या समाजाला भोगावे लागणाऱ्या व्यातना . त्यामुळेच गोमंतकीय समाजात सुक्तपणे वावरणाऱ्या जातीप्रथा आणि भाषा भेद यांच्या विषयी ते .यांचे ते साक्षीदार आहे त्यांच्या साहित्याच् .अधिकारवाणीने बोलतातया माध्यमातून या सर्वांची एक मध्यस्थी गाठताना ते दिसतातगोव्यात . असलेल्या जातीप्रथा आणि भाषा भेदा विषयी त्यांच्या मनात चीड जरी असली तरी ही परिस्थिती बदलून गोव्यात पुन्हा .एकदा सर्वधर्मसमभाव सूर गुंजतील अशी त्यांना खात्री आहे

## निष्कर्ष

- विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्यात समाजात असलेल्या जातीभेदाचे आणि भाषा भेदाचे दर्शन होते.
- गोव्यातील बहुजन समाजाचे मर्म त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून स्पष्ट होते.
- विष्णू वाघ यांना त्यांच्या बालपणी पडलेले प्रश्न आणि त्यांची त्यांना प्राप्त झालेली उत्तरे यांचा उल्लेख त्यांच्या साहित्यात येतो.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या जीवन प्रवासाचे पडसाद त्यांच्या साहित्यावर पडतात.
- विष्णू वाघांच्या साहित्यात गोव्याबरोबरच महाराष्ट्रातील मुंबई प्रांताच्या सर्वसामान्य लोकांचे दर्शन घडते.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या नाटकात स्त्रीला प्राप्त झालेले महत्त्व अनन्यसाधारण आहे.
- त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि राजकारण यांवर टिप्पणी केलेली आहे.
- तत्कालीन राजकारण आणि समाजकारण याचे यथोचित दर्शन त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून घडते.
- त्यांच्या साहित्यात येणारे राजकारण बहुतांशी मुंबई प्रदेशाचे आहे.
- त्यांचा साहित्य विषय गोव्यापूर्ती मर्यादित न राहता राष्ट्रव्यापी आणि अनेक केंद्रीय आहे.
- समाजात घडणाऱ्या विविध बऱ्या वाईट घटनांचा समाज मनावर पडणारा परिणाम त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून प्रकट होतो.

## संदर्भ सुची

[1] youtube

[1] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.१६

[1] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.०७

[1] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.२७

[1] वाघ, विष्णु. *नाट्यसूर्या . श्रूश्टी प्रकाशन. मार्च २०११ प्रू.* ५५

[1] वाघ विष्णु, झिंजिर झिंजिर सांज. इंदु सूर्या प्रकाशन . जुलै, २००६. प्र.१६

## समारोप

विष्णू सूर्या वाघ यांच्या एकंदर साहित्यरचनेचा आढावा घेता असे समजते की त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे अनुभव विश्व प्रकट केलेले आहेइतिहासाचा ,लोकसंस्कृतीचा ,त्यांच्या साहित्यावर गोमंतकीय लोकजीवनाचा . मात्र याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे त्यांच्या साहित्यात बऱ्याच अंशी .आणि इथल्या गावगाड्याचा प्रभाव झालेला आहेच २० .महाराष्ट्रातील मुंबई प्रदेशाचे दर्शन होते०३ नंतर काही काळ ते महाराष्ट्रातील मुंबई प्रदेशात राहायचे तिथे त्यांना गवसलेला समाज आणि तिथल्या वेगवेगळ्या सामाजिक परिवेशात असलेली समाजीक स्थिती याचे दर्शन त्यांना घडले . व्या ,साहित्यिक ,त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात पत्रकारितेतून झाली नंतर त्यांनी नाटककारख्यातेराजकारणी म्हणून गोवा , या त्यांच्या अनुभव विश्वात त्यांना गवसलेली विविध पात्रे त्यांनी .तसेच गोवा बाहेरील अनेक राज्यात भ्रमंती केली, पाहिलेल्या विविध घटना यांचे पडसाद त्यांच्या साहित्यावर पडतातम्हणूनच त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून . स्वतःचाजीवनपट मांडलेला आहे असे म्हटले तर ते खोटे ठरणार नाही.

विष्णू सूर्या वाघ यांच्या बालपणी त्यांच्यावर झालेल्या संस्कारांचा त्यांच्यावर गाढा प्रभाव होतायाच प्रभावातून . त्यांनी लहानपणापासून भोगलेल्या आणि पाहिलेल्या जातीप्रथे .त्यांचे साहित्य विश्व आकारास येते विषयी ते यामुळेच प्रभुत्वाने बोलू शकतातत्यांच्या साहित्याच्या माध्यमातून गोमंतकीय समाजात सुप्तपणे वावरणारा जातीभेद आणि . .आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी या मुद्द्यांवर आपल्या मतांचे प्रकटीकरण केलेले आहे .भाषाभेट याचे दर्शन होते भाषावादाविषयी बोलतअसताना ते मध्यस्थीची भूमिका गाठतातगोव्यातील मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषांना ते . त्यांच्या कवितेच्या माध्यमातूनही त्यांनी मराठी आणि कोकणी मिश्रित अशी एक वेगळीच .भाषा भगिनी म्हणून संबोधतात या त्यांच्या आगळ्यावेगळ्या प्रयो .मिश्र भाषा वाचकांसमोर आणलेली आहेगाच्या माध्यमातून ते गोव्यात राहणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तींचे भाषे विषयीचे मत व्यक्त करतात.

गोमंतकात वसणाऱ्या जातीभेद विरोधात मात्र ते बंड पुकारताना दिसतातगोव्यात आणि सर्वसामान्यपणे एकूणच . भारतीय परंपरे सुक्तपणे वावरणाऱ्या जाती भेदा विषयी ते आपल्या साहित्याच्या माध्यमातून सडेतोड भूमिका घेताना दिसतातसारख्या कवितेच्या 'झिंजीर झिंजीर सांस' सुरुवातीला .त्यामुळेच कदाचित त्यांचे साहित्य विद्रोही स्वरूपाचे बनते . स 'वाघ नखे' माध्यमातून जो कवी गोव्यातील लोकसाहित्याचे दर्शन वाचकाला घडवितो तोच कवी पुढे जाऊनारख्या कवितासंग्रहाच्या माध्यमातून समाजाचे एक वेगळेच रूप वाचकांसमोर आणतो हे अत्यंत महत्त्वाचे आहेयावरून असे . निदर्शनास येते की त्यांच्या जीवनात घडलेल्या अनेक घडामोडींच्या माध्यमातून त्यांचा समाजाकडे पाहण्याचा एकूण याच त्यांच्या बदलत्य .दृष्टिकोन बदलत गेला दृष्टिकोनाचे पडसाद त्यांच्या साहित्यावरही पडतात.

त्यांनी हाताळलेल्या वेगवेगळ्या साहित्यकृतींच्या माध्यमातून त्यांनी अनेक अस्पर्शी विषय लोकांसमोर आणले . विशिष्ट प्  त्यांनी लिहिलेल्या साहित्याकडे चिकित्सात्मक दृष्टिकोनातून पाहता असे लक्षात येते की त्यांनीरयोजनांना डोळ्यासमोर ठेवून विविध साहित्य प्रकारांची निवड केलीही निवड करत असताना त्यांनी आशय विषयाबरोबरच व्यक्त . कवितातून आणि चरित्रातून त्यांनी वेगवेगळे ,त्यांनी लिहिलेल्या नाटकातून .होण्याच्या पद्धतीलाही मर्यादा घातलेली दिसते विषय हाताळलेच मात्र या सर्वप्रकारांचे लेखन करत असताना त्यांच्या लेखन पद्धतीतही बदल झालेला दिसतोकवितेच्या . माध्यमातून ते समाजाचे वास्तवदर्शी चित्रण घडवतात तर नाटक आणि एकांकिकेच्या माध्यमातून त्या समाजात वावरणाऱ्या लोकांच्या मनाचा वेध घेताना आणि गाळिव इतिहासाला पुनर्जीवित करताना ते द िसतातमात्र चरित्र लेखन करत . .त्यांच्यामध्येच जन्माला येऊन कर्तुत्व गाजविलेल्या व्यक्तिमत्वांचे आदर्श निर्माण करताना दिसतात ,असताना समाजासमोर त्यांची कोणतीही साहित्यकृती ही पुस्तकातील शब्दांपूर्ती मर्यादित न राहता समाज प्रबोधनाचे आणि समाज जागृतीचे महत्त्वाचे कार्य करताना दिसते.म्हणूनच त्यांचे साहित्य महत्त्वाचे ठरते .

त्यांनी लिहिलेल्या साहित्याला पत्रकाराच्या शोधक वृत्तीचीसाहित्यिकाच्या लेखणीची ,राजकारण्याच्या नजरेची , त्यांच्या बऱ्याच साहित्याच्या माध्यमातून ते .आणि धर्म अभिमानी भक्ताच्या वेदनेची जोड आहेधर्म म्हणजे काय आणि देव कुठे बसतो यासारख्या क्लिष्ट विषयावरही भाष्य करताना दिसतातप्रमाण आणि निर्माण या तत्त्वावर ,त्यांचे साहित्य शोध . आधारले असल्यामुळे त्यांच्या साहित्याला ऐतिहासिक दृष्ट्या आणि तत्कालीन समाज दर्शनाच्या दृष्ट्या अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहेया स्त्रिया .त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी केलेले स्त्री चित्रण विशेष महत्त्वाचे आहे . त्यांनी लिहिलेल्या साहित्याच्या माध्यमातून .सर्वसामान्य असून सुद्धा त्यांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे कुठेच कोणाचेच वायफळ उदात्तीकरणकरण्याचा प्रयत्न झाले असल्याचे जाणवत नाही.

त्यांच्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त होणारे राजकारणसमाजकारण हे तत्कालीन काळातील राजकारणाचे , यासारख्या कवितांच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन सत्य परिस्थितीचे दर्शन घडविले आहे किंबहुना .प्रतिनिधित्व करतात मुळातया कवितेची रचना त्यांनी तत्कालीन समाज जागृतीसाठी केले गेले असल्याचे स्पष्ट होते.

त्यांनी लिहिलेल्या एकूण साहित्याचा आढावा घेता कविता आणि नाटक या साहित्य प्रकारात त्यांना विशेष पारंगतता प्राप्त झाली असल्याचे आढळतेत्यांच्या साहित्यात अनेक पाश्चात्य साहित्य . संकल्पनांचा आणि प्रयोगांचा वापर झाला असल्यामुळे मराठी साहित्यात त्यांनी विशेष भर घातली आहे हे नक्की.

## निष्कर्ष

- ललित लेखनासाठी आणि संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या विशिष्ट लेखक अभ्यासात भिन्नता आढळते.
- ललित लेखनासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात संशोधनाला कमी महत्त्व असून माहिती प्रसारणाला जास्त महत्त्व असते.
- संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात चिकित्सात्मक अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.
- लेखकाच्या अनुभव विश्वाचा आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा सहसंबंध असतो.
- 'लेखकाचा वैयक्तिक जीवनाचा अभ्यास' आणि 'लेखकाच्या वांग्मयीन प्रवासाचा अभ्यास' या अभ्यास क्षेत्रातील पहिला टप्पा असतो.
- चिकित्सात्मक अभ्यास हा या अभ्यास क्षेत्रातील दुसरा टप्पा असतो.
- या अभ्यास प्रक्रियेत अभ्यासकाने निवडलेल्या लेखकानुसार दुसऱ्या टप्प्यात बदल होतो, मात्र पहिला टप्पा तसाच राहतो.
- विशिष्ट लेखकाचा अभ्यास या अभ्यास क्षेत्राचे अध्ययन, संकलन, संशोधन हे अभ्यास विषय म्हणून निवडलेल्या लेखकावर अवलंबून असते.
- लेखक अभ्यास करत असताना अभ्यासकाने पूर्वग्रह विदुषित असणे महत्त्वाचे ठरते.
- विशिष्ट लेखकाचा अभ्यास हा अनेक केंद्रीय अभ्यास आहे.
- विशिष्ट लेखकाचा अभ्यास सर्व समावेशक असल्यामुळे या अभ्यासाची एकच एक अशी अभ्यास पद्धती सांगता येत नाही.
- विष्णू सूर्या वाघ हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.
- ते ज्या क्षेत्रात गेले त्या क्षेत्रात त्यांनी प्राविण्य प्राप्त केले.
- त्यांच्या बालवयात त्यांच्यावर झालेल्या संस्काराचे पडसाद त्यांच्या पुढील आयुष्यात दिसतात.
- त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेकविध क्षेत्रात काम केले पण, त्यापैकी ते साहित्यिक म्हणून प्रभावी दिसतात.
- राजकारण, वक्तृत्व, अध्यात्म, समाजसेवा, नाटक, कविता यासारख्या अनेक क्षेत्रात त्यांनी जरी काम केलं असलं तरी त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांच्यातला पत्रकार डोकावतो.
- विष्णू वाघ यांच्या वडिलांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला .
- २००२ – २००४ या काळात त्यांच्यातील कवी मनाला उभारी आली.

- एकाच वेळी अनेक क्षेत्रांमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांच्या साहित्य रचनेवर परिणाम झालेला आहे.
- विष्णू वाघ यांनी लिहिलेले साहित्य आणि त्यांचे वैयक्तिक जीवन यामध्ये समन्वय आहे.
- त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून बहुजन समाजाचे दर्शन घडविले आहे.
- गोमंत किया संस्कृती, गोमंतकीय परंपरा आणि या प्रदेशाला लाभलेल्या इतिहासाचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.
- गोमंत का बरोबरच महाराष्ट्रातील मुंबई शहराचे यथोचित दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.
- त्यांच्या साहित्यात येणारे व्यक्ती होणारा आशय तत्कालीन समाजाचे वास्तव दर्शन घडविणारा आहे.
- त्यांनी हाताळलेल्या तीन साहित्यकृतींच्या माध्यमातून त्यांनी समाजातील वेगवेगळ्या विषयांना प्राधान्य दिलेले आहे.
- विष्णू वाघ यांच्या कवितेच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे वास्तव दर्शन आणि गोमंतकीय लोकजीवन यांचे दर्शन घडविलेले आहे.
- त्यांच्या नाटकांच्या माध्यमातून त्यांनी मनोविश्लेषणात्मक विषय हाताळले.
- त्यांच्या नाटकामुळे डाळिंब इतिहासाला पुनरावृत्ती मिळाली.
- विष्णू वाघ यांनी लिहिलेल्या चरित्रांच्या माध्यमातून त्यांनी समाजात वावरणाऱ्या सर्वसामान्य पण कर्तुत्वाने मोठे असलेल्या व्यक्तिमत्त्वांचे चरित्र लिहिले.
- विष्णू सूर्या वाघ यांची कविता ग्रामीण जीवनाशी संबंध सांगणारी आहे.
- त्यांच्या कवितेच्या माध्यमातून गोमंतकीय लोकजीवनाचे दर्शन होते.
- विष्णू सूर्या वाघ यांनी लिहिलेल्या नाटकांच्या माध्यमातून त्यांनी स्वतःचे मन प्रकटीकरण केल्याचे जाणवते.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या नाटकात स्त्री पात्रांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या नाटकात येणारी काही पात्रे ही जरी प्रतिनिधी स्वरूपाची असली तरी, त्या पात्रांच्या संवादा माध्यमातून व्यक्त होणारा विषय लेखकाचे अनुभव विश्व स्पष्ट करण्यात महत्त्व प्राप्त करतो.
- त्यांच्या साहित्यात येणाऱ्या घटना प्रसंगाचा आधार घेता, भारतीय संस्कृतीत स्त्रीला प्राप्त झालेले वर्चस्व स्पष्ट होत.
- यावरून आपल्या संस्कृतीत लिंगभेदाला महत्त्व न देता बुद्धिमत्ता आणि क्षमता यांना अनुसरून कार्यांची केलेली विभागणी लक्षात येते.

- त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा क्रम लक्षात घेता त्यांनी मांडलेल्या साहित्य विषयात होणारा बदल स्पष्ट होतो.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या साहित्यात समाजात असलेल्या जातीभेदाचे आणि भाषा भेदाचे दर्शन होते.
- गोव्यातील बहुजन समाजाचे मर्म त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून स्पष्ट होते.
- विष्णू वाघ यांना त्यांच्या बालपणी पडलेले प्रश्न आणि त्यांची त्यांना प्राप्त झालेली उत्तरे यांचा उल्लेख त्यांच्या साहित्यात येतो.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या जीवन प्रवासाचे पडसाद त्यांच्या साहित्यावर पडतात.
- विष्णू वाघांच्या साहित्यात गोव्याबरोबरच महाराष्ट्रातील मुंबई प्रांताच्या सर्वसामान्य लोकांचे दर्शन घडते.
- विष्णू सूर्या वाघ यांच्या नाटकात स्त्रीला प्राप्त झालेले महत्त्व अनन्यसाधारण आहे.
- त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि राजकारण यांवर टिप्पणी केलेली आहे.
- तत्कालीन राजकारण आणि समाजकारण याचे यथोचित दर्शन त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून घडते.
- त्यांच्या साहित्यात येणारे राजकारण बहुतांशी मुंबई प्रदेशाचे आहे.
- त्यांचा साहित्य विषय गोव्यापूर्ती मर्यादित न राहता राष्ट्रव्यापी आणि अनेक केंद्रीय आहे.
- समाजात घडणाऱ्या विविध बऱ्या वाईट घटनांचा समाज मनावर पडणारा परिणाम त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून प्रकट होतो.

## परिशिष्ट

गोविंद गावडे

- तुमचा आणि विष्णू सूर्या वाघ यांचा परिचय कसा व केव्हा झाला?

‘सिद्धी नंदन थिएटर नागेशी’ यांनी आयोजित केलेल्या ‘सुरांगनी’ या कार्यक्रमात आमची पहिली भेट झाली. त्यावेळीची ती गोमंतकात आयोजित होणारी सर्वात मोठी स्पर्धा होती. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी आम्ही विष्णू वाघांना खास बोलावून घेतले होते. त्यावेळी ते मुंबईत स्थलांतरित झाले होते आणि यानंतर अधून मधून आमची भेट होत होतीच.

- विष्णू वाघ एक लेखक म्हणून तुम्हाला कसे वाटतात?

विष्णू सूर्या वाघ मला गुरु समान. त्यांच्या लेखनाविषयी सांगायचे झाले तर मला एका प्रसंगाचा उल्लेख करावा लागेलं, शिव गोमंतकचे नाटक लिहिण्यासाठी ते आमच्याकडे राहायला होते. त्या संपूर्ण नाट्य लेखनाचा मी साक्षीदार आहे. त्यांनी ते नाटक सलग तीन दिवस आणि दोन रात्रीत लिहून काढले होते. सलग न थांबता आणि न थकता लिहिण्याची त्यांचीही असोसिएट आगळीवेगळी अशी होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या संपूर्ण नाट्य लेखनात त्यांनी एकही पान वाया घालवली नाही प्रत्येक शब्द असोशीने आणि विचारपूर्वक लिहिण्याची त्यांची खासियत होती.

- त्यांची नाट्य लेखनाची पद्धत कशी होती?

विष्णू वाघ यांनी लिहिलेल्या शिवगोमंतक या नाटकाचा मी साक्षीदार होतो. हे नाटक लिहीत असताना आम्ही अनेक ग्रंथालयात भेट दिली. आम्हाला अपेक्षित असलेल्या विषयावर संदर्भांचे आणि दाखले पुराव्यांचे संशोधन केले, या दरम्यान अनेक किल्ल्यांनाही आम्ही भेट दिली. वेगवेगळ्या पुस्तकांचा आधार घेऊन आणि त्या पुस्तकात येणाऱ्या आशय विषयाला समजून घेऊन या नाटकाची रचना झालेली आहे.

- विष्णू वाघ यांनी आपल्या साहित्यात हाताळलेल्या विषयाबद्दल तुमचे काय मत आहे?

विष्णू सूर्या वाघ हे तसे कमी बोलायचे मात्र त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून ती व्यक्त व्हायचे. अनेक गोष्टी ते त्यांच्या मनात साठवून ठेवायचे आणि त्यांचे उलघडे आपल्या साहित्याच्या माध्यमातून ते करायचे. त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून बहुजन समाजाचे वास्तवदर्शी चित्रण झालेले आहे. तुझ्या माझ्या युवांसाठी हे साहित्य प्रेरणादायी ठरते. त्यांच्या शिवगो म्हणतात या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी शिवाजीच्या मुखी दिलेली पात्रे ही त्यांच्या मनाचे प्रकटीकरण करताना दिसतात.

देविदास आमोणकर

- विष्णू वाघ आणि तुमची ओळख कधी व कशी झाली?

तसे पाहिले तर आम्ही दोघेही समवइन. आमची भेट झाली ती एका कार्यक्रमात. तो त्या कार्यक्रमात सूत्रसंचालन करत होता.त्यावेळी तो तरुण भारत मध्ये काम करत होते. मी माझ्या एका मित्राला माझी आणि त्याची ओळख करून देण्यासाठी सांगितले. ओळख झाल्यानंतर त्याच्याकडे मी त्याची एकांकिका बसविण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव केला आणि त्यांनी त्या प्रस्तावाला मान्यता दिली. ‘द सिझ फायर’ या नावाची ती एकांकिका त्यावेळी खूप गाजली.

- विष्णू सूर्या वाघ एक मित्र म्हणून कसे होते?

तसे पाहिले तर त्याच्या अंगभूत व्यक्तिमत्त्वातच लोकांना स्वतःकडे आकर्षित करण्याची कला होती त्याचे बोलणे वागणे हे प्रत्येकाला आकर्षित करायचे आम्हाला तो आपलेसे करून घ्यायचा. त्याच्या व्यक्तिमत्वात हाच गुण सर्वात महत्त्वाचा होता. त्याचा अनेक विषयांवर अभ्यास होता राजकारण समाजकारण धर्म यासारख्या विषयांचे वाचन मनन चिंतन तो सतत करत असायचा. त्याच्या लहानपणी म्हणे तो वाचन वेडा होता कदाचित त्याच वाचनामुळे त्याला हे ज्ञान प्राप्त झाले होते हेच कारण होते त्याच्या विचारात वैविध्य असण्यामागचे.

- ‘तुका अभंग अभंग’ या नाटकाविषयी तुम्हाला काय वाटते?

या नाटकात सादर होणारे प्रसंग प्रतीकात्मक स्वरूपाचे आहेत तुकारामांना होणारा साक्षात्कार हे त्याचे एक उदाहरण. या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी एक खूप महत्त्वाची भूमिका व्यक्त केलेली आहे ती म्हणजे देव दगडात नसून तो आमच्या सभोवतालीच्या पर्यावरणात बसतो तो निराकार आहे. विष्णू देवभक्त होता पण तो जनमानाचा देव शोधायचा.

रामराव वाघ

- विष्णू सूर्या वाघ यांच्या बालपणाविषयी तुम्ही काय सांगू शकता?

माझी आई, वडील व मोठी बहीण त्याला ‘बाबुश’ या नावाने हाका मारत. वडिलांना आम्ही सर्वजण व इतर लोक भाऊ म्हणायचे. भाऊंना बाबूशने कुणीतरी फार मोठं व्हावं ही तळमळ होती. भाऊंचं भाषेवरील प्रेम, नाट्यकर्मी असल्याने संवादफेकीवर जबरदस्त हुकूमत, त्याचप्रमाणे त्यांचं करारी व्यक्तिमत्त्व यामुळे त्यांचा साऱ्या गावात दरारा होता. आमच्या साऱ्या मित्रमंडळींना त्यांची आदरयुक्त भीती वाटायची. ते घरात आले की सारी मित्रमंडळी पांगायची, पण ते आमच्या मित्रांसमवेत गप्पाही रंगवायचे. भाऊंनी घरात ठेवलेली सारी नाट्यपुस्तके बाबाने कमीत कमी पाच-सहावेळा वाचून काढली असतील यात शंका नाही. त्यातली महत्त्वाची खाडीलकर, कानेटकर, गडकरी व इतर पुस्तके तर त्याला मुखोद्गत असायची. वाचनाची जबरदस्त भूक त्याला होती व त्याचा संसर्ग मलाही होत होता. घरातील ही नाट्यसंपदा त्याच्या वाचनाची भूक शमवू शकत नव्हती.

सुदैवाने आमच्या शेजारील गावातील ग्रंथालय बाबुराव नाईक या शिक्षकांच्या पुढाकाराने रघुवीर मयेकर हे चालवत असत व तिथे विपुल ग्रंथसंपदा होती. त्यात प्रामुख्याने युवक- युवतींसाठी त्यावेळी प्रसिद्ध असलेली सर्व रहस्यकथांची पुस्तके त्यामध्ये गुरुनाथ नाईक यांच्या रहस्यकथा, तसेच चंद्रकांत काकोडकर यांच्या शृंगारिक कादंबऱ्याही होत्या. पण वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, ना. सी. फडके व कुसुमाग्रज या दिग्गज साहित्यिकांची ओळख या शाळेतील दिवसांमध्ये बाबाला व पर्यायाने मला झाली. आठवते, त्यावेळी या ग्रंथालयाचे दरदिवशी पुस्तकाचे भाडे २ पैसे होते व २ पैशांमध्ये एकाच दिवसात संपूर्ण पुस्तकाचा वाचून फडशा पाडून बाबा दुसरं पुस्तक घरी आणत असे. ग्रंथपाल रघुवीर त्याला पुस्तक निवडण्यासाठी मोलाचं मार्गदर्शन करीत असत. पण रहस्यकथा व शृंगारिक कथा-कादंबऱ्या तेव्हा भाऊंच्या आड वाचाव्या लागत असत व ते जोखमीचं काम आमच्या घरातील माडीवर (वरचा माळा) बसून करावं लागे. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या त्याला अत्यंत प्रिय होत्या. काही कारणास्तव हे ग्रंथालय बंद झालं, पण तोपर्यंत आमचे भाऊ पंचायतीचे पंचसदस्य म्हणून निवडून आले होते व पंचायतीत ग्रंथालय सुरू करण्यात आले होते. त्यामध्ये ‘मृत्युंजय’ ही शिवाजी सावंत यांची अजरामर कादंबरी व रणजीत देसाई यांची साहित्यसंपदा त्याच्या हाताला लागली. ‘मृत्युंजय’ या कर्णावरील चरित्र कादंबरीने साऱ्यांनाच वेड लावलं होतं व बाबाने तर पुस्तकाचं पारायणच केलं होतं. संधी मिळाली की मी ते पुस्तक घेऊन बसत असे. का कोण जाणे, पण त्या ग्रंथामधील कर्ण त्याला फार आवडत असे व मला कर्णाचा भाऊ शोणाची व्यक्तिरेखा आवडत असे. जन्माने क्षत्रिय पण सूतपुत्र म्हणून मानला गेलेला ‘सूर्यपुत्र’ कर्ण जसा सर्वगुणसंपन्न, दानशूर. पण एकदा कमनशिबी जसा ठरला तसंच आयुष्य बाबाच्या वाट्याला आलं. कवचकुंडले हरवलेला कर्ण जसा शेवटी महाभारताच्या युद्धामध्ये धारातीर्थी पडला, तसाच मृत्यू आज बाबाच्या नशिबी आला आहे

- विष्णू वाघ यांच्या जीवनावर कोणाचा प्रभाव जाणवतो जाणवतो?

मध्यंतरी बाबाचं गावातील जाणकार मंडळींकडून तसेच डोंगरी गावच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांमधून शिकणं चालूच होतं. आमचे वडील जेवढे नाट्यक्षेत्रातले दिग्गज, तेवढेच ते इतर अनेक गोष्टींमध्ये पारंगत होते. गावातील सप्ताह, घेणलो या उत्सवांसाठी सजावटीची कागदी फुले व त्यांचे गुच्छ व वेली करण्याचे काम ते करीत. याचबरोबर गर्भवतींच्या ‘फुलांच्या’ सोहळ्यासाठी खाद्यपदार्थ मांडण्यासाठी वापरण्यात येणारी सुबक रंगीत कागदांची ‘शिर्ती’, उत्सवासाठीच्या नक्षीदार पताका ते करीत असत. काही काळ त्यांनी कागदी हारदेखील बनवले. हे सर्व करीत असताना आम्ही बालमंडळी

त्यांच्याभोवती बसून हे शिकत असू व तर बाबाने त्यांच्या या सर्व कला नाट्यक्षेत्रातील कलेप्रमाणेच हुबेहूब आत्मसात केल्या होत्या. नंतर त्यांची थोडीफार नक्कल आम्ही करत असू. वडिलांच्या नंतर त्यानेदेखील ही कामे अनेकवेळा केली. वडिलांचं कुठलंही काम करण्यात नेटकेपण असे व तोच नेटकेपणा त्याच्या कामामध्ये दिसायचा. गणेश चतुर्थीच्या मूर्तीपासून माटोळी, आरास व पताका या सर्वांमध्ये वडील अत्यंत काटेकोरपणे रचना करायचे. माझ्या स्वभावानुसार मला लवकरच याचा कंटाळा यायचा. पण बाबा आमच्या भाऊंबरोबर तासन्तास गणपतीची मूर्ती स्थापन नीट झाली की नाही, त्याचे नेत्र समांतर आहेत का जमिनीवर केंद्रित झालेत, त्याची स्थापना मध्यभागी का बाजूला यावर खल करून वारंवार मूर्ती हलवायचे. माटोळीची सर्व फळफळावळ व आंब्याची पाने (तीसुद्धा निवडलेली) एका समान पातळीवर आहेत की नाहीत याची परीक्षा व त्यात सुधारणा करायचे व हे सर्व करत असताना रात्र कधी गेली व गणपतीच्या आरत्यांची वेळ कधी आली याची कल्पनादेखील येत नसे.

वडिलांकडून हे सर्व शिकत असताना आमच्या आईकडून पण आम्ही फारच गोष्टी आत्मसात केल्या. वडिलांच्या नाट्यक्षेत्रातील भ्रमंतीमुळे घराचा सारा भार आईवर होता व शेतीची सारी कामे तिलाच करावी लागत. या कामांमध्ये पण आम्ही भावंडे तिच्यासोबतीला शेतामध्ये जायचो. बाबा पण पेरणी, खण्णी, बांध घालणे या साऱ्या कामांमध्ये सहभागी व्हायचा. त्याच्या कवितांमध्ये डोकावणारा निसर्ग हा आमच्या गावासभोवताली पसरलेल्या विशाल खाजनशेतीसंपदा व डोंगरमाथ्यावरील विपुल वनराईमधून आलेला आहे. गावामधील शेती, मत्स्यव्यवसाय, फेणीव्यवसायाशी संबंधित अनेक कोंकणी शब्द त्याने चपखलपणे मराठीत आणले व त्याच्या कवितांमध्ये सुंदररीत्या वापरले आहेत. पण आईकडून अत्यंत महत्त्वाची गोष्ट जी त्याने आत्मसात केली होती ती म्हणजे घालोच्या ओव्यांची. माझी आई ही संपूर्ण पंचक्रोशीमध्ये घालांच्या ओव्या मुखोद्गत असलेल्या फारच थोड्या महिलांमधील एक होती. आमच्या गावात, आमच्या थोरलेभाट परिसरामध्ये तीन मंडपांमध्ये संपूर्ण वाडा विभागला होता. त्या तिन्ही मांडांवर पूर्वी ‘धाकल्यो धालो’ व ‘व्हडल्यो धालो’ या नावाने पाच दिवस धालांचा उत्सव चालू असे. आमच्या मंडपाच्या ‘धाकल्यो धालो’ या आमच्या घरच्या अंगणात व्हायचा व त्यामुळे आमच्या आईची घालोगीतांवर जबरदस्त पकड होती. आमचे भाऊ रेडिओवरील अनेक नभोनाट्यांमध्ये सहभागी व्हायचे. पण त्याकाळी आमच्या आईने पण पणजी केंद्रावर वडिलांनी धालोगीते गायली होती असे आम्हाला सांगितले होते. आता तुम्ही म्हणाल घालो हे महिलांचं काम, तेथे पुरुषांचं काय काम? पण आमच्या गावामध्ये धालोच्या उत्सवावेळी ‘सोंगे’ सादर करण्याची पद्धत होती. यासाठी आम्ही बालमंडळी व्यक्तिगत अथवा सामूहिक

प्रवेश वा गीत व खास रचलेलं एखादं पात्र रंगवायचो. धालो सुरू असताना मध्येच जाऊन ते सादर करण्याची पद्धत होती. सादरीकरण झाल्यावर धालोमांडावरील प्रत्येक बाई आपल्या बटव्यातून सुटे पैसे आम्हाला बिदागी म्हणून देत असे.

त्यामुळे धालांचे दिवस हे आमच्यासाठी पर्वणी होती. आम्ही आमच्या वाड्यावरच नव्हे तर नेवरा भागातील धालोंच्या मांडावरदेखील यानिमित्ताने भेट देऊन आमची कला सादर करायचो. या सगळ्याचा विष्णूच्या एकंदर व्यक्तिमत्वावर प्रभाव झालेला आहे.

## क्षण चित्रे

- विष्णु सुर्या वाघ पुरस्कार स्विकारत असताना













- रंगकर्मी विष्णु सुर्या वाघ





- विष्णु सुर्या वाघ आणि व्यासपिठ











## संदर्भ सुची


- सं. आवलगावंकर, अविनाश. *मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा.* प्रतिमा प्रकाशन. २००६
- सं. जोशी, वि, चं, उपाध्ये, बाबुराव, देशमुख, लता. *साहित्याचा अभ्यास गुरुवर्य डॉ. र. बा. मंचरकर सद्भाव ग्रंथ.* प्रतिमा प्रकशन.
- सं. निरगुडकार. *समीक्षासंहिता.* शब्दालय प्रकाशन, २०१२
- सं. प्रभुदेसाई, वी, भा, घवी, रवींद्र. *गोमंतकिया मराठी वाड्मयाचा इतिहास खंड २.* गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन.
- सं. मड्गावंकर, विनय. *तिसर्य सहस्रकारंभी भरतीय नाट्य आणि नट्क्कार* .संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन अतिथी प्रध्यापक संशोधन संचालनालय, २०२१


## आधार ग्रंथ


- वाघ, विष्णु. *शब्दकुंड.* रुद्रेश्वर पणजी प्रकाशन. २०००
- वाघ, विष्णु. *तुका अभंग अभंग.* पार्थ प्रकाशन. २०००
- वाघ, विष्णु. *झिजीर झिजीर सांस.* इंदु सूर्या प्रकाशन.२००३
- वाघ, विष्णु. *फिल गुद फेणी.* अपक्ष प्रकाशन.२००४
- वाघ, विष्णु. *सुसेगाद .* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *वाघ नखे.* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *शिवगोमंतक.* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *बच्चूभायची वाडी.* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *पर्जन्यधून.* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *आदित्यचक्षु.* इंदु सूर्या प्रकाशन.२००८
- वाघ, विष्णु. *लोकोपनिषद.* इंदु सूर्या प्रकाशन.२००९
- वाघ, विष्णु. *नचिकेतास.* इंदु सूर्या प्रकाशन.२०१३
- वाघ, विष्णु. *सुदीरसूक्त.* इंदु सूर्या प्रकाशन.२०१३
- वाघ, विष्णु. *रक्तपर्जन्य.* सुष्टी प्रकाशन.२०१३

- वाघ, विष्णु. *तीन पैशांचो तियात्र.* इंदु सूर्या प्रकाशन.२०१३
- वाघ, विष्णु. *एका सुरश्रीची कथा.* कला अकादमी गोवा.२०१३
- वाघ, विष्णु. *हे सुरांनो जितेंद्र व्हा.* सुष्टी प्रकाशन.२०१९
- वाघ, विष्णु. *नाट्यसूर्य.* सुष्टी प्रकाशन.२०१९
- वाघ, विष्णु. *सळ सळ पिंपळ पानांची.* उत्तरा नरेंद्र गावकर.२०२३
- वाघ, विष्णु. *ती बाई मीच आहे.* सुष्टी प्रकाशन.


## व्यक्तिनाम सुची

- रामराव वाघ
- देविदास आमोणकर
- गोविंद गावडे

## दुवा

https://youtu.be/Oo7tcOzuF44?si=OVy_oPnZUqCec4vp

https://youtu.be/IacPNpp0MSc?si=4_0xxSpSUnab9oKu

https://youtu.be/kXZMa1_6Ve8?si=8Y0ePtgzgUL3sEwb

https://youtu.be/wyXVIS8Voqc?si=gNBqBZRt2AVjsgDj

https://youtu.be/Oq4Q1UlkAqU?si=ziyKvd1Jhr5YWNT7

https://youtu.be/G3T-UbJrgZQ?si=DvaWYsxk11fs_mDJ